
# श्री साईलीला



नोव्हेंबर - डिसेंबर | दिवाळी अंक | १९७५

किंमत १.२५ पैसे

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री सा ई वा क्सु धा

समर्थ साई ज्ञाननिधी ।
जथा भक्ताची जैसी बुद्धी ।
आधीं निर्धारून पात्रशुद्धी ।
ज्ञान समृद्धि वितरत ॥ १५४ ॥
तयांस पूर्ण अंतर्ज्ञान ।
तयांस आधींच सर्वांची जाण ।
जयास जैसें योग्य साधन ।
तयाचें नियमन तैसेंच ॥ १५५ ॥
जैसा जयाचा अधिकार ।
तयाचा आधींच करूनि विचार ।
योग्यायोग्यतेनुसार ।
भक्तांचा भार बाबांना ॥ १५६ ॥
तैसेच आम्ही दिसाया थोर ।
परी त्या सिद्ध साईसमोर ।
खरेच आम्ही पोरांहूनि पोर ।
विनोदीं आतुर सर्वदा ॥ १५७ ॥
विनोदाचे बाबा आगर ।
जे जें ठायीं जयासी आदर ।
तेंतें यथेष्ट पुरवूनि समग्र ।
राखीत अव्यग्र भक्तांस ॥ १५८ ॥

— श्रीसाईसच्चरित् अध्याय १७ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

## दिवाळी विशेषांक

वर्ष ५४ वे] नोव्हेंबर ७५ [अंक ८-९

☆

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक रु. १-२५ फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४३२६१

# संपादकीय

**प्रिय वाचक**

**सप्रेम नमस्कार वि. वि.—**

श्रीसाईलीला मासिकाचा हा दिवाळीअंक श्रीसाईप्रेमींच्या हातात देण्यात मोठा आनंद होत आहे. यंदा हा अंक नव्हेंबर–डिसेंबरचा जोडअंक म्हणून प्रसिद्ध करण्यात येत असून तो श्रीसाईबाबांच्या भक्तांच्या अनुभव व दृष्टांतानी गच्च भरलेला आहे. गेल्या चार महिन्यापासून आम्ही साईभक्तांना बाबांचे अनुभव व दृष्टांत पाठविण्यासंबंधीचे निवेदन केले होते व त्यास योग्य ती साथ देऊन शेकडो साईप्रेमींनी आपापले अनुभव आमचेकडे पाठविले. त्यातले काही निवडक अनुभव या अंकात प्रसिद्ध केले आहेत. तसे पाहिले तर बाबांचे संबंधीचे अनुभव श्रीसाईलीलेच्या पहिल्या अंकापासून प्रसिद्ध होत आलेले आहेत. १९७२ सालीही असाच एक खास अनुभव अंक आम्ही काढलेला होता; व त्या अनुभव विशेषांकाचे स्वागत साऱ्याच श्रीबाबांप्रेमींनी केले होते. या अंकाचेही स्वागत पूर्वीप्रमाणेच केले जाईल अशी अपेक्षा आहे.

या खास अंकासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून निरनिराळ्या भक्तांनी आपले अनुभव लिहून पाठविले यावद्दल आम्ही त्यांना धन्यवाद देतो. श्रीसाई-लीलेचे कार्य हे बाबांचेच कार्य आहे. ते या भक्तमंडळीनी करून या मासिका-द्वारे बाबांचे आशीर्वाद मिळविले आहेत. या अंकात भक्तांचे प्रत्यक्ष अनुभव आहेत. ऐकीव गोष्टी, भाकडकथा किंवा भास नव्हेत. कुणालाही प्रत्यक्ष आलेल्या अनुभवांची सत्यता आपण नाकारू शकत नाहीं. ज्यावेळी मानवी प्रयत्न संप-तात आणि मग आशेला जागाच अजिबात राहिलेली नसते, अशावेळी श्रीसाई-बाबांची प्रार्थना केल्याने, त्यांची उदी–अंगारा लावल्याने, तो पाण्यातून प्राशन केल्याने फायदाच झालेला आहे. केवळ बाबांच्या छायाचित्रमुळे कित्येक अशक्य प्राय गोष्टी शक्य झालेल्या आहेत.

प्रत्येक कार्याला कार्यकारण भाव हा असतोच. या मूलभूत वैज्ञानिक व तार्कीक सिद्धांताप्रमाणे अशा गोष्टीत बाबांचा प्रभाव हेच कारण बुद्धीने मानले पाहिजे, म्हणून आम्ही कुठलेही चमत्कार न देता बुद्धिला पटणारे अनुभवच वाचकांना सादर केले आहेत. कोरड्या बुद्धिवादाला सुद्धा यातील कार्यकारण भाव पटेल अशी आम्हांस खात्री वाटते.

श्रीसाईबाबांनी अशिक्षितांप्रमाणेच सुशिक्षितांनाही प्रभावित केलेले आहे. एम. ए.; एल. एल. बी. ; पी. एच. डी. सॉलिसिटर, न्यायाधिश, डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ अशी अनेक क्षेत्रातली नामवंत उच्चविद्या

विभूषित व आंग्लभाषा सुपरिचित अशी मंडळी बाबांचे भक्त आहेत. भारतातच नव्हे तर भारताबाहेर परदेशातही बाबांची भक्त मंडळी आहेत. याचे कारण बाबांचे प्रत्यक्ष दर्शन, बाबांची उदी व अनुभव यांचा अनुभव त्यांनी घेतला. बाबांचे महात्म्य, त्यांचे कार्य त्यांना पटले हे होय. बाबा केवळ चमत्कार करून दाखविणारे कुणी अवलिया नव्हते. तर ते श्रीदत्त, पांडुरंग, शंकर, श्रीराम, श्रीकृष्ण इत्यादी विविध देवतांच्या स्वरूपात सुशिक्षितांना बाबा दिसले आणि म्हणूनच की काय बाबा हे परमेश्वरी अवतार आहेत, चालते बोलते परब्रम्ह आहेत अशी खात्री त्यांना पटत गेली. या गोष्टीना अंधश्रद्धा म्हणणाऱ्यांच्या तोटक्या बुद्धीची मात्र कीव करावी तेवढी थोडीच वाटते.

बाबा हयात असताना दुःखितांना उदी देत असत. त्यांच्या या उदी अंगाऱ्याच्या असंख्य अदभूतकथा आहेत. आज बाबा देहाने आपल्यात नाहीत त्यांचा आत्मा वायूरूपाने आज सर्वत्र संचार करीत आहे. त्यांची उदी मात्र शिल्लक आहे. बाबांच्या या उदीला मोठा अर्थ आहे. प्राणी देह नश्वर आहे, नाशवंत आहे तो नष्ट झाल्यावर उरते काय? तर अवघी तीन चिमटया राख तेव्हा या उदीच्या रूपाने मीच तुमच्या जवळ आहे असे जणू काय नव्हे तर प्रत्यक्षपणेच बाबा सुचवित आहेत. पण या उदीरूपी औषधाला मुख्य अनुपान आहे श्रद्धेचे. जो बाबांवर भक्ती ठेवतो तो उदीवर श्रद्धा ठेवतोच. या उदीवर आता काही मी लिहित नाही पुढे मागे केव्हा तरी लिहिनच. पण या उदी बद्दलचे अनेक अनुभव या अंकात आहेत.

श्रीसाईबाबांनी आपल्या हयातीत एका पैचाही संग्रह केला नाही. त्यांनी भाविक शिष्य संप्रदायही निर्माण केले नाहींत. त्यामुळे साधू, महंत, मठ श्रीसाई संप्रदायात अजिबात नाहींत. बाबांच्या देहाचे बंधन सुटल्यावर त्यांचे आत्मिक सामर्थ्य अधिकाधिक प्रभावी होऊ लागले आहे याचा अनुभव सर्वांना येतो आहे. बाबा हयात असताना शिरडी संस्थानचा जेवढा पसारा होता त्याच्या कितीतरी पटीने अधिक तो आज वाढलेला आहे प्रत्येक महिन्याला, सणासुदीला व पर्व उत्सवकालात हजारो दर्शनप्रेमी भाविक शिरडीला न बोलावता आपल्या आपणच येत आहेत. व लाखोरुपये न मागता जमत आहेत. बाबांच्या आशीर्वादाचे सामर्थ्य जनतेला अधिकाधिक प्रत्ययास येत आहे याचे हे प्रत्यंतर होय. बाबांचे या अंकातले विविध अनुभव साईभक्ताना दिवाळीत खऱ्या खुऱ्या मेजवानीप्रमाणे वाटतील अशी खात्री वाटते. हा अंक छापत असतानाही अनेकांचे अनुभव येत राहिले. तेव्हा अगदी शेवटच्या घटकेपर्यंत जेवढे अनुभव देता आले व जे निवडक छापण्यालायक असे होते तेवढेच या अंकात घेतले आहेत. आणखीनही काही अनुभव शिल्लक आहेत. त्यांचा समावेश श्रीसाईलीलेच्या यापुढील अंकातून करण्यात येईल. सर्व साईप्रेमीना साईभक्तांना ही दिवाळी सुखाची व आनंदाची जावो हीच प्रार्थना श्रीसाईचरणी लीन होऊन करतो.

## शांतिनिवासचे उद्घाटन

विजया दशमी उत्सवाच्या दोन दिवस अगोदर श्रीसाईबाबा संस्थानने भक्तांसाठी नव्यानेच बांधलेल्या "शांतीनिवास" या तीन मजली सुंदर व भव्य इमारतीचे उद्घाटन आपल्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी केले ही आनंदाची गोष्ट होय. मुख्यमंत्री हे स्वतः श्रीसाई भक्त आहेत. त्यांच्या सुशील पत्नी सौ. कुसुमताई यापण बाबांच्या जुन्या भक्त आहेत. श्री शंकररावांना मुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारण्याचा केंद्र सरकारकडून आदेश जो आला तो गुरुवारीच. हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे, व ती जबाबदारी स्वीकारल्यावर ते प्रथम बाबांच्या भेटीला आले होते व संस्थानतर्फे त्यांचा पहिला सत्कार करण्यात आला होता. मुख्यमंत्री श्री शंकररावांनी शांती निवासाचे उद्घाटन केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार आम्ही मानतो. मुख्य मंत्र्यांच्या समवेत श्री. बाळासाहेब सावंत, खताळसाहेब, श्री. शंकरराव कोल्हे, अहमदनगर जिल्ह्याचे कलेक्टर, प्रांत अधिकारी, रेव्हेन्यू कमिशनर इ. बडी बडी मंडळीही या समारंभास हजर होती.

## दोन शोकवार्ता

शिर्डीला यंदाच्या दसरा उत्सवास सुरुवात झाली आणि एक दुःखाची बातमी आम्हास ऐकावी लागली. आमचे स्नेही व एक जुने श्रीसाईभक्त श्री. एस. पी. कोरगांवकर हे शिरडी मुक्कामी श्रीसाई दर्शनास आले होते आणि उत्सवाच्या पहिल्याच दिवशी तार येऊन थडकली की, त्यांच्या सुशील पत्नी या मुंबईत अचानक हृदयविकाराचा झटका येऊन कालवश झाल्या. लगेच श्री. कोरगांवकर यांना मुंबईस रवाना करण्याची व्यवस्था करण्यात आली. श्री. कोरगांवकर यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

या दसरा सणापूर्वी एक आठवडा अगोदर आणखीन एक शोकवार्ता आम्हास ऐकावी लागली व ती म्हणजे कु. मीना देशपांडे हिच्या दुःखद निधनाची.

कु. मीना ही निष्ठावंत साईभक्त व आमचे स्नेही श्री. विठ्ठलराव यशवंतराव देशपांडे यांची लाडकी कन्या होती. दिनांक ८ ऑक्टोबर रोजी ती श्रीसाई चरणी विलीन झाली. श्री. देशपांडे यांचे वय आज ७३ वर्षांचे आहे. श्रीबाबांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. त्यांचे साक्षात् दर्शन घेतले आहे. वृद्धापकाळी श्री. देशपांडे व त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या संकटावर मात करण्याची श्रीबाबांनी त्यांना शक्ति द्यावी हीच बाबांजवळ आता नम्रप्रार्थना! निधन समयी कु. मीनाचे वय २१ वर्षांचे होते.

आम्ही श्री. देशपांडे कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात सहभागी आहोत. मृतात्म्यास सद्गति लाभो हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

—संपादक.

# श्रीराम साई निवास–विलेपार्लें (पूर्व)

लेखक :– श्री. चंद्रकांत दामोदर सामंत

श्रीसाईनाथांच्या शिरडी येथील वास्तव्याच्या काळात मुंबईच्या वांद्रे ते विलेपार्लें ह्या उपनगरीय भागात त्यांचे निकटचे व नावाजलेले बरेचसे भक्त राहत असत. "श्रीसाईसच्चरित्"कार श्री. गोविंदराव दाभोळकर उर्फ 'हेमाडपंत', श्री. रघुनाथराव व सौ. सावित्रीबाई तेंडुलकर, रावबहादूर मोरेश्वर



**चंद्राबाई बोरकर**

श्रीबाबांच्या मुखात अखेरच्या क्षणी तुलसीदल सोडण्याचे भाग्य याच चंद्राबाईना लाभले

विश्वनाथ प्रधान, सॉलिसिटर हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित, श्री. रामचंद्र आत्माराम उर्फ बाळासाहेब तर्खड, भक्तश्रेष्ठ बाळाराम मानकर तसेच बाळाराम धुरंधर, द्वारकामाईतील श्रीबाबांची अप्रतिम प्रतिमा रेखाटण्यारे

श्री. शामराव जयकर इत्यादिकांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या ह्या विभागांत श्रीसाईबाबांचे एक जुने श्रद्धास्थान आहे.

विलेपार्ले (पूर्व), येथील टिळक मंदिर रोड ह्या रस्त्यावर 'श्रीराम-साईनिवास' ह्या नावाची एक इमारत आहे. सदर इमारतीच्या कंपाऊंडमध्ये शिरताक्षणी समोरच एका उघड्या जागेत मध्यभागी भिंतीलगत श्रीसाईबाबांची बसलेली मूर्ति आपले लक्ष वेधून घेते. मूर्तिकार वसंत गोवेकर ह्यांनी घडविलेली व चार साडेचार फुटांच्या चौथऱ्यावर विराजमान झालेली ही श्रीबाबांची प्रतिकृती म्हणजे ह्या विभागातील बहुसंख्य भाविकांचे एक आवडते श्रद्धास्थान होऊन बसले आहे.

आपल्या निःसीम भक्तांच्या मनात प्रेरणा उत्पन्न करून श्रीबाबांनी ठिकठिकाणी जुन्या देवळांचा जीर्णोद्धार करून घेतला, तसेच नवीन मंदिरेही उभी करावयास लावली. तसाच काहीसा प्रकार वरील मूर्तीच्या बाबतीत घडला. श्रीबाबांच्या एक निष्ठावान् भक्त श्रीमती चंद्राबाई बोरकर ह्यांना श्रीसाई-



**श्रीराम साई मंदिरातील श्रीबाबांची मूर्ति**

नाथांचा प्रत्यक्ष सहवास शिरडीत नित्य घडत असे. विलेपार्ले येथील भक्त-
मंडळींसह चंद्राबाई शिरडीस वारंवार जात व तेथे दीर्घकाळ वास्तव्य करीत.
भक्तश्रेष्ठ नानासाहेब चांदोरकरांच्या पत्नी शारदाबाई ह्यांच्याशी त्यांचे जिव्हा-

सोन्याच्या त्या द्वारकेसारखी साईरूप श्रीकृष्णांची ही द्वारकामाई आज समुद्राच्या तळाशी गेली. सर्व गोकुळवासीयांना पोरके करुन गेली.

मृत्युची वार्ता वायूहुनही चपळ. शीघ्र. ती पसरण्यास वेळ लागला नाही. माणूस पाठवावे लागले नाही. बसल्या जागीच ती सर्वांना मिळाली.

ती मिळाली मात्र, पोराटोरांसकट गावोगावीचे माणूस शिरडीच्या दिशेने धावत सुटले. मशिदीवरील ती दोन निशाणे दृष्टीस पडताच ऊर बडवून घेऊ लागले. दुःखाने मातीत लोळण घेऊ लागले. टाहो फोडून, आक्रोश करुन म्हणू लागले, "माउली! साईमाय! अशी कशी गे मला टाकून गेलीस! आता तुला कोठे शोधू? कोणाच्या तोंडाकडे मी पाहू? मनाची व्यथा, वेदना, तळमळ धावत येऊन आता कोणाला गे सांगू?"

गेल्या साठ वर्षातील बाबांच्या अनेक आठवणी लोकांच्या मनात गर्दी करू लागल्या. जणू आत्ता घडल्या, अशा डोळयांसमोर दिसू लागल्या. शोकामुळे मनोसागराला उधाण आणू लागल्या.

–एखाद्या तेजःपुंज योग्याने अनुष्ठानासाठी एकांतात जावे, तसे बाबा! तुमचे त्रिकाळचे ते लेंडीवर जाणे; साक्षात अन्नपूर्णा पायाशी लोळण घेत असतानाही एखाद्या अवधूताने झोळी किंवा कटोरा पुढे करून 'अल्लख निरंजन' ची हाक द्यावी त्याप्रमाणे एखादाच्या दारासमोर थांबून 'पोरी आण गे चतकूर भाकरी' असे अत्यंत मृदू शब्दात म्हणणे; कोणाशी कसलेही रक्ताचे नाते नसताना पुरुषांना काका, मामा, दादा, भाऊ आणि स्त्रियांना आई, मामी, मावशी अशी प्रेमाची नाती चिकटवून नित्य त्यांची चिंता वाहाणे; कोणी आठवण काढो किंवा न काढो, स्मरण करो किंवा न करो–त्यांच्या दुःखाच्या, संकटाच्या, अडचणीच्या वेळी कोणाचे तरी रूप घेऊन आपणहून हजर होऊन कोसळता कोसळता त्याला उभाच्या उभा सावरणे, हातीपायी त्याला धड राखणे ....

लेंडीवर जाण्याच्या निमित्ताने सकाळ–संध्याकाळ अनायासे दृष्टीस पडणारी ती गोजिरी तांबुस–गौर पाउले; दुःखी, कष्टी, उदास भक्तांना धीर देणारे, अभय देणारे ते प्रेमळ, निर्मळ हास्य; मशिदीच्या कट्टयावर उभे राहून, प्रेमळपणे हसून, मोठया प्रेमाने भक्तांच्या कपाळी उदी लावून, उदीचा तोच हात मस्तकावर ठेवीत भक्ताला पूर्ण आशीर्वाद देणारी तुमची ती दिव्य मूर्ति-बाबा! या डोळयांना पुन्हा दिसणार नाही. कधीच दिसणार नाही.

बोटाने गूळ तर दाखविणे, पण योग्य तेच औषध भक्ताच्या पोटी जात आहे ना, हे मुख्य पाहाणे; 'शामा, त्याला म्हणावे दुसरे काहीही करू नकोस एक माझे नाव घे म्हणजे बरा होशील', असे पुनःपुन्हा कळवळून सांगणे; 'अरे, माझ्या भक्तांच्या घरी अन्नवस्त्राला काही कमी पडणार नाही, मग

उगाच चिंता का करता?' असे आश्वासन भक्तांना पुनःपुन्हा देणे; 'ही अमीरी म्हणजे श्रीमंती क्षणभंगुर असते रे, तिच्या नादी लागू नका, खरी टिकाऊ श्रीमंती, बादशाही म्हणजे ही एक फकीरीच,' हे पुनःपुन्हा भक्तांना सांगणे; स्वतःच्या फकीरी आचरणाने त्यांच्या मनावर कायमचे बिंबविणे — हे सारे बोलणारे बाबा आज कोठे गेले? पाहता पाहता दृष्टिआड कसे झाले?

रामनवमीच्या उत्सवात बाबा आता तोडे, पगडचा अशी बक्षिसे कोण लावील? गावोगावीची तरणीबांड पोरे जमवून, त्यांच्या कुस्त्या लावून, त्यांचे कौतुक कोण करील? गोकुळअष्टमीचा गोपाळकाला, दहीहंडी; ईदचा नमाज आणि मोहरमची ताबूदांची मिरवणूक यात पोरासोरांच्याही भावनेशी समरस होऊन आनंदी आनंदाचे साम्राज्य बाबा, आता कोण निर्माण करील? सर्वांना एक आनंद मुक्त हस्तांनी भरभरून कोण वाटील?

खरोखर, हे सर्व गावच आज स्मशानवत् झाले. तुम्हांविना एक क्षण जगणे नको, असे गावातील लहानथोरांना होऊन गेले.

शिक्षित, जाणती, ग्रंथपठण केलेली भक्तमंडळी बाबांनीच वेळोवेळी दिलेला विवेकाचा संदेश आठवून स्वतःचे मन आवरू लागली. तरी पण त्यांच्याही मनात दुःखाचे काहूर माजू लागले. मनात न कळतच शोकमेघ जमा होऊ लागले. मौन मोडून अश्रू डोळ्यांवाटे वाहू लागले.

अणिमा, लघिमा, महिमा इत्यादी अष्टसिद्धी आणि नवनिधी दासीबटकी-प्रमाणे पायाशी असूनही बाबा, तुमची केवढी नम्रता! नानावल्लीने 'उठ' म्हणताच आपली गादी सोडून तुम्ही उठला! आपल्या गुरूंविषयी बोलताना अनेकवेळा भक्तिप्रेमाने गहिवरला! स्वतः दत्तावतार असूनही ज्या ज्यावेळी श्रीदत्तात्रेयांचा उल्लेख आला, त्या त्यावेळी तुम्ही हात जोडले! फार काय, आम्हां भक्तांविषयी बोलताना एक दिवस आत्यंतिक विनयभावाने, कृतज्ञबुद्धीने तुम्ही म्हणाला, "अरे, तुम्हा भक्तांचे ऋण मी कसे फेडू? जन्मोजन्मी ते ऋण फिटणार नाही. मी येथे आलो तो केवळ तुमचे दर्शन घ्यावे म्हणून! तुमच्या पायांची धूळभेट व्हावी म्हणून! अरे, मी कसला देव! मी तर तुम्हा भक्तांचा दासानुदास! तुमच्या विष्ठेपोटीचा किडा! तुमची भेट घडली, तुमच्या प्रेम-भक्तीच्या तरंगावर मी पोहलो, हसलो, खेळलो, बागडलो. याहून काय सांगू? काय बोलू? तुमच्या प्रेमामुळे खरोखर या भूतलावर येऊन मी धन्य झालो. कृतार्थ झालो."

स्वतः परब्रह्म. पण परमानंदस्थितीची माधुरी अनेक भावार्थी भक्तांना तुम्ही मध्यरात्री निद्रेमाजी चाखविली. दाखविली. बाबा! केवढी ही विनयवृत्ती!

भक्तांवरील केवढे हे तुमचे निस्सीम प्रेम! त्या प्रेमाला आम्ही सर्वजण आज अंतरलो. पोरके झालो. हे पोरकेपण आता आयुष्यात कधी तरी संपणारे आहे काय? हा देह डोळ्यांना पुन्हा कधी तरी दिसणार आहे काय?

खरोखर पिता हा केवळ जन्मदाता. पण जन्म न देताही आपल्या प्रिय लेकरांचा, भक्तांचा गळा जन्ममृत्यूच्या पाशातून सोडवून त्यांना केवळ अमरत्व देणाऱ्या एका अध्यात्मिक पित्याच्या ऋणातून, तुमच्या ऋणातून बाबा, आम्हा पुत्रांना कधी तरी मुक्त होता येईल काय? तुमचे ऋण जन्मोन्जमी तरी फिटेल काय?

जो मूळ निर्गुण–निराकार, भक्तवात्सल्यामुळे सगुण–साकार झाला; सुख दुःख, जन्म–मृत्यू यांच्या स्वनिर्मित लटक्या बंधनात अडकून पडला; त्यांची दुःखे अंगावर घेऊन स्वतः भोगली; त्यांचे चुकणारे पाऊल प्रतिक्षणी सावरले. —अशा वत्सल गुरुमूर्तिला उपमा तरी कोणती द्यावी? परीस, कल्पवृक्ष, जननी अशा रूढ उपमाही येथे थिटयाच! अपुऱ्याच!

कोणाचे श्रम फुकट घेऊ नयेत; पूर्वजन्मीचे काही लागेबांधे नसता कोणी कोणाकडे जात–येत नाही, म्हणून कोणालाही हडहड करू नये; विष्टा खाणाऱ्या डुकराप्रमाणे निष्कारण परनिंदा करणाऱ्या माणसाकडे आपण लक्ष देऊ नये; ज्योतिषी सांगतो म्हणून त्याच्यावर विश्वासून उत्तम अंगिकृत कार्यापासून परावृत्त होऊ नये; परधर्माची निंदा–नालस्ती करू नये; पैशासाठी देवापुढे नाचगाणे करू नये; जे वडीलधारे; गुरु असतील त्यांच्यापुढे फार चतुराई दाखवून आपली अक्कल पाजळवू नये. स्त्रियांना आईबहिणींसमान लेखावे; गुरुवचनावर पूर्ण श्रद्धा ठेवावी; हातून घडलेल्या अपराधाबद्दल पश्चाताप वाटून देवाची करुणा भाकावी; गुर्वाज्ञा कधीही ओलांडू नये; अतिथीला कधीही विन्मुख होऊ नये; बोललेला नवस, दिलेले वचन कधीही विसरू नये; साधु-संतांना कधीही छेडू नये; पोटाची चिंता कधीही करू नये; देव देईल त्यात आनंदी वृत्तीने, त्याचे स्मरण करून राहावे; सर्वांना एक प्रेम द्यावे, प्रेम घ्यावे —अशी किती परीची शिकवण बाबा, तुम्ही येता-जाता, उठता-बसता, बोलता-चालता आम्हांला दिली! आता असे सांगणारे, सुधारून घेणारे, सांभाळणारे जगात आम्हांस कोण उरले? आज आम्ही सर्वस्वी पोरके झालो! अनाथ झालो!

लहान–थोर, ज्ञानी–अज्ञाणी, स्त्रिया–पुरुष, कोणीही असोत. मातृ-पितृ-विरहाचा प्रसंग सर्वांना सारखाच. बाबा तर सद्‌गुरुरूपाने अवतरलेले सर्वांचे माय–तात. त्यांचा हा चिरविरह भक्तांना कसा सहन होणार? हळुवार मनाची माणसे हळूहळू एकमेकांना बाबांच्या आठवणी सांगून रडू लागली. बाबांचे आपणावर केवढे ऋण या भावनेने शोकाकुल झाली. म्हणू लागली, "गोकुळाष्टमीचा

उत्सव पाहण्यास मी बेलापुरास मुलाकडे निघाले तर इकडून परवानगी मिळेना. पण बाबांनी माझ्या वडिलांप्रमाणे कैवार घेतला. म्हणाले : गेल्यासारखी बेलापुरास चार दिवस राहून ये."

कोणी म्हणाले, "ठाण्यास येऊन नऊ रुपये फकिराच्या रूपाने माझ्या हातावर ठेवले." कोणी म्हणाले, "गुरुपौर्णिमेचा शिरडीत न घेतलेला रुपया नाशकास नरसिंगजीमहाराज यांच्या रूपाने काळ्या रामाच्या मंदिरात घेतला. आणि माझ्या मनास समाधान दिले."

कोणी म्हणाले, "आता ही चाकरी मला पुरे झाली. मी पोटाचा स्वतंत्र व्यवसाय करणार असे बाबा म्हणाले; आणि खरोखरच पुढे नोकरी सोडून नाशकास मी 'आनंदाश्रम' काढला." कोणी म्हणाले, "माझ्या स्वप्नात माझे मृत वडील रोज येत आणि मला छळत. पण बाबांनी उदी दिल्यापासून ती पीडा बंद झाली." कोणी म्हणाले, "वृद्धापकाळच्या आर्थिक विवंचनेने आमचे वडील खचले. पण बाबांची कृपा झाली. आणि कंपनीला करुणा वाटून तिने वडिलांचे पेन्शन अकल्पितपणे एकशे दहा रूपये इतके भक्कम केले. त्यामुळे सर्व कुटुंबच चितामुक्त झाले."

कोणास राम, विठ्ठल इत्यादी देवतांच्या रूपाने दर्शन; तर कोणास स्व-गुरूच्या रूपाने दर्शन. कोणास 'राजाराम' 'राजाराम' यासारखा एखादा मंत्र; तर कोणास 'माझे स्मरण केल्याविना काहीही खाऊ नको' किंवा 'मुका तुझ्या आईने घेतला तर काय बिघडले रे' यासारखा गोड उपदेश. तुटणारी हृदये प्रेमाने जोडून घेण्याची, हरिचरणी पुन्हा एक करण्याची वत्सल पित्याची ही दूरदृष्टी एका बाबांबिना दुसऱ्या कोणालाच येणार नाही.

चंचल वृत्तीच्या भक्तांकडे पाहून 'तू माझ्याकडे अनन्यभावे बघशील तर मीही तुझ्याकडे बघेन' असे ते मनमोकळे बोलणे; 'तुम्ही कोणीही असा, कोठेही असा, माझ्यापुढे पसा पसरताच मी काय हात आखडता घेईन?' असे ते दिल-खुलास आश्वासने देणे; 'अरे घरी बसून तुम्ही हाक मारा, ती मला येथे ऐकू येते की नाही पाहा', असे पुनःपुन्हा तळमळीने सांगणे; 'सुख काय किंवा दुःख काय – ते मानण्यावर आहे' अशी कष्टी झालेल्या माणसांची पुनःपुन्हा समजूत काढणे; 'ज्ञान रामफळासारखे तर भक्ती सीताफळासारखी, म्हणून ती भक्तीच तुम्ही पिकत घाला' असा साधक भक्तांना वारंवार उपदेश करणे; 'अरे कोणाचे मन दुखवू नका रे. त्यामुळे मला दुखणे येते' असे तळमळून सर्वांना सांगणे; 'तुम्ही मला एकपट द्या, मी तुम्हांला त्याच्या दसपट, शतपट देईन,' असे स्पष्ट आश्वासन देणे; 'मी-माझे पार हाकावे, अभिमान रहित होऊन नित्य व्यवहार

करावा, देवादिकांना देऊन जे उरेल ते प्रसाद मानून, भक्तीने स्वीकारावे, कसलाही लोभ, इच्छा, वासना मनात आणूही नये.' हे सर्व धर्मांचे थोर तत्त्व नित्य आचरणात ठेवून मगच सर्वांपुढे ते तत्त्व प्रसंगोपात्त बोलणे-सांगणे; तरीही एखाद्या सामान्य माणसाप्रमाणे शामरावांना मवून मवून म्हणणे; 'शामा, तो नारायण तेली फार चळला रे! मला फार छळतो बघ!'

बाबांच्या अशा शेकडो आठवणी काढून, त्यांचे शब्द आठवून आठवून मशिदीबाहेर उभे राहून लोक रडत होते. लहान मुलांप्रमाणे रडत होते.

बाहेर असा आक्रोश सुरू होता. तर आतील मंडळींच्या डोळ्यांना मूक अश्रूंच्या धारा लागल्या होत्या. जणू कायम विसावलेल्या या शंभुमहादेवाच्या चरणी कृतज्ञतेचा अखंड अभिषेक सुरू होता.

काकासाहेब दीक्षितांचे मन तर विशेषच व्याकुळ झालेले दिसत होते. गेल्या नऊ वर्षांतील बाबांच्या सहवासातील शेकडो प्रसंग त्यांच्या मनःपटलावर तरळत होते. मुखाने म्हणत होते; बाबा, माझ्यासारख्या अमृत प्यायलेल्या तुमच्या लेकराला हे अश्रू शोभणार नाहीत हे मला कळते. पण देहाच्या मर्यादा मी कशा ओलांडू? ते या क्षणी तरी अशक्य आहे.

एक काळ असा होता की स्वतःच्या अक्कलहुषारीने तयार केलेल्या बेड्या अंगाखांद्यावर वागविण्यातही मी भूषण मानले. पण त्या बेड्या जेव्हा माझ्याच मांसाचे लचके तोडू लागल्या, तेव्हा मला खरी जाग आली. रडत रडत मी येथे आलो. म्हणालो; "देवा! ती विद्या नको. ते धन नको. तो मान नको. एकच वरदान मला द्या — गुंतलेला माझा गळा या भवपाशातून सोडवा.

माझे नाव लोकांच्या दृष्टीने मोठे. यात्रेकरूंना उतरण्यासाठी वाडा मी बांधला असा डांगोरा सर्वांनी पिटला. दानशूर, धर्मनिष्ठ वगैरे बिरुदे माझ्या नावाला पुन्हा चिकटविली. हे पाहून मी मनोमन कासावीस झालो. पण नंतर ध्यानी आले की वाड्याच्या रूपाने तुम्ही मला अहोरात्र जवळ केले. जणू मला म्हणाला, "थंडी-वाऱ्याला पडणारी माझी लेकरे रात्रीच्या वेळी मी तुझ्या ओसरीला आणून झोपविली आहेत. यात तुझे मोठेपण कोठे आले? अहंकार तरी कोठे उरला"?

मी सात्त्विक, मी ब्राह्मण, क्रूरकर्म मी न करणारा हा उरलासुरला अहंकारही माझ्या हाती तीक्ष्ण सुरी देऊन तुम्ही छाटून टाकला. जणू मला म्हणाला, "अरे तू मारता आणि हे मरते' हा केवढा उग्र अहंकार! सद्‌गुरू तुला जी आज्ञा करतील ती पाळणे एवढेच तुझे काम. येथे शुभ-अशुभ, सुकर्म-कुकर्म म्हणणारा तू कोण!"

दादा केळकरांसारख्या जुन्या वृद्ध, नित्य ब्रह्मकर्म करणाऱ्या निस्सीम भक्ताची परीक्षा तरी याहून काय निराळ्या रीतीने पाहिली? त्यांना एक दिवस तुम्ही म्हणाला, "तू कोऱ्हाळे गावी जाऊन माझ्यासाठी सागुती घेऊन येतोस काय? तर हे रुपये घे आणि तावडतोब नीघ. तू स्वतःच जा."

बिचारे दादा वयामुळे गलितगात्र. एक मशीद आणि दुसरे आपले राहाते घर, यांच्या पलिकडे कोठे दूर जाण्याची ताकद त्यांच्या अंगात नाही. पण गुरुसेवेची संधी चालून आली असे पाहून आपले म्हातारपणही विसरले. तरुणाहून तरुण झाले. चरणी मस्तक ठेवून आज्ञा शिरसावंद्य मानून, घरी जाऊन अंगात कपडे घालून पाच मिनिटात निघाले सुद्धा. दादांची ही प्रबळ निष्ठा पाहून शेवटी तुम्हीच म्हणालात "अरे, तू म्हाताऱ्या माणसाने जाण्यापेक्षा दुसऱ्या कोणास कोऱ्हाळ्यास का पाठवीत नाहीस? तर तसे कर."

दादा पांडू गड्याला पाठवू लागले. तेव्हा तुम्ही म्हणाला, "दादा, आज राहूदेच तो बेत! पुढे पाहू कधी तरी एक दिवस!"

विचारांच्या तंद्रीतून जाग येऊन काकासाहेबांनी निद्रित बाबांच्या चेहऱ्याकडे पाहिले.

तो चेहरा एका मृताचा नव्हता. योगनिद्रा घेत असलेल्या एका महात्म्याचा तो चेहरा होता. अपार तेज, अपार शांती यांचे ते मंगलधाम होते. जणू हरिगोष्टी बोलता बोलता, हरिप्रेमात रंगता रंगता समोर आलेल्या देदिप्यमान विमानात बाबांनी पाऊल ठेवले होते!

'विमान' या शब्दाबरोबर मधाच्या मोहोळाप्रमाणे गोड असलेले एक आश्वासन काकासाहेबांच्या अंगप्रत्यंगातून सुगंधाप्रमाणे दरवळले. आपल्या अंतकाळाबद्दल एक दिवस काका सचिंत झाले, तेव्हा बाबा त्यांना म्हणाले होते, "काका, तुझ्या अंतकाळची काळजी का करतोस? मी तुला एखाद्या फुलाप्रमाणे विमानातून नेईन!"

हरिगोष्टी बोलता बोलता, हरिचिंतनी रंगता रंगता, बसल्या जागी ज्योत शांत व्हावी, देह कोणा निकटवर्तीयाच्या खांद्यावर विसावावा, यापरते विमानातून जाणे दुसरे कोणते! बाबांनी जे आश्वासन मला दिले त्याचा अर्थ आपल्या या देहविसर्जनामुळे त्यांनी मला सांगितला तर नाही!

काकासाहेब अशा विचारात आहेत तोच श्रीमंत बापूसाहेब बुटी कळवळून त्यांना म्हणाले, "काकासाहेब, मंदिर उभे राहिले. पण देव मात्र निघून गेला हो! आता त्या वास्तूला काय शोभा! जगातील अनेक वास्तूंपैकी शिरडीच्या या माळावर उभी राहिलेली ही एक वास्तू!"

श्रीमंत बुटी मुखाने असे बोलले. पण आतून कोणी त्यांना जणू रोखले.

आतील तो आवाज जणू म्हणाला, "ही सुंदर वास्तू उभी करण्यास बाबांनी जी संमति दिली, ती तिची ओसाड धर्मशाळा होण्यासाठी नव्हे. बाबा केवळ देहाने गेले. मनाने या वास्तूत त्यांचा वास कायमचा आहे. जशी द्वारकामाई, जशी चावडी, तसाच हा वाडा!'

बापूसाहेब जोगांच्या मनात बाबांच्या शेकडो आठवणी जाग्या होत होत्या. हाताचे बोट धरून, इतर अनेक भक्तांप्रमाणे ज्या क्रमाक्रमाने बाबांनी त्यांना प्रपंचकर्दमातून ओढून वर काढले, ते सर्वच्या सर्व प्रसंग चालणी त्यांना आठवू लागले. पण त्यातील सर्वांत महत्त्वाची आठवण आज मन पुन्हा पुन्हा कासावीस करू लागली. गाल अश्रूंनी चिंब करू लागली.

एक दिवस मशिदीत दुसरे कोणी नाही असे पाहून बापूसाहेब जोगांनी बाबांना विचारले. म्हणाले, "देवा, आज अनेक वर्षे हातून गुरुसेवा घडत आहे. पण अंतर्यामी चित्ताला शांति नाही याला काय म्हणावे! राहून राहून वाटते की आपल्या गुरुसेवेतच काही कसर राहिली. उणे राहिले. ते कशा रीतीने दूर करावे म्हणजे चित्तशांति लाभेल?"

बाबा त्यावेळी त्यांना म्हणाले, "अरे, चित्तशांती काय अशी सुखासुखी लाभते? ती होण्यासाठी बाबा, दुष्कर्माची आधी होळी, राखरांगोळी व्हावी लागते. ती होऊन, तुझ्या काखेला जेव्हा झोळी पाहीन तेव्हाच मी म्हणेन की तू अखेर जिंकलीस! खरा माझा झालास!"

बाबांचे हे आशीर्वादरूप बोल कानांनी केवळ ऐकताच बापूसाहेब जोगांना केवढा तरी धीर आला. म्हणाले, "देवा, आता मनाचे पूर्ण समाधान झाले. पूर्ण निश्चित झालो. अशीच कृपा मजवर असावी."

काठोकाठ भरलेला पाण्याचा हौद हिंदकळून पसाभर पाणी सांडावे त्याप्रमाणे माणसे वर येतच होती. बाबांच्या चरणी मस्तक ठेवीत होती. क्षण, दोन क्षण गदगदून रडत होती. मग आपणच शांत होऊन, डोळे पुसून, दोन्ही हात बाबांच्या चरणी जोडून खाली उतरत होती. येणाऱ्या दुसऱ्या व्यक्तींना मूकपणे वाट देत होती.

नानासाहेब निमोणकर, बापूसाहेब जोग, दादा केळकर ही मंडळी तर नोकरी-धंदा, व्याप-संताप मागे टाकून, कायमची येऊन येथे राहिलेली. झाडलोटीपासून पूजा-आरतीपर्यंतच्या सर्व कार्यांत निरहंकारी होऊन निरलसपणे दिवस-रात्र राबत असलेली. बाबांच्या देहावसानाच्या वार्तेमुळे त्यांच्या जीवनाचा आधारस्तंभच जणू कोसळला. शिरडीतील अस्तित्वच जणू संपुष्टात आले. म्हणू लागले. "या शिरडीत आमचे आता कोण आहे? वडील गेल्यानंतर मुले पोरकी होतात, तसे आम्ही आज पोरके झालो."

माणसे येत होती जात होती. अश्रूंची श्रद्धांजली वाहत होती. कोलंबा, टमरेल, सटका, धुनीमाई यांच्या शेकडो आठवणी आठवत होती, "बाबा गेले. आता उरल्या त्या त्यांच्या आठवणी. केवळ आठवणी!"

बाबांच्या प्रिय वस्तूंपैकी एक – अंगणातील ती चूल पाहून तर भक्तांच्या पोटात आज शोकामुळे कालवत होते. तिच्यावर बाबांनी चढविलेली हंडी जुन्या मंडळींच्या डोळ्यांसमोर जशीच्या तशी दिसत होती. जणू या क्षणीही ती हंडी खतखतत आहे! तिच्यासमोरील या अंगणात शे-दोनशे माणूस मोठ्या प्रेमाने प्रसादभोजन घेत आहे! स्वतः बाबा आग्रह करून प्रेमाने त्यांना वाढत आहेत!

आपण स्वतःच सूप–बुट्ट्या–पोती घेऊन उठल्या उठल्याच पेठेत जावे. तांदूळ, जोंधळे, गहू, डाळ वगैरे उत्तम धान्य चार ठिकाणी दराची चौकशी करून रोख पैसे मोजून खरेदी करावे. मग धान्य निवडून स्वतःच मशिदीतील जात्यात दळावे. डाळ भिजत टाकावी. मिरच्या, कोथींबीर धुवून, स्वच्छ निवडून घ्यावे.

वाटली डाळ करण्यासाठी मीठ–मिरची, जिरे-मिरे, नारळ–खोबरे लागणारे तेही येताना उत्तमपैकी निवडून आणावे. पाट्यावर उत्तम ताजा मसाला वाटावा तो मसाला खतखतत्या हंडीत टाकावा. कणकेची मुटकुळी, रोडगे, पानगे करून हंडीतील शिजत्या वरणात हळुवारपणे सोडावेत. मुगवड्या करून त्याही अशाच रीतीने हंडीत सोडाव्यात. मग चुलीतील लाकडे खाली-वर करून चांगला जाळ लावावा. तो नीट लागला आहे अशी खात्री झाल्यानंतर मग दुसरीकडे वळून कणीक चांगली तिंबून तिंबून तिचे सव्वा हाती वेटोळे करावे. ते लाटून मोठे मोठे पोळे करावेत. ताकात जोंधळ्याचे पीठ मिसळून आंबील करावी. सर्वांना वाटण्यासाठी ती एका बाजूस ठेवून द्यावी.

मग हंडी पुरती शिजून तयार झाली असे पाहून स्वतःच्या हातांनी ती खाली उतरावी. मशिदीत नेऊन ठेवावी. मुल्लास किंवा ब्राम्हणास बोलावून मंत्रोच्चार करवून ती हंडी प्रोक्षण करावी. पत्रावळी घेऊन पंगत बसण्यापूर्वी हंडीतील काही अन्न एका भांड्यात काढावे. म्हाळसापती आणि तात्याबा यांच्या घरी पाठवावे. एवढे झाले की कफनी वर खोचून स्वतः आग्रह करकरून सबंध पंक्तीस वाढावे. म्हणावे, "घ्या घ्या. देवाचा प्रसाद आहे. नाही म्हणू नये. टाकू नये."

स्वर्गातील देवांनीही हेवा करावा असा हा प्रसाद. अमृतमय प्रसाद. तो बाबांच्या हातून ज्यांना लाभला, ते खरोखर धन्य झाले. अमर झाले. जीवनमुक्त झाले.

जन्म-मरणांच्या सीमा पार करून केवळ सच्चिदानंदरूप होऊन उरले!

भक्तांच्या, अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांसमोर अशी अनेक प्रेमळ दृश्ये उभी राहिली. गोकुळांतील त्या वनमालीची आठवण क्षणोक्षणी करून देऊ लागली.

एका दृश्यात तर बाबा स्वहस्ताने मशीद सारवीत आहेत. धुनीलगतच्या सर्पणाची भिंत महादूला हाताखाली घेऊन स्वतः बांधत आहेत. एखाद्या निष्णात गवंड्याप्रमाणे हातात थापी घेऊन विटांचे थरच्या थर बोलता बोलता रचत आहेत. कधी पालथी मांडी घालून सुईदोरा घेऊन आपली फाटलेली कफनी किंवा लंगोट दोरा घालून शिवत आहेत.

बाबांच्या अशा किती आठवणी! किती प्रसंग! मुलालेकरांवर मायेचे पांघरुण घालून दृष्टिआड झालेल्या प्रेममूर्ती, त्यागमूर्ती मातेप्रमाणे बाबा गेले. कोणासही आधी काही न सांगतासवरता गेले.

बाबा असे कसे अकस्मात गेले हीच एक बोच सर्व भक्तांच्या तोंडी आता ऐकू येऊ लागली. मशिदीत बाबांच्या शेजारी बसलेल्या भागोजी शिद्यांपर्यंत पोचली. ती ऐकून, इतका वेळ अश्रू गाळीत असलेला भागोजी डोळे पुसून अकस्मात म्हणाला, "बाबा अचानक गेले नाहीत. एक वर्ष आधीच सांगून मग गेले. बाबांनी कधी कोणाला फसविले नाही. मग ते आता तरी कसे फसवितील?"

माना वर करून सर्व लोक पाहू लागले. भागोजी आता कोणते रहस्य सांगणार याबद्दल उत्सुक झाले. तोच भागोजी म्हणाला, "आज दसरा. गेल्या वर्षी याचवेळी बाबांनी कोणता प्रकार केला होता तो आठवा."

बसलेले सर्व लोक क्षणभर विचारमग्न झाले. तो प्रसंग आठवू लागले.

त्या दिवशी शिलंगणाच्या वेळीच – शिलंगणाहून परतून लोक मशिदीत येतात तोच एक भयंकर प्रकार तेथे घडला.

निरभ्र आकाशात अकस्मात मेघ जमावेत, विजांचा कडकडाट होऊ लागावा, सोसाटयाचा वारा सुटून झाडांचे शेंडे जमिनीला टेकावेत, तसा बाबांच्या मनात अनिवार क्षोभ निर्माण झाला. डोक्याचे फडके, अंगावरील कफनी, कमरेची लंगोटी–अशा एकूण एक वस्त्रांचा धुनीमाईच्या लाल-सुवर्णी ज्वालेत त्यांनी अकस्मात स्वाहाःकार केला. पूर्ण दिगंबर झाले. संतापाने लालेलाल होऊन पुढे आलेल्या सर्वांना म्हणाले, "बघा–नीट डोळे फाडून बघा! मी खरा कोण आहे ते! हिंदू का मुसलमान का आणखी कोणी! नंतर त्याचा वाद नको! मनात शंका राहायला नको. "

अग्नी मुळातच तेजस्वी. बाबांच्या देहावरील त्या पवित्र वस्त्रांच्या स्पर्शाने

तो अधिकच तेजःपुंज दिसू लागला. परंतु कोटी सूर्यांचे तेज देहावर झळाळत असलेल्या बाबांसमोर त्याने तेज वाढले तरी ते केवढे! बाबांच्या तेजासमोर तो फिका पडला! जणू म्हणू लागला, "साक्षात परमात्मा माझ्या समोर उभा असताना त्यांच्यासमोर मी मान तरी कशी उंच करू? ती माझी योग्यता नव्हे."

बाबांचे ते उग्र रूप पाहून जमलेल्या मंडळींच्या हातापायांना भीतीने कंप सुटला. पुढे होऊन बाबांना लंगोटी नेसविण्याची छाती कोणासही होईना. त्यावेळी महाव्याधीने पीडलेला हा भागोजी शिंदा मोठ्या धीराने पुढे झाला. म्हणाला "असे काय करता बाबा! आज दसरा. सणाचा–शिलंगणाचा दिवस. सोने देण्यासाठी हे एवढे लोक आले आहेत. निदान ही एवढी लंगोटी तरी नेसा.

हे ऐकून बाबांचा क्षोभ आणखीनच वाढला. भागोजीला हातातील सटक्याने मारू लागले. म्हणू लागले, "दसरा? शिलंगण? हे बघ माझे शिलंगण! झाले बघ माझे शिलंगण!"

शिलंगण म्हणजे सीमोल्लंघन. सीमा उल्लंघन करून पलिकडे जाणे. ज्या चैतन्यातून येणे झाले त्या चैतन्यात पुन्हा मिसळून जाणे.

बाबा म्हणजे ते मूर्तिमंत चैतन्य. साकार झालेले ते परब्रह्म. सगुण झालेली ती चित्‌शक्ति. तिला जात, धर्म, पंथ, पक्ष असा चिंधोट्या चिकटविणे म्हणजे आकाशाला वस्त्र नेसविण्याचा प्रकार!

मी मुक्त आहे, नित्यमुक्त आहे, अनादि आहे, अनंत आहे हे सूचित करण्याचा बाबांचा उपाय म्हणजे तर ही दिगंबरावस्था नव्हे! लंगोटी–जानवे, शेंडी, दाढी, छाती–दंड, कमंडलू–कटोरा या सर्वांच्या पलिकडे राहणारा स्वयंप्रकाशित आत्मा म्हणजे मी, असे तर बाबांना या वेषावरून, या उद्‌गारावरून सूचित करायचे नसेल! मी माझ्या मूळ घरी चाललो हे तर बाबांना त्या दिवशी सर्वांना सांगायचे नसेल!

ही गोष्ट गूढ म्हणून एक क्षणभर राहो. पण बाबांनी वझे नावाच्या ब्राह्मणाला मशिदीत बोलावून रामविजयाची पोथी त्याच्याकडून अव्याहतपणे चौदा दिवस ऐकली ती काय उगाच! काहीच विशेष कारण नसताना!

अंतकाळी आजवर साधुसंतांनी, सज्जनांनी, भाविकांनी कोणाकडून तरी पोथी वाचून घेतली. ती मोठ्या प्रेमाने स्वतः श्रवण केली! मग स्वतः परमात्मा असूनही केवळ लोकसंग्रहार्थ शास्त्रसंमत आचरण करताना बाबा कसे बरे चुकतील? अंतकाळ निकट आला हे जाणून त्यांनीही रामविजयाचे दोन सप्ताह ऐकले. प्रकृती साधारण बरी नसतानाही उठून बसून तक्क्याशी टेकून ऐकले. म्हणाले, "पोथी मध्येच थांबवू नका. सप्ताह पुरा होईपर्यंत अस्खलितपणे चालवा."

मंडळी असा विचार करीत आहेत तोवर श्रीमंत बुटींनी एका ब्राह्मणास जवळ बोलावून सांगितले, "वाड्यात जाऊन आजचे पंचांग पाहा. तिथी–वार, नक्षत्र वगैरे सर्व सविस्तर पाहून मला येऊन कळवा."

तो ब्राह्मण वाड्यात जाऊन, पंचांग पाहून परत आला. श्रीमंत बुटींना म्हणाला, "आज विजयादशमी म्हणजे साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त. हिंदूंची आज विजयादशमी, मुसलमानांची आज कत्तलरात्र आणि बुद्धांची आज बुद्ध-जयंती. असे तीन धर्मांचे तीन सण आज एकत्र येण्याचा दुर्मिळ सुयोग आहे. दुपारी साडेबाराच्या ठोक्याला आज दशमी ही तिथी संपून एकादशी सुरू झाली. म्हणजे बाबांचे देहावसान एकादशीस झाले असे म्हणता येईल."

काकासाहेब दीक्षित गहिवरून म्हणाले, "हरिभक्तांचे देहावसान हरिदिनी होणेच योग्य. काशिराम शिंपी आणि अप्पा जागले यांनाही मरणसमयी एकादशी लाभली. बाबा तर साक्षात श्रीहरी. देह सोडण्यासाठी त्यांनी एकादशीचा पवित्र दिवस निश्चित केला तर नवल नाही."

बोलता बोलता अकस्मात काकासाहेबांनी तात्याबांच्या प्रकृतीची चौकशी केली. तेव्हा जवळच असलेला रामचंद्र पाटील डोळे पुसून बोलला, "आज दुपारपासून त्याच्या प्रकृतीला उतार पडला. आता त्यांची काळजी नाही."

---

**श्रीसाईलीलेचा या पुढील अंक**
**१ जानेवारी १९७६ रोजी प्रसिद्ध होईल**
**याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

# श्रीसाईबोधामृत

[ श्रीसंत कथामृत अध्याय ५७ ]

● द. शं. टिपणीस, ठाणे

श्रीगणेशाला वंदन करून माझ्याकडून हा ग्रंथ लिहून घ्या अशी दासगणू त्यास प्रार्थना करतात व श्रोत्यांना सांगतात की हा संत कथामृत ग्रंथ म्हणजे वसंत ऋतू आहे. त्यातील कथा म्हणजे आम्रवृक्ष होत. चमत्कार या वृक्षाच्या फांद्या, काव्य कोवळी पर्णे व बोध सुंदर फळे होत. तर श्रोतेहो, कोकिळे प्रमाणे या अमृत फळांचे सेवन करा. हा ग्रंथ म्हणजे मानस सरोवर आहे. पद्यरचना हे जल आहे. त्या जलात संत कथेची कमळे फुलली आहेत. ती कमळे बोधाच्या मधूने भरलेली आहेत. श्रोतेहो, तुम्ही भ्रमर होऊन तो आकंठ सेवन करा, एवढे सांगून दासगणू पुढे लिहितात की मागे भक्तलीलामृतात (अ. ३१, ३२, ३३), ज्या साईनाथांचे वर्णन केले ते शिर्डीग्रामनिवासी साई म्हणजे कल्पतरू आहेत. भवसागर तरून जाण्याचे तारु आहेत. भक्तवत्सल व ज्ञाननिधी आहेत, अशा या साईच्या दर्शनासाठी पौष महिन्यातील धनू संक्रमणाची पर्वणी साधून चांदोरकरादि मंडळी आली. धनुर्मासात सुप्रभाती सूर्याला नैवेद्य दाखवून भोजन करण्याची प्रथा आहे. शिर्डीच्या या ज्ञानसूर्याला भाव निष्ठेचा नैवेद्य दाखविण्यासाठी ही मंडळी धनुसंक्रातीला शिर्डीला आली. चांदोरकर, हरिपंत, निमोणकर वगैरे बरीच मंडळी होती. साईचरणी नत मस्तक होऊन चांदोरकर म्हणाले, "बाबा, दयाघना, यापूर्वी तीन चार वेळा तुम्हाला आम्ही प्रश्न विचारला, बरेच दिवस झाले. तुम्ही त्याचे अजून उत्तर दिले नाही, गुरूराया, तुम्ही आम्हा पामरावर असे का रागावलात? आज आम्हाला कृपा करून उत्तर सांगा. आम्ही तान्हेले आहोत. मी विचारलं होतं परमेश्वर हा कोण? तो कसा असतो? व कोठे असतो?" यावर बाबा बोलले "तुम्ही माझी मुले. आई लेकरांवर कशी रुसेल? लेकरे आईवर रुसू शकतात. माझे गुरु असते तर मी त्यांच्यावर रुसू शकलो असतो. असो.

मागे जे मी सांगितले त्याचे चांगले चिंतन मनन करा. त्यात (अ. ३१, ३२,३३) जे मी सांगितले ते अंगी बाणले की माणूस साधन चतुष्टय होतो. जेव्हा शिष्य साधनचतुष्ठ्य होतो तेव्हाच त्याला ब्रह्मज्ञान सांगावे. कारण ते कळायला व पचवायला तो योग्य झालेला असतो. आपले ध्येय गाठण्यासाठी ज्या ज्या गोष्टींचा वापर आपण करतो, त्याला साधन असे म्हणतात, ब्रह्मज्ञान

मिळविण्यास चार प्रकारच्या साधनाची जरूरी असते. साधकाने ती चार साधने मिळविली की तो ब्रम्हज्ञानास पात्र होतो. नित्यानित्य वस्तू विवेक, वैराग्य शमदमादी षटक आणि मुमुक्षता ही ती चार साधने होत. ब्रह्म सत्यं जगं मिथ्या अशी मनाची भावना होणे व त्याप्रमाणे वागणे म्हणजे नित्यानित्य विवेक आहे. असा विवेक आपल्या ठिकाणी आहे असे भासवून लोकांची फसवणूक करणारे पुष्कळ. पुष्कळसे पंढरीची वारी करतात, पण देव कोठे व कैसा कोण हे जाणत नाहीत. कित्येक भाराभार ग्रंथ शिकून विद्वत्ता मिळवितात पण अंतर शुद्ध नसते. लोकाना कोरडा उपदेश करतात. विद्वत्तापूर्ण वादावादी व दुसऱ्याची निंदा करून स्वतःचे मोठेपण मिरवणारेही पुष्कळ आहेत. असे हे सर्व लोक विवेकी नव्हते व ब्रह्मज्ञानाला योग्यही नव्हते. कोठल्याही विषयाची ज्याला बाधा होत नाही, जो विषयाच्या आहारी जात नाही, त्याबद्दल आशक्त नसतो तो वैराग्याची मूर्ती आहे. त्याच्या ठिकाणी पूर्ण वैराग्य आहे असे समजावे, शम, दम, तितिक्षा, उपरती, श्रद्धा व समाधान यांना शमदमादी षटक म्हणतात विषयात मनोनिग्रह असणे म्हणजे शम. विषयाठायी मन गेल्यास त्याला आवरून धरण म्हणजे दम. प्रारब्धे करून जी स्थिती प्राप्त झाली ती न कुरकुरता वा दुःख न करता भोगणे म्हणजे तितिक्षा. मायेत मन न गुंतणे, कनक कांतादी मिथ्या मानणे, याचे नाव उपरती. विश्वासयुक्त मन असणे म्हणजे श्रद्धा. सुखदुःखे समान मानणे, चित्त स्थिर असणे, कुठलीही तळमळ मनात नसणे म्हणजे समाधान, मुमूक्षू कोण हे मी तुला मागे सांगितले आहे. तशी पात्रता अंगी असणे म्हणजे मुमुक्षता. मोक्ष म्हणजे काय? मोक्ष म्हणजे वैकुंठ नाही की कैलास नाही, मोक्षाची वाट फारच अवघड आहे. जगाचे जे आदीकारण, जे मूळ चैतन्य. त्याच्याशी तादात्म होणे म्हणजे मोक्ष. त्या मोक्षपदाला जाणे हा खरा पुरुषार्थ." हे ऐकून लीनपणे चांदोरकर म्हणाले, "देवा, हे शुद्ध चैतन्य आहे कसे?"

"जगाला धारण करणारे, सगळे चराचर व्यापून उरणारे व ज्यात अखेरीस सगळ्या जगाचा लय होणारे आहे ते हे चैतन्यच फक्त सत्य आहे. जे जग आपल्याला दिसतं ते निव्वळ भास आहे. हे चैतन्य कसं आहे ते सांगता येणार नाही. पण त्याची साक्ष क्षणोक्षणी येत असते. चैतन्य नाही अशी एकही वस्तू अगर ठिकाण शोधूनही जगात कोठे मिळणार नाही. नामरूपे आपण देतो ते आपले व्यवहार सुकर व्हावे म्हणून, पण चैतन्याला नामरूपही नाही. ते नामरूपाच्या अतीत आहे. वाऱ्याला ना रंग ना रूप. तसंच हे. या चैतन्याला ब्रह्म असेही म्हणतात. ज्ञाते त्याची उपासना करतात. त्याना ब्रह्मवेत्ते म्हणतात. वृक्षकोटी, प्राणीकोटी, जीवकोटी, जंतू कोटी सगळी या चैतन्याच्या पोटी सामा-

बलेली आहेत या सर्वांना आद्य कारण हे चैतन्य आहे. ते सर्वव्यापक, क्लेश-रहीत व सत्य ज्ञान आनंदरूप आहे. तू काय, मी काय, त्या चैतन्याहून भिन्न नाहीत. या सर्वव्यापक चैतन्याला अव्यक्त असेही नाव आहे." हे ऐकून चांदोर-करांना शंका आली, ते म्हणाले "बाबा, मनात एक शंका येते, विचारू का माझी शंका?" बाबांनी मान डोलावली.

चांदोरकर म्हणाले, "बाबा, ब्रह्म क्लेशरहित आनंदमय सर्वाठायी नटलेले व सत्य आहे असे तुम्ही सांगितले. पण हे जग क्लेशयुक्त आहे. पदोपदी दुःखाचा अनुभव येतो. चैतन्य तर आनंदमय. त्याचा प्रत्यय मात्र येत नाही. शिवाय सत्य चैतन्य मिथ्यामाजी कसे राहील? जो जन्मांध त्याला लावण्य कधी दिसणार नाही. तसं सत्य हें मिथ्यामाजी वास करू शकणार नाही. आत्मा म्हणजे चैतन्य असे म्हटले तर चैतन्याचे एकत्व राहिले कोठे? कारण आत्मे अनेक आहेत, जेवढे जगात प्राणी तेवढे आत्मे. आत्म्यांची सुखदुःखे भिन्न भिन्न असतात. चैतन्यपर सुखदुःखातीत आहे. मग सर्वांत एकच चैतन्य आहे असे कसे म्हणावे? भिन्न गुणधर्मांची मैत्री एकजीव कशी असू शकेल? यावरून असे वाटते की शरीरे जशी भिन्न भिन्न असतात तसे. आत्मेही भिन्न असले पाहिजेत व चैतन्य आत्म्याहून भिन्न असले पाहिजे."

शंका ऐकून बाबा हसत म्हणाले, "वत्सा, नाना तू थोडासा चुकतो आहेस. तुझ्या शंकेचे उत्तर सांगतो. विषय गहन आहे. माझं म्हणणं नीट लक्षपूर्वक ऐक. समज पाण्याने भरलेली निरनिराळी ग्लासीस घेऊन त्या प्रत्येकात निर-निराळे रंग टाकले तर प्रत्येक ग्लासामध्ये हिरवे, पिवळे, निळे, तांबडे वगैरे निरनिराळे पाणी दिसेल. सगळ्या ग्लासात आपण एकाच प्रकारचे पाणी टाकले होते. पण दिसतं ते पाहून आपण असे म्हणू शकू का की ग्लासागणीक मूळ पाण्याचे भेद झाले? ग्लासातील पाणी मूळ पाण्याहून भिन्न आहे? दिसलं म्हणून काय झालं? सर्व ग्लासात तेच ते पाणी आहे; निराळे वाटते ते पाण्याची ज्याच्याशी संगती झाली त्याच्यामुळे. तांबड्याशी संगती झाली तांबडं भासतं. हिरव्याशी संगती झाली हिरवं भासतं. पण मूळ पाणी तेच. त्यात काही बदल झाला नाही. हे प्रकार पाहून जर कोणी असं म्हटलं की पाणी हिरवें, पिवळं वगैरे निरनिराळ्या रंगाचे असते तर आपण सत्य मानू का? त्याचे पृथक्करण केल्यास पाणी व रंग भिन्न होतील तसंच आत्मा व हृदय यांचे मीलन झाल्यास निरनिराळी सुखदुःखे प्रत्ययास येतात. हृदये भिन्न भिन्न आहेत. अनेक आहेत. तांबड्या रंगामुळे पाण्याच्या ठायी तांबड्याचा भास होतो तसं हृदयामुळे आत्म्याच्या ठायी सुखदुःखाचा भास होऊन तो आत्म्याचाच गुण आहे असे वाटते. वास्तविक सुख दुःख हा हृदयाचा गुण आहे. हृदयाला हृदय-

पण येण्यास त्याला आत्म्याच्या संगतीची आवश्यकता आहे. आत्मा आणि चैतन्य एकच. देह एकच असतो पण त्याला तीन अवस्था असतात. बाल्यपण, तरुणपण व वृद्धावस्था. तसं चैतन्य त्रिगुणात्मक आहे. पारमार्थिक, व्यावहारिक आणि प्रातिभासिक. ज्या आत्म्याला पारमार्थिक योग्यता आली तो संतांचा आत्मा होय. जो आत्मा विवेकाने व शास्त्रानुसार आचरण करतो तो व्यावहारिक होय. जो अज्ञानाने झाकला आहे असत्याला सत्य मानतो, तो प्रातिभासिक होय. प्रातिभासिक हे अज्ञान, व्यावहारिक हे सज्ञान व पारमार्थिक संत होत. हे सगळे भेद होण्यास कारण आत्मा आहे. नाना, मी जाणतो की आत्मा एकसंघी असून त्याचे भेद कसे होतील ही शंका तुला येत आहे. म्हणून अधिक फोड करून सांगतो. पहा, राजा, अधिकारी व राजदूत या तिघांना कारण एकच राजसत्ता आहे. तरी तिघे सारखे नसून त्यांच्यात भिन्नत्व आहे. राजाला सिंहासन मिळतं, वैभव मिळतं व तो आपल्या इच्छेप्रमाणे लोकांस वागवतो. राजाज्ञेप्रमाणे अधिकारी वर्ग वागत असतो, तो राजावर अवलंबून असतो. राजाज्ञेची अमलबजावणी राजदूत करतात. त्या बाबतीत त्यांना स्वतंत्रता नसते. रयत राजाश्रयाने नांदत असते. या सगळ्या व्यवहाराला मूळकारण राजसत्ता आहे. राजेपण काय, सचिवपण काय, राजदूतपण काय हे सर्व राजसत्तेवर अवलंबून आहे. राजसत्ता ही या सर्वांपासून भिन्न आहे. एक राजा मेला तर राजसत्ता नष्ट होत नाही. ती कायम राहते. यावरून राजसत्ता ही राजा अधिकारी वगैरे पासून भिन्न आहे हे उघड आहे. राजसत्तेशी ज्याचे तादात्म्य होते तो राजा होतो. तिचाच अंश अधिकाऱ्यात असतो आणखी कमी अंश राजदूतात असतो. असं असलं, भेद दिसले तरी राजसत्तेचे तुकडे पडत नाहीत. ती अखंडच असते. पण तिचा आधार मिळाल्यास निरनिराळी कार्ये होतात. नाना, तू जो गादीवर (पूर्वी खुर्च्या नव्हत्या) बसतोस ते राजसत्तेच्या जोरावर. तुझा शिपायी तुझ्या डोक्यावर पंखा हलवतो तो राजसत्तेच्या जोरावर तुम्हा दोघानाही आधार एकच – राजसत्ता. तसेच पारमार्थिक, व्यावहारिक व प्रातिभासिक असे भेद आत्म्यामुळे होत असले तरी आत्मा हा अखंडच आहे" यावर चांदोरकर म्हणाले की अखंड राजसत्तेचे अंश कसे होतील? झाले तर तिचे अखंडत्व राहिले कोठे? बाबा म्हणाले, "राजसत्ता अखंड. अभेद आहे हे सत्य, पण व्यवहारात तिची विभागणी झालेली दिसते हेही खरंच आहे. असंच अखंड अनंत चैतन्याबद्दल म्हणता येईल. राजसत्तेचे खंड होत नाहीत. पण व्यवहारात ज्याला त्याला त्याच्या कार्यापुरती राजसत्ता मिळते. यामुळे अंश खंड झाल्याचा भास होतो. सर्वप्रसिद्ध असं उदाहरण सांगतो. आकाश हे अखंड एकसंघी आहे. त्याचे भाग पाडता येत नाहीत, नदी, नाले, डबके

बालदी इत्यादी मध्ये आकाशाचे लहान मोठे भाग दिसतात हे आपण पहातो.
मग नाना, असं सांग की आपण असं म्हणावं का की त्या अखंड आकाशाचे
लहान मोठ्या आकाराचे खंड झाले म्हणून? (नाना नकारार्थी मान हलवतात)
तसंच चैतन्याबद्दल, पाण्यातील निरनिराळी आकाशे हा जसा भास तसंच, हे
सर्व जग, चैतन्याचे भेद वाटतात तो भास आहे. हा सगळा मायेचा खेळ
आहे. ब्रह्म आणि माया ही जेव्हा एकचित्त झाली तेव्हा हे सर्व ब्रह्मांड निर्माण
झाले. यावर नानासाहेब पुसतात की देवा, ही माया कोण? तिला कधी कोणी
निर्माण केले? ती कशी असते ? आपण सांगता की जगाचे आद्य कारण चैतन्य
आहे. ही सर्व सृष्टी चैतन्याहून भिन्न नाही. मग ही माया आली कोठून व
कशी? कृपा करून हे सर्व मला नीट समजावून सांगा. बाबा सांगतात, "चैत-
न्याची जी शक्ती तीच माया. या मायेने शक्तीने चैतन्य संपूर्णपणे व्यापलेले
आहे. चैतन्य व माया ही निराळी करता येत नाहीत. गुळाची गोडी त्याच्या-
पासून निराळी काढून दाखविता येईल काय? सूर्य व त्याची प्रभा ही अलग
अलग करता येतील काय? अशीच गोष्ट ब्रह्म व माया यांची आहे. सूर्य
आणि त्याची प्रभा असे जरी दोन शब्द आहेत तरी दोहो मिळून सूर्य आकाराला
येतो. आपल्या प्रभेकरवीं सूर्य स्वतःचे ज्ञान, जगाला करवून देतो. असाच प्रकार
माया ब्रह्मात आहे. माये करवी ब्रह्म आपले कार्य घडवून आणतो. पण माया
सांत आहे म्हणजे तिला अंत आहे. पण चैतन्य अनंत आहे. त्याला अंत नाही.
नाश नाही. मायेलाच प्रकृती म्हणतात व चैतन्याला पुरुष म्हणतात. या दोहों-
पासून सर्व जगाची उत्पत्ती झाली आहे. पुरुष व प्रकृतीचे अधिक खोलवर
विवरण तुला पाहिजे असेल तर ते ज्ञान देवाने अमृतानुभवात केलेले आहे
ते वाच. मी ते पुन्हा सांगत नाहीं. फक्त आत्मज्ञान गुहेची थोडीशी ओळख
करून देतो. जे आत्मज्ञान गुहेत शिरले ते तिच्यात इतके समरस होतात की
ते स्वतःच गुहा होऊन जातात व मग तेथला आनंद सोडून ते पुन्हा कधीच
बाहेर या जगात येत नाहीत, पुरुष हा सूत्रधार असून कार्य करणारी माया
आहे. मी अमका मी तमका असे जे आपणास वाटते, ते मायेच्या योगाने. या
मायेने निर्माण केलेला तो असत्याचा भास आहे. मायेने आपणास पूर्ण वेडल्या-
मुळे आपणास सत्याचे भान राहत नाही, सत्य कोणते ते कळत नाही. मायेत
दोन गुण आहेत. तिचे कर्तृत्व दुहेरी आहे. ते आहे ते झाकणे व जे नाही ते
आहे असे भासविणे. यामुळे सगळे जीव भ्रमात पडतात. एका मजुराला स्वप्न
पडले की आपण राजा झालो. येथे मायेने काय गंमत केली पहा. मायेने त्याचे
मजूरपण प्रथम झाकले व नंतर सत्य नसताही त्याच्या ठिकाणी राजेपण
भासविले. तसेच सत्य जे ब्रह्म त्याला झाकून नसतेच. काही सत्य आहे असे

माया भासविते, खरं म्हणजे एक चैतन्यच सत्य आहे. हे जगत् नव्हे. पण मायेमुळे हे जग सत्य आहे असे भासते, वाटते व तशी प्रचीती येते. "जग व जगातील सर्व वस्तुतः असत्य आहेत. पण वाटतात सत्य व त्यामुळे जगाचे अकल्याण होते. यास्तव ज्ञानाच्या साहाय्याने या मायेचे आवरण पडदा काढून टाक म्हणजे तुझे तुलाच दिसेल, कळेल की तू नाना नसून शुद्ध चैतन्यच आहे. त्याचीच, चैतन्याची सद्वस्तूची तुम्ही उपासना करावी असं माझं सांगणं आहे. आत्मा हाच सद्वस्तू अद्धात्माचे सारभूत सांगणे हेच. तो आत्मा जाणून घे व याच जन्मी मुक्त हो" हे ब्रम्हज्ञान ऐकून भक्तांना आनंद झाला व त्यांनी बाबांच्या चरणी लोटांगण घातले. या नंतर साईभक्तांना दासगणू सांगतात की बाबांनी भक्तांना जो उपदेश केला तो ज्ञानाचा ठेवा मनी नीट जतन करा व आपले कल्याण करून घ्या. शेवटी या लेकराला पदरात घ्या, आपल्या कृपाछत्राखाली घ्या, अशी विनंती श्रीसाईचरणी करून संत दासगणू महाराज हा अध्याय पूर्ण करतात.

(येथे ह. भ. परायण दासगणू महाराजकृत "अर्वाचीन भक्त" व "संत लीलामृत" यातील श्रीसाईबाबांचे ४ अध्याय पूर्ण होतात.)

ही दिवाळी व नूतन वर्ष आपणा
सर्वांना सुख समाधानाचे
समृद्धीचे व उत्कर्षाचे जावो
मे० बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, प्रा. लिमिटेड
४२, जी. डी. आंबेकर रोड,
वडाळा, मुंबई – ४०००३१.

# श्री साईलीला स्वानुभव अंकाचे मानकरी

—श्री. बापूसाहेब निरखे, इंदूर.
—श्री. र. श्री. पुजारी, पुणे.
—श्री. विनायक पाठक, घाटकोपर.
—श्री. काशिनाथ रूपचंद लाठी, जळगाव.
—श्री. चंद्रकांत सामंत, मुंबई
—श्री. सूर्यकांत गर्जे, पुणे.
—श्री. अनंत चितांबर, अहमदनगर.
—श्री. एम. आर. बांदे, सिमला
—श्री. हेमन्त हळवे, पुणे
—श्री. शाम जुवळे, दादर.
—श्री. सुरेश चौधरी, सातारा
—सौ. सुलभा दि. ऋषि, मिर्झापूर.
—सौ. पद्मावती वाशिकर, पुणे.
—सौ. सुहासिनी सावंत.
—श्री सदाशिव शृंगारपुरे, ठाणे.
—श्री श्रीकृष्ण गंधे, अहमदनगर.
—श्री. विश्वनाथ कुलकर्णी, कोल्हापूर
—श्री उद्धव भावसार, जोगेश्वरी.
—श्री. शिरीष गंधे, संगमनेर
—लक्ष्मीतनया, घाटकोपर.
—श्री. उल्हास सकपाळ, दादर.
—श्री. मा. ग. गोरे, कुर्ला.
—सौ. सरला गर्जे, पुणे.
—श्री. नरहरी कदम.
—श्री. सदानंद चेंदवणकर, मुंबई.
—श्री. प्रकाश सहस्त्रबुद्धे, ठाणे.
—श्री. व्यंकटेश मुळे, दादर

# श्रीसाईबाबा भक्तांचे स्वानुभव



तुझ्याच हाती जीवन माझे, पामर मी तव दास ।
ठेवशील तू तसाच राहिन, घट्ट धरूनि तव कास ।।१।।
तुझ्याच साठी देह झिजवुनी धरीन तुझीच मी आस ।
सहवास तुझा नित्य असो मज, हीच विनवणी खास ।।२।।

# शिर्डीला हांक

**श्री. बापूसाहेब निरखे, १५ नंदलालपुरा इंदूर, आपला अजब अनुभव लिहितात**

–सन १९५३ साली मी आणि माझी दोन लहान मुले संतोष, सहा वर्षं आणि शोभा चार वर्षं. शिर्डी साईबाबा दर्शन करून मनमाडला रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर खांडव्याकडे जाणाऱ्या पंजाबमेलची वाट पहात उभे होतो.

इतक्यात आली, आली तुफानमेल आली म्हणून एकच ओरड घाई सुरु झाली. दिवस थंडीचे. अंधारीरात्र,. घाईने एका डब्याशी उभा राहून खिडकीतून मुलाला आत सोडले, वळकटी आत सोडली आणि खाली जवळ उभ्या केलल्या शोभाला आत ठेवणार ... पण, पण शोभा कुठाय? कुठ गेली शोभा, माझी छकुडी कोणी नेली? अरे भाई गुम हो गयी मेरी बच्ची! शोभड्या शोभा आवाज करीत मागे पुढे पळणार तोच अरे भाई गाडी जायगी यह मेल है दुसरे बच्चेको तो सम्हालो? म्हणत, संतोष मुलाला आतले लोकानी बाहेर सोडले. वळकटी बाहेर फेकली. मुलाला हाताशी ओढले. शोभा! बायडे! अशा रडक्या आवाजाने गर्दीत पुढे रेटला जाऊ लागलो. हे रामा! साईबाबा! कुठाय माझी शोभा? अजी किसने देखी क्या छोटी बच्ची? साईबाबा! अरे हे काय केलं? आत्ता दर्शन करून परतलो ना आम्ही. का ही शिक्षा? बाबा? द्या माझी शोभा, शिर्डीच्या साईबाबा!

इतक्यात, एक वृद्धसा हमाल, दाढीवाला, गर्दीतून ओरडत–रडक्या चेहऱ्यास दटावित ... काय हाय रे? अरे ध्यान किधर है? ही बच्ची तुझी हाय का? का रडतोस? लक्ष कुठं हाय घे हिला, उचल हिला! आणि माझी छकुली एकदम गळचात पडली रडत रडत. पण पुनः तेच दटावणे, अरं जायचे हायना या गाडीनं? जाय तो बघ समोर माणूस हाय, घेईल तो पोरांना! म्हणत पाठीला एक धक्का देऊन गाडीच्या डब्याकडे रेटला. मुलं आत घेतली गेली. मला धक्का पडला व गाडीला हादरा बसला.

माझी हाक शिर्डीला व मदत मनमाडला हे ना उमगले मनाला. अन हो कुठ गेला तो वृद्ध दाढीवाला? माझ्या शोभाला परत देणारा बाबा? ना दिसला ना रुकला.

सांगून खरे वाटेल का? की गाडी सतत शिट्टी देत होती, लोक बाहेर बोलावित होते, पण गाडी जाम एकाच जागी होती. मला आत धक्का दिला गेला आणि गाडीला हादरा बसून गाडी चालू झाली.

पण उमगलो फार उशीरा, जेव्हा निष्ठा म्हणाली तोच होता दाढीवाला आणि तेच होते तुझे साईबाबा.

# लिहविसी हाती धरूनिया

• र. श्री. पुजारी, पुणे

—संतचरित्रांचा मी एक लेखक. गेल्या काही वर्षात सहा चरित्रे लिहिली. आता सातवे कोणते लिहावे असा विचार चालू असतानाच तीन स्नेह्यांच्या मुखाने कोणी आज्ञा केली. : आता साईबाबांचे चरित्र तुम्ही लिहा.

साईबाबांचे चरित्र मी कधी वाचलेले नव्हे. डोळ्यांनी पाहिलेले सुद्धा नव्हे. सोळा वर्षांपूर्वी एकदा शिरडीस गेलो. पण तेथील वातावरण मला आवडले नाही. जे भक्त पाहिले तेही सर्व ऐहिकासाठी साईबाबांकडे धाव घेणारे! यामुळे या संताविषयी माझ्या मनात "एक अढी निर्माण झाली. अर्थातच या संताचे चरित्र लिहिण्यास मी उत्सुक नव्हतो. अशा परिस्थितीत वरील मित्रां-पैकी एकाने साईसच्चरित पोथी आणून एका गुरुवारी माझ्या हाती घातली.

सच्चरित ग्रंथ मुळातच अवाढव्य. विद्वज्जड. काही ठिकाणी तर अत्यंत दुर्बोध. ग्रंथाचे हे स्वरुप पाहुनच मी कंटाळलो. चार अध्यायातच गारठलो. पुढील प्रकरणांचे लेखनही थंडावले. हे चरित्र तडीस जाणार नाही असे वाटू लागले. तोच एका पहाटे 'एक स्वप्न पडले.

स्वप्नात श्रीबाबा आले. एक ओंजळभर खडीसाखर माझ्या हातात घातली. ती माझ्यासाठीच होती. नंतर एक ओंजळभर शंकरपाळी माझ्या हातात घातली. तो प्रसाद मात्र दुसऱ्यांना देण्यासाठी होता.

या स्वप्नामुळे मला आत्मविश्वास आला. रेंगाळलेले लेखन चालू झाले. या चरित्रावर मन एकाग्र झाले. पुष्कळसे चरित्र हळूहळू आटोक्यात येत आहे असे वाटले. तोच दुसरे स्वप्न पडले.

या स्वप्नात एक मुसलमान गृहस्थ आले. खूप जुने मित्रत्व असावे असा त्यांनी माझ्या अंगावर हात टाकला. एका प्रचंड विस्तीर्ण अशा भोजनगृहात मला घेऊन गेले. हिंडू लागले. तेथील कोणी एका व्यक्तीने भिवया उंचावून मी कोण अशी पृच्छा केली. तेव्हा ते बोलले नाहीत. छातीवरील खिशातील जमाखर्चाची डायरी काढली. ती त्यांच्या तोंडासमोर सताड उघडली. डायरी-तील दोन्ही उभ्या पानांवर ठळक अक्षरात एक आडवी ओळ होती. तिच्यात पाचच शब्द होते. प्राध्यापक पुजारी — माझे परम मित्र.

या परम मित्रासाठी बर्फीने भरलेली दोन ताटे तेथे दिसली. भातासाठी एक ताट दिसले. तेथील नोकर हात राखून वाढू लागला. तेव्हा ते गृहस्थ

हाताने खुणावून त्याला म्हणाले deep More deep गाईतिकत भाताच्या उंच, बांधीव ढिगाऱ्यातील खूपच भात माझ्या पानात उतरला !

तिसरे स्वप्न ऑगस्ट १९७४ मध्ये मी शिरडीस जाऊन आल्यानंतर पडले.

या स्वप्नात कोणी एक साधू एका उंच चौथऱ्यावर मांडी घालून बसले होते. वर चढून मी नमस्कार केला. त्यांनी माझ्या हातावर एक पेढा ठेवला. मी पुन्हा नमस्कार केला. त्यांनी एक रसरशीत केळफूल माझ्या हातात घातले. ते स्थान शिरडी होते.

चरित्राची अठ्ठावन्न प्रकरणे लिहून पुरी झाली त्या दिवशी एक चमत्कार घडला. माझ्या पेनचे बूड फुटले. भरलेली शाई बाहेर येऊन जमिनीवर टपटप गळू लागली. निब तसेच दौतीत बुडवून पुढचे लेखन करू लागलो. लेखन मनासारखे जमेना. एक नव्हे, दोन नव्हे, तीन पाने मार्जिनपासून मी उभी फाडली ! असे सहसा घडत नाही.

अठ्ठावन्नावे प्रकरण पुन्हा सहज वाचू लागलो. तेव्हा ध्यानी आले की, श्रीबाबांचे चरित्र येथेच संपले ! बाबांचे महानिर्वाण झाले ! यापुढील भाग म्हणजे शोक, उत्तरकार्य, आणि बाबांचे अभय !

लिहिलेली प्रकरणे श्रीसाईलीलेत छापण्यासाठी विभागू लागलो. तेव्हा सत्तावन्न आणि अठ्ठावन्न ही प्रकरणे ऑक्टोबर १९७५ च्या अंकासाठी नियोजित केलेली निघाली. ऑक्टोबर महिन्यात दसऱ्यास तर श्रीबाबांची पुण्यतिथी ! हा विचार मनात आला तेव्हा पुन्हा आश्चर्याने थक्क झालो. आधी केले, मग सांगितले. हीच रीत पुन्हा दिसली.

श्रीबाबांनी शिरडी येथे केलेल्या लीला म्हणजे, अध्यात्मशास्त्रातील कूटातील कूट प्रमेयांची बोलता चालता केलेली उकल. श्रीसाईसच्चरित म्हणजे अशा हिऱ्यांची एक खाणच. तिच्यात खोलवर उतरून आतील हिरे मला पाहता आले हे मी माझे भाग्य समजतो. हे सर्व लिहिण्याचे तात्पर्य एवढेच ! लिहविसी हाती धरूनिया !

# साई मेरे साथ—साई मेरा बाप

**– विनायक पाठक**

बी १७/२३४ राजावाडी, घाटकोपर, मुं. ७७ लिहितात–

–"जेथे जेथे जातो । साई माझ्या सांगाती" हा अनुभव मला अनेक वेळा आला. पण सदैव सांगाती असणाऱ्या साईनाथांचे प्रत्यक्ष दर्शन मात्र झाले नाही हेच माझ्या मनातील शल्य आहे.

साधकाची किंवा भक्ताची आध्यात्मिक बैठक पूर्णतया परिपक्व होत नाही तोवर योग्य गुरुचे मार्गदर्शन होत नाही व ईश्वरी दर्शनही दुर्लभ असते हेच खरे! संत गोरोबांनी नामदेवांना सांगितल्याप्रमाणे माझेही मडके कच्चे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि मलाही विसोबा खेचरांसारखा गुरु भेटून सद्‌गुरु साईनाथांचे प्रत्यक्ष दर्शन घडवून आणण्यास मदत केल्याशिवाय रहाणार नाही या आशेवर आजवर आलेल्या विविध अनुभवांच्या आठवणींची उजळणी करून प्रयत्न व प्रार्थनेची कास धरीत आहे. असो. आजवर मला आलेल्या अनेक प्रत्ययातून दोन निवडक अनुभव येथे देत आहे.

रेशनचे गहू पुरेनात म्हणून एके दिवशी मी कुर्ल्याहून आमच्या साडूंकडून दहा किलो गहू दोन पिशव्यात भरून कुर्ला स्टेशनवरील प्लॅटफॉर्म नंबर एकवर आलो. मी येण्यापूर्वीच गाडी स्टेशनात येऊन उभी होती. त्यामुळे उतरणारे सर्व उतारू उतरून आपआपल्या वाटेला लागले होते. डब्यात माणसे खच्चून होती. प्लॅटफॉर्म रिकामा होता. जणू काही गाडी मला घेण्यासाठीच थांबली होती. दोन्ही हातात पाच पाच किलोच्या पिशव्या घेऊन मी पुढच्याच डब्यात शिरण्याचा प्रयत्न करू लागलो. पण खिसेकापूंच्या कंपूने केलेल्या कृत्रिम गर्दीमुळे मी जेमतेम फुटबोर्डवरच दोन्ही हातात पिशव्या घरून उभा राहिलो. तोच त्या खिसेकापूंच्या कंपूतील एकाने माझ्या खिशाचा अंदाज घ्यायला सुरुवात केली. सुरुवातीला वाटले लागला असेल धक्का! पण पुन: तेच. शेवटी मी त्याला जरा दरडावून विचारले, "क्यों भाई! जेब टटोलता है क्या?" त्याला राग आला व त्याने क्यों बे ×× म्हणून त्याच्या ठेवणीतील अस्सल शिवी हासडली व मला चक्क छातीत गुद्दा लगावला. गुद्दा लगावण्याची व गाडी चालू होण्याची क्रिया एकदमच सुरू झाल्याने मी दोन्ही हातातील पिशव्यासह वर्तमान गाडीतून खाली प्लॅटफॉर्मवर मागच्या मागे फेकला गेलो. गाडी पुढे गेली. पण त्या पडत्या अवस्थेत मला कुणीतरी आपल्या दोन्ही हातानी अलगद आधार दिला व त्या संकटातून मी सुखरूप वाचलो.

जरासा सावरल्यावर बावरल्या नजरेने मी इकडे तिकडे पाहिले. तो कुणीही प्लॅटफॉर्मवर नव्हते. नाही म्हणायला पांढऱ्या गणवेषातील एक तिकिट

कलेक्टर मात्र जरा दूरवर उभा दिसला. मला वाटले त्यानेच मला वरच्यावर अलगद आधार दिला. म्हणून त्याचेजवळ जाऊन मी त्याचे आभार मानू लागलो तोच तो म्हणाला, "अरे साब, मैं कौन आपको बचानेवाला? साई आपके साथ। तो डरने की क्या बात?" त्याच्या साई शब्दाच्या उच्चारावरून तो मिया असावा असे वाटले व त्याच्या साई शब्दात अभिप्रेत असलेला अर्थ त्यावेळी मला उमगला नाही पण दुसऱ्या अशाच एका अनुभवात त्यातील इंगीत आकलन झाले.

मी गेल्या मे महिन्यात "हार्ट अॅटॅक" (तिसऱ्यांदा) आल्याने माहीमच्या नॅशनल हॉस्पिटलमध्ये होतो. एके रात्री पुनः अचानक छातीत कळा सुरू झाल्या व मी जवळ जवळ ओरडूनच 'सिस्टर'ला बोलावले. तिने नाडी पाहिली. नाडीचे ठोके एकदम मंद होऊ लागले असावे म्हणून लगेच पळत जाऊन टेलिफोन करून डॉक्टरला बोलावले. डॉक्टरांनी इंजेक्शन दिले व पेशंटच्या घरी निरोप पाठवून कुणाला तरी बोलावून घेण्याची सूचना दिली. मला तर वाटले की आपली इतिश्री होण्याची वेळ आली. डॉक्टर गेले व सिस्टरही आपल्या टेबलाकडे जायला निघाली. आपण आपली शेवटची घटका मोजीत असल्याच्या खिन्नावस्थेत मी असताना कुणीतरी एक म्हातारा पेशंट इस्पितळाच्या पांढऱ्या पेहरावातच माझ्या कॉटजवळ आला व मला हलवून म्हणाला "बेटा, घबराता क्यों है? बाबा तेरा बाप। तो डरने की क्या बात?" मी विचार करू लागलो. मी माझ्या वडीलांना बाबा म्हणतो हे या म्हाताऱ्याला काय माहित? तेवढ्यात पुनः तो म्हणाला, "चार दिन में घर जायेगा और चार महीने आराम करेगा।" व तो तेथुन निघून गेला. त्याला अभिप्रेत असलेला बाबा शब्दाचा अर्थ मला तेव्हा नीटसा कळला नाही. पण अक्षरशः चौथ्याच दिवशी जेव्हा मला हॉस्पिटलमधून 'डिस्चार्ज' मिळाला तेव्हा मी सर्व वॉर्ड हिंडून त्या म्हाताऱ्या पेशंटचा शोध घेतला. पण तो दिसला नाही. मी एका अनामिक हुरहुरीने घरी गेलो व खरेच चार महीने आराम केला कारण त्यानंतर माझ्या उजव्या डोळ्यातील काचबिंदूचेही ऑपरेशन झाले व सर्व व्यवस्थित होऊन मी बरोबर चार महिन्याच्या विश्रांतीनंतर एक सप्टेंबर ७५ पासून पूर्ववत कामावर रूजू झालो.

प्लॅटफॉर्मवर दिसलेला पांढऱ्या गणवेषातील तिकिट कलेक्टर व इस्पितळात भेटलेला पांढऱ्या पेहरावातील म्हातारा पेशंट व त्या दोघानीही थोड्याशा फरकाने उच्चारलेली वाक्ये व त्यातील अनुक्रमे आलेले साई व बाबा हे दोन शब्द यातील साम्य व गर्भितार्थ याचे जेव्हा मी विश्लेषण केले, तेव्हा त्या दोघांच्याही वाक्यात अभिप्रेत असलेला अर्थ ध्यानात आला की, "साईबाबा तारी। त्याला कोण मारी?"

# माझी वाचा आणि श्रीसाईबाबा

लेखक- **काशीनाथ रूपचंद लाठी** बी. ए. एल एल. बी.
७ पोलन पेठ. मु. जळगाव

आपल्या जीवनातील एक अविस्मरणीय घटना लिहितात —

–मी सन १९३२ साली, एल्. एल्. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झालो. वकिली पेशाबाबत मूळपासूनच नावड. ओढा होता डॉक्टरी व्यवसायाकडे – वडीलधाऱ्या मंडळींचा त्यास विरोध. शिक्षणाची खूप आवड व उत्सुकता. मध्येच शिक्षण सोडावेसे वाटेना. नाराजीने का होईना मी विचारले "मी काय व्हावे" अशी आपली अपेक्षा. उत्तर मिळाले "तू वकील व्हावेस" "ठीक आहे" हे माझे प्रत्युत्तर. त्याप्रमाणे मनाचा निर्धार करून पदवी मिळविली. व सन १९३३ ते १९४२ पावेतो वकीलीचा व्यवसाय केला तोहि यशस्वीपणे. त्यात बऱ्याच वेळा पेशा म्हणून सद्सद्विवेक बुद्धिला फाटा द्यावा लागत असे ते मनास पटेना. व्यवसायात असताना अशी एक घटना घडली की, मी त्यामुळे विपण्ण झालो व लगेच वकीली पुढे चालू न ठेवण्याचा निश्चय केला. व तो निर्णय माझ्या वडिलांस कळविला.

प्रामाणिकपणे धंदा करावा व आपले भवितव्य उज्वल करावे या दृष्टीने मुंबापुरीत प्रवेश केला. आर्थिकदृष्टचा खूप समाधान लाभले. परंतु दैवाने त्यातही फार मोठा फटका दिला. विषण्णता प्राप्त झाली. परिस्थितीनें गांगरून वारंवार माझी शुद्ध हरपून जाऊ लागली. व त्यातच एकाएकी मनाचा तोल सुटला व एकाएकी बेशुद्ध झालो व त्यातच माझी वाचा गेली. ही गोष्ट सन १९५२ चे सप्टेंबर महिन्यातील. माझ्या वडिलांनी जपजाप्य, दैवी उपचार असे सर्व प्रयत्न केले. योग्य तो औषधोपचारही केला. त्यामुळे मला पूर्ववत वाचा सुमारे तीन महिन्यानंतर आली. पुन्हा आपल्या दैनंदिन कार्यात रत झालो. परंतु मनावरील दडपण कमी झाले नाही. मानसिक शांति लाभली नाही. विचाराची चक्रे पूर्वीप्रमाणेच जोरात फिरत होती व त्याचा व्हायचा तो परिणाम झालाच. पूर्वीप्रमाणेच सन १९५३ च्या सप्टेंबर महिन्यात पुन्हा माझी वाचा गेली, व मला माझ्या भावी जीवनामध्ये नैराश्य उत्पन्न झाले. जो या अखिल जगताचा चालक आहे व ज्याच्या सत्तेने हे चराचर वागते आहे त्या अदृश्य शक्तीला आपण आपला देह समर्पण करावा अशा प्रबळ इच्छेने एखाद्या शांत, रम्य, भौतिक जगापासून लांब अशा जागी राहून, उर्वरित आयुष्य समर्पण करावे व साधल्यास आत्मोन्नति करून घ्यावी. असा प्रबळ

विचार मनात आला व तो माझ्या वडिलांस लिहून दाखवला. वडिलांनी भारतातील पुष्कळ क्षेत्रस्थानांची नावे सांगितली परंतू माझा निर्णय होईना. म्हणून दुसऱ्या दिवशी पाटीवर लिहून दाखविन असे त्यांना सुचविले.

दुसऱ्या दिवशी माझ्याकडून पाटीवर "शिरडी साईबाबा" हीं अक्षरे लिहिली गेली. त्यावेळेपावेतो श्री बाबांची मला कुठलीही माहिती नव्हती. असे असताना ज्या शक्तीने मला प्रेरणा दिली ती शक्ती "म्हणजे, प्रत्यक्ष श्री साईबाबाच होत व त्यांनीच मला हा आदेश दिला म्हणून माझ्या वडिलांनी मला शिरडी येथे श्रीसाईबाबांचे कृपाछत्राखाली व त्यांची सेवा करण्यासाठी पाठविण्याचे ठरविले, व त्या साली दिपावलीनंतर लगेच मी तेथे गेलो.

शिरडी संस्थानातील सर्व कार्यक्रम व्यवस्थितपणे व पूर्ण श्रद्धेने करण्याचे ठरविले. "श्री साईसच्चरित्राचा" एक सप्ताह करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे तेथील शांत वातावरणात मन रमले व एक प्रकारचा उत्साह वाटू लागला. "श्री साईसत्‌चरित्राचा सप्ताह पूर्ण झाल्यानंतर लगेच दोन दिवसांनी माझी गेलेली वाचा मला मिळाली व माझ्या आनंदास पारावार राहिला नाही. ही सर्व श्रीबाबांची कृपाच नाहीं काय ?

या घटने नंतर मी तीन महिनेपावेतो मौन पाळण्याचे ठरविले. व फक्त नामस्मरण व प्रत्येक गुरुवारी "श्री गुरुदेव दत्त" व "श्रीसाईबाबांची". आरती मोठ्याने म्हणावयाची.

श्रीबाबाची कृपा झाली नसती तर माझें जीवन विस्कळीत झाले असते मी कोणत्या अवस्थेला गेलो असतो याची कल्पना न केलेलीच बरी. आज जी काहीं सेवा माझ्याने कळत नकळत घडत आहे त्याची चालना श्रीबाबांचीच व त्यांच्याच आदेशाने सर्व काहीं होत आहे. श्रीबाबा हे नुसतेच संत पुरुष नसून ते प्रत्यक्ष परमेश्वरच आहेत. भक्तांच्या हाकेला ते सदैव धावून येतात. त्यांना संकटातून मार्ग दाखवितात. याबद्दल कोणीही तिळमात्रहि शंका बाळगू नये.

सांसारिक जीवनात असे बरेच प्रसंग येतात की, मनुष्य कितीही धीराचा असला तरी गांगरुन जातो अशावेळीं श्रीबाबांच्या चरणी शरणांगति पत्करली तर त्यातून ते निश्चित पार करतात. "श्रद्धा" आणि "सबुरी" ही बाबांची मानवजातीस फार मोठी देण आहे.

# अभिषेकाची तिकिटे मिळाली

## श्रीसाईकृपेचा एक अनुभव

लेखक- श्री. चंद्रकांत दामोदर सामंत

मॅनेजर एल. आय. सी. ब्रँच नं. १०६ फोर्ट, मुंबई, लिहितात—

–नोव्हेंबर १९७२ मधील गोष्ट. मी दरवर्षीच्या नेमाप्रमाणे माझ्या दोन तीन सहकाऱ्यांबरोबर शनिवारी दुपारी मुंबईहून ३ वा. सुटणाऱ्या स्पेशल बसने शिरडीस रात्री उशीरा पोहोचलो. पहाटे उठून सर्वांनी प्रातर्विधि आटोपले. मी प्रथम स्नान उरकले व माझ्या मित्रांना संस्थानच्या स्नानगृहाकडे स्नानासाठी पाठविले. स्नान करून परततांना वाटेत अभिषेकाची तिकीटे खरीदण्याविषयी मी त्यांना बजावून ठेवले होते. इकडे मी माझे दैनंदिन कार्यक्रम आटोपून समाधिमंदिरात श्रीसाईबाबांच्या स्नानादिकाचा सोहळा पाहण्यात गर्क होऊन गेलो. माझ्या मित्रांनी आठवणीने अभिषेकाची तिकीटे खरेदली असणार ह्याविषयी मी निश्चित होतो. सुमारे साडेदहाच्या सुमारास ,आमची मित्रमंडळी स्नान वगैरे आटोपून समाधि मंदिरात दाखल झाली. साहजिकच मी त्यांच्याकडे अभिषेकाच्या तिकीटांविषयी अधीरतेने चौकशी केली. पण हाय ! ते तिकिटे काढण्यास साफ विसरले होते व रविवारच्या गर्दीमुळे त्या वेळेस तिकीटे मिळण्याची आशाही नव्हती. मी एकदम खिन्न झालो. आपला दर खेपेचा अभिषेकाचा नियम चुकणार व ह्या वेळेस अभिषेक न होता मुंबईला परतावे लागणार ह्या विचाराने मन एकदम उदास झाले. मी ह्या मनःस्थितीत समाधिमंदिरातील श्रीबाबांच्या मूर्तिच्या उजव्या हाताला असलेल्या खोलीच्या दरवाजाला टेकून उभा होतो. सुमारे सात वाजले असावेत. इतक्यात कोणीतरी मला पाठीमागून हात लावला म्हणून मी मागे वळून पाहिले. तो एक अंदाजे पंधरा सोळा वर्षाचा मुलगा (गुजराथी असावा) माझ्यापाठी उभा असलेला दिसला. त्याने आपल्या मुठीतील दोन अभिषेकाची तिकिटे माझ्यापुढे करीत म्हटले, "हे पाहा. आम्हाला आताच्या सव्वासातच्या बसने जावयाचे आहे. ही अभिषेकाची तिकिटे तुम्ही घ्या" माझा स्वतःच्या कानावर काही क्षण विश्वासच बसेना ! मी माझ्या सदऱ्याच्या खिशातून चटकन एक रुपयाची नोट काढून त्याला देऊ केली. त्याने ती स्वीकारण्यास नकार दिला व घाईने परततांना त्याचे पुढील शब्द माझ्या कानावर आले, "मला पैसे नकोत. तुम्ही आमच्या नावाने अभिषेक करा."

वास्तविक, मला नावगाव माहित नसलेल्या एका अनोळखी मुलाने "आमच्या नावाने अभिषेक करा" असे सांगून माझ्या मनीची इच्छा पुरी करावी हा श्रीबाबांच्या कृपाप्रसादाचा चमत्कारच नव्हे काय?

---

# श्रीबाबांची कृपादृष्टी

• सुर्यकांत माधवराव गर्जे
DME DEE ८० शिवाजी नगर पुणे ५

–ता. १६ मे ते १९ ऑगष्ट १९७४ ला मद्रास शहरातील मैलापूर या उपविभागात असलेल्या श्री साईनाथ मंदिरात अखिल भारतीय साईभक्तांचा मेळावा भरला होता. आमच्या श्रीसाईदास मंडळास अगत्य येण्याचे निमंत्रणहि तेथील कार्यकारी मंडळाने पाठविले होते. तेथील–कार्यक्रमात सहभागी होता येईल व मद्रास शहराचा परिसरहि पाहता येईल, अशी दुहेरी संधी आमच्या पुढे चालून आली होती. मला तर हा दुग्धशर्करा योगच वाटला.

कुठलाही कार्यक्रम असो त्यात अडीअडचणी या येणारच. किंबहुना हे एक त्रिकालाबाधित सत्य आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती न व्हावी. श्री सद्‌गुरु साईबाबांचा सोहळा याचि देहि याचि डोळा पहावा, अशी माझ्या मनात जबरदस्त इच्छा होती. मनात इच्छा खूप असतात परंतु त्यांची पूर्तता होतेच असे नाही.

आमच्या मंदिरातील चारपाच लोकांनी मद्रासला जाण्याची इच्छा व्यक्त केली, व त्याप्रमाणे ते तयारीलाही लागले. मंदीराचे चिटणीस श्री. रामकृष्णन् व परमपूज्य श्री. काकासाहेब अवस्थी एके दिवशी मंदिरात श्री बाबांची आरती झाल्यावर मला म्हणाले, "गर्जे, तुम्ही जाणार का मद्रासला?" मी एकदम उत्तरलो "हो!" वास्तविक पाहता मी पुढला–मागचा कुठलाहि विचार न करता माझा होकार दिला होता. मद्रासला जायचे म्हणजे कमीत-कमी दहा-बारा दिवसांची रजा अगोदर मंजूर करून घ्यावी लागेल. दोन-तीनशे रुपये जवळ घ्यावे लागतील, असा सारासार विचारहि मी त्या वेळेस केला नाही. हे केवळ जबरदस्त इच्छे पोटी आणि श्री बाबांना नमस्कार करीत त्यांना साक्ष ठेवून

दुसरे दिवशी ऑफिसमध्ये गेलो. रजेचा अर्ज लिहून साहेबांच्या टेबलावर ठेवला व आपल्या नित्याच्या कामास लागलो. दुपारी साहेबांचे बोलवणे आले. साहेबांकडे जाता जाता मी विचार करू लागलो की, साहेब आता सुनावणार– "वरिष्ठ अधिकारी इन्स्पेक्शनसाठी येणार असल्याकारणास्तव तुमची रजा मंजूर

करता येत नाही." विचाराच्या तंद्रीत मी साहेबांच्या टेबलापाशी केव्हा येऊन उभा राहिलो याचे भान मला राहिले नाहीं. साहेब फक्त म्हणाले "ठीक आहे, रजा मंजूर करतो शक्यतो रजा वाढवू नका."

"सर, धन्यवाद! म्हणत मी खोलीतून बाहेर पडलो त्या वेळेस मला झालेला आनंद मी शब्दात सांगू शकत नाही.

एक प्रश्न तर सुटला आणि तोसुद्धा इतक्या सहजासहजी की त्याचे अजूनहि मला राहून राहून आश्चर्य वाटते. आता दुसरा प्रश्न आ वासून डोळ्यापुढे उभा होता आणि तो म्हणजे पैशांचा निदान दोनशे रुपयांची मदत हवी होती, आतापर्यंत कुणाकडे कधी एक पै देखील मागितली नव्हती, परंतु आता तर दोनशे रुपये हवे होते. प्रश्न तसा साधा होता परंतु तो भेडसावीत होता. पैसे वेळेवर मिळणे हे अधिक महत्त्वाचे होते. ऑफिसमधील एका मित्राला मी माझी अडचण सांगितली. त्यानेहि ऐकले न ऐकल्यासारखे केले आणि विषय तेथेच संपला.

दोन–तीन दिवस कामाच्या घाई–गर्दीत असेच निघून गेले. एके दिवशी नित्याप्रमाणे श्रीबाबांच्या आरतीसाठी संध्याकाळी मंदिरात गेलो. आरती-कर्पूर आरती यथासांग पार पडली. प्रसाद घेतला व श्रीबाबांना साष्टांग प्रणिपात करून घरी आलो. हात–पाय धुवून जेवणासाठी पानावर बसतो एवढ्यात सौभाग्यवती म्हणाल्या–"अहो, तुमच्याकडे कुणी तरी आले होते मघाशी आणि त्यांनी हे पाकीट दिले, तुम्हांला देण्यासाठी." मी मोठ्या उत्सुकतेने पाकीट उघडले आणि आत पाहतो तो शंभर रुपयांच्या दोन नोटा! मी थक्क झालो. माझे डोळे आसवांनी डबडबले. नकळत माझी दृष्टि देव्हाऱ्यात ठेवलेल्या श्रीसाईबाबांच्या फोटोकडे गेली. धीर–गंभीर व शांतपणे बसलेले बाबा माझ्याकडे पाहून गालातल्या गालात हसत असल्याचा भास मला झाला.

ठरलेल्या दिवशी मी जेव्हा मद्रासला जाणाऱ्या गाडीत बसलो तेव्हा माझे अंतःकरण भरून आले होते. मधून मधून डोळे पाणावत होते. मद्रासला जाण्याची माझी इच्छा अशा रितीने फलद्रूप होईल, असे वाटले नव्हते. केवळ श्रीबाबांच्या कृपादृष्टि व आशीर्वादानेच हे शक्य झाले. आम्ही केवळ मद्रासलाच गेलो असे नव्हे तर रामेश्वर, मदुरा, तिरुपती इत्यादि तीर्थस्थानांनाही भेट देऊन आलो. सर्व प्रवास विनासायास व सुखेनैव पार पडला व तोहि मिळालेल्या मर्यादित रजेत. प्रवासात श्रीबाबाच आमचे पाठीराखे होते.

भक्तांची इच्छा सर्वथैव पूर्ण करणारे श्री साईनाथ महाराज हे एक महान जागृत दैवत होय.

# श्रीसाईबाबा भक्तांची दर्शनाची इच्छा पूर्ण करतात.

श्री. :- अनंत जयदेव चितांबर.

**गीताभ्यास कार्यालय, २०४ दिल्ली दरवाजाजवळ अहमदनगर लिहितात-**

–श्रीसाईबाबा हे अखिल विश्वातील एक महदाश्चर्यच होत. भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनास विश्वरूप दाखविले त्यावेळी त्यांनी त्यास 'बहून्यदृष्ट पूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत' (पुष्कळशीं यापूर्वी न पाहिलेली आश्चर्यें माझ्या रूपात पहा) असे सांगितले श्रीसाईनाथ महाराजांच्या अनुभवात भक्तांना अशीच अदृष्टपूर्व आश्चर्यें पाहण्यास मिळतात. बाबांच्या समाधिदर्शनाची (म्हणजे प्रत्यक्ष त्यांनाच भेटण्याची) उत्कट इच्छा भक्तांच्या मनात आली की ती बाबा इतक्या आश्चर्यकारक रीतीने पुरी करतात की, त्यांना प्रवासाच्या पैशाची किंवा वाहनाची कसलीच काळजी करावी लागत नाहीं. ह्या सर्व सोयी करून दर्शनास जाण्याच्या प्रवासात कोणतीही अडचण न ठेवता तो सुलभ करून ते शिर्डीस भक्तास नेऊन दर्शन देतात. हा अनुभव माझा एका वेळेचाच नव्हे तर अनेक वेळचा म्हणण्यापेक्षा नित्याचाच आहे. काहीं अनुभव येथे देत आहे.

१. मी सहकारी खात्यात ऑडिटर म्हणून काम करीत असताना कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी येथील काम संपले व परत नगरला जाण्यास निघालो. कोळपेवाडी ते शिर्डी अंतर १८ मैल आहे. ती वेळ सकाळी १० वाजताची होती. त्यावेळी मनात इच्छा झाली की शिर्डीस बाबांची ११॥ ते १२ च्या आरतीस हजर राहून बाबांचे दर्शन घेऊन पुढे जावे. पण त्याचवेळी एस. टी. च्या गाडीची वेळ नव्हती. उशीरा होती. त्यामुळे शिर्डीस जाण्यासाठी वाहन मिळण्याची अडचण पुढे उभी राहिली. इतक्यात एका ख्रिश्चन पाद्र्याची जीप तेथे स्टॅंडवर दिसली. माझ्या बरोबरच्या शिपायास मी शिर्डीस दर्शनास उतरून नंतर नगरला जाण्याचा माझा विचार सांगितला होता. हा शिपाई ख्रिश्चन असल्यामुळे त्याची व त्या पाद्री गृहस्थाची ओळख होती. शिपाई मला म्हणाला की "हा पाद्रीसाहेब माझ्या ओळखीचा आहे. त्यास विचारले तर तो तुम्हास शिर्डीस उतरून देईल. कारण तो राहात्यास जाण्यासाठी निघाला आहे." मी त्यास 'विचार' असे सांगितले. पाद्रीसाहेबाने त्यास 'काही हरकत नाही' असे सांगितले. व त्या पाद्रीसाहेबांच्या जीपने प्रवास होऊन, बाबांच्या आरतीच्या वेळेपूर्वीच शिर्डीस पोहोचलो व इच्छिल्याप्रमाणे आरती मिळाली व दर्शनही झाले. काय ही सोय तात्काळ बाबांनी कृपाळूपणाने केली! बाबा भक्तांची दर्शनाची उत्कट इच्छा पूर्ण करण्यास कसे धावून येतात पाहा.

२. मी बारामतीस सहकारी खात्यात डिस्ट्रिक्ट को. ऑफिसर (शुगर फॅक्टरीज) असताना माझ्याकडे श्री. थोरवी या नावांचे तरुण गृहस्थ क्लार्क म्हणून होते. श्री. थोरवी अत्यंत देवभक्त व श्रद्धाळू असून 'रामचंद्रस्वामींचे भक्त होते तर माझी साईभक्ती होती. दोन्ही भक्तांचे मीलन. आम्ही एकाच ठिकाणी रहात होतो. एकदा श्री. थोरवी मला म्हणाले, "शिर्डीस जाऊन साईनाथ महाराजांचे दर्शन घेण्याची इच्छा आहे." मी त्यांना म्हटले की, "तुमची उत्कट इच्छा असेल तर बाबा ती निश्चित पुरी करतील यात शंका घेऊ नका." पुढे काही महिन्यानंतर एक असा दिवस आला की श्री. थोरवी व मलाही शिर्डीस जाण्याचा योग आला. तो दिवस शनिवार होता. आम्ही माळेगाव सहकारी साखर कारखान्यावर होतो. सकाळी आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची कारखान्यास असलेली भेट संपली होती व साहेब निघून गेले होते व आमचेही तेथील काम संपले होते, आम्ही कारखान्याच्या ऑफिसच्या गॅलरीत उभे होतो. इतक्यात कारखान्याचीच एक जीप कारखान्याच्या ऑफिससमोर आली. त्या जीपच्या ड्रायव्हरशी माझी ओळख होती. मला पाहून त्याने जीपगाडीत बसूनच मोठ्याने विचारले, 'साहेब शिर्डीस येता काय? गाडी कोपरगावला निघाली आहे.' मी तात्काळ माझ्याच शेजारी उभे असलेल्या श्री. थोरवींच्या पाठीवर हात थोपटून त्यांना म्हणालो 'थोरवी, चला, शिर्डीला चला बाबा त्यांच्या दर्शनासाठी शिर्डीस बोलावीत आहेत आणि आपल्यासाठी जीपची सोय त्यांनी केली आहे." श्री थोरवीही आश्चर्यचकित झाले व मी त्यांना बाबांच्याच कृपेनें सांगितले होते ते अक्षरशः बाबांनी खरे केले. काय ही बाबांची करुणा! त्या जीपने प्रवास करून आम्हा दोघासही शिर्डीस बाबांच्या दर्शनाचा लाभ झाला हे सांगावयास नकोच.

३. नेवासे येथे ऑडिटच्या कामासाठी मला जावे लागत असे. ज्ञानेश्वरी-स्तंभ व मोहिनीराज दैवत यांच्या दर्शनाचा लाभ अनायासे होत होता. तेथील एक प्रसिद्ध वकील श्री. जेऊरकर यांचाही दर्शने घेताना सहवास झाला. त्यास मी साईभक्त आहे हे त्यांना कळून आल्यावर मला ते एकदा म्हणाले, 'चित्तांबर तुम्ही आम्हांला शिर्डीस बाबांच्या दर्शनाला न्या की.' मी त्यांना त्यावर म्हटले, 'वकीलसाहेब बाबांच्या दर्शनाबाबत अशी चेष्टा करू नका. हा चेष्टेचा विषय नाही. तुम्ही काय लहान आहांत म्हणून बरोबर घेऊन दर्शनास न्यावयाचे? तथापि चेष्टेने जरी तुम्ही म्हटले तरी बाबा एक दिवस तुमची तीही इच्छा पूर्ण करतील.'

पुढे कित्येक दिवसानंतर असे घडले की मी एकदा पढेगाव येथील काम आटोपून सकाळच्या रेल्वेने श्रीरामपूरला उतरलो, व एस. टी. मोटरस्टँडवर शिर्डीच्या (कोपरगाव) मोटारीची चौकशी करू लागलो. त्या दिवशी रेल्वेगाडी

नेहमीपेक्षा थोडी उशीरा आली होती व श्रीरामपूरहून निघणारी एस. टी. गाडी वेळेवर न मिळाल्यास दुपारची आरती सापडते की नाही याची शंका मनात आली. पण बाबांना भक्तांच्या हृदयातील सर्व शंका, भावना तावडतोब समजतात व ते भक्तांना साहाय्य करण्यास कोणत्याही ठिकाणी तयार असतातच. एस. टी. गाडी नेवासे ते कोपरगाव श्रीरामपूरच्या स्टँडवर मी पोहोचलो त्यावेळी उभीच होती. तीही तिच्या नियमित वेळेपेक्षा लेटच आली होती. पहा बाबांची किमया कशी असते ती. मी तावडतोब कंडक्टरला विचारुन गाडीत चढताना दुसराही एक गृहस्थ माझ्या बरोबरच त्याच गाडीत शिरत होता. कारण गाडी ताबडतोब निघणार होती. माझा त्या गृहस्थाला जोराचा धक्का लागला व नंतर पाहतो तो ते गृहस्थ म्हणजे, नेवाशाचे श्री. जेऊरकर वकील. मी त्यांना म्हणालो, 'चला, शिर्डीला चला, बाबांच्या दर्शनास तुम्हांला नेतो.' हे ऐकून श्री जेऊरकर हसतच राहिले व मीही त्यांच्याबरोबर हसू लागलो. हा योगायोग म्हणजे त्यांना मी पूर्वी जे बोललो होतो त्याची बाबांनी प्रत्यक्ष आणन दिलेली प्रचीती पाहून ते विरघळलेच. तेही नेवाशाहून बाबांच्याच दर्शनास निघाले होते, पण बाबांनी माझी सोबत त्यांना पाहिजे होती ती अशा तऱ्हेने अकस्मात दिली. शिर्डीस गेल्यावर श्री. जेऊरकराना मी बाबांची सर्व ठिकाणे, द्वारकामाई, समाधि, गुरुस्थान वगैरे दाखवून माहिती दिली व त्यांना परतीच्या गाडीत बसविले. त्यावेळी बाबांची लीला आम्हा दोघासही हसवीत होती, आनंद देत होती. माझे लहानपण शिर्डीस गेल्याने बाबांना प्रत्यक्ष पाहण्याचे परमभाग्य मिळविणाऱ्यांपैकी मी एक असल्यानेच श्री जेऊरकर वकीलाना माझी सोबत शिर्डीस पाहिजे होती. ती बाबांनी अशा तऱ्हेने पूर्ण केली. त्यानंतर मी पुनः नेवाशास गेलो, त्यावेळी मला श्री. जेऊरकर यांनी सांगितले की, त्यांचे कुलदैवत शालीग्राम असून घरच्या देवातील शालिग्रामाच्या ठिकाणी साईबाबा दिसल्याचा दृष्टांत त्यांना झाला.

## श्रीबाबांचे दोन अनुभव

**श्री. एम. आर. बांदे डि. पी. ओ. वेकस्लो, कायथू. सिमला**

–"माझ्या धाकट्या मुलाच्या (वय वर्षे १५) मधल्या बोटाला विषारी काटा लागून इजा झाली. त्याने हे दुखणे वर्षभर अंगावर काढले. डॉक्टरकडे जाऊन अगर घरगुती इलाज करून घेण्याचे त्याने ढकलत नेले. ही गोष्ट सन १९७४ च्या जूनची. जवळ जवळ ६ महिने त्याने त्रास भोगला. शेवटी

मी त्याला जबरदस्ती दवाखान्यात नेणार असे पाहून त्याने एक तोड काढली. "साईबाबांचा अंगारा एक पंधरवडा लाऊन पाहू या. मग डॉक्टरी इलाज करू". असे सांगून त्याने आमचा तगादा पुढे ढकलला.

"मग मात्र दररोज, अगदी नियमाने तो, एक चिमुटभर अंगारा त्या जखमेवर ठेवायचा आणि त्यावरून पट्टी बांधायचा. आणि काय आश्चर्य ? अगदी पंधराव्या दिवशी त्या मुलाच्या बोटावरील खुरुप खाली पडले आणि बोट दुखायचे थांबून ३-४ दिवसात पूर्ववत झाले."

## दुसरा चमत्कार

"मला ऑक्टोबर १९७४ पासून लघवीचा त्रास सुरू झाला. उन्हाळ्या लागल्या असतील अशी समजूत करून घेऊन मी जुलै १९७५ पर्यंत चालढकल केली. ऑगस्ट मध्ये असह्य वेदना व्हायला लागल्या. शेवटी १८ ऑगस्ट रोजी मी साईबाबांच्या तसबीरी समोर उभा राहुन प्रार्थना केली, "देवा! आज श्रावणी सोमवार आहे. आजपासून ८ दिवस तुझा अंगारा पाण्यात घोळून मी नियमाने पीईन. पुढल्या सोमवारपर्यंत ही जी काय पीडा असेल ती काढून टाक."

रोज नियमाने अंगारा घेणे चालू केले. सोमवार उजाडला तारीख २५-८ ७५ काही फरक नाहीं. दुपारचे दोन वाजले. वेदना वाढल्या तीन वाजले. वेदना असह्य झाल्या. डॉक्टरकडे जाण्याची तयारी केली. शौच्याचेवेळी अगदी न कळत देवाचे नाव तोंडात आलं, "अरे देवा हे सहन करायला शक्ती दे. तीन वाजून दोन मिनिटं. लघवीद्वारे काही तरी पडून पुढे रक्ताची धार लागली. दहा सेकंद, पंधरा, वीस सेकंद आणि रक्तस्त्राव बंद. सर्व व्यवहार सुरळित. दुखणं बंद वेदना बंद.'

दुसरे दिवसापासून आपणास काही त्रास होत होता याचीही जाणीव मला राहिली नाहीं.

काय चमत्कार हा! केवढी शक्ती या उदीमध्ये. साईनाथा, धन्य आहे तुमची.

# बाबांची सामान नेण्याच्या बाबतीत मदत

**श्री. हेमचंद्र सदाशिव हळवे**, ५३अ हिरेश्वरवाडी, मुकुंदनगर, पुणे ९

मला पूजनीय साईबाबांचे बद्दल आलेला अनुभव.

मी ६५ साली नोकरीच्या कारणास्तव पुणे येथे आलो. पुण्याला आलो तेव्हा पुण्याला घरांची फार टंचाई होती. परंतु बाबांच्या कृपेने पुण्याला वडि-

लांच्या मित्रांच्या घरीच जागा मिळाली. वडिलांच्या मित्राचा स्वभाव जरी अत्यंत मनमिळाऊ असला तरी मालकिण बाईंचा स्वभाव मात्र अत्यंत नाष्ट. आमच्या दुर्दैवाने मालकांचे हृदय विकाराने निधन झाले.

काही दिवसातच मालकिण बाईंनी घर सोडणेबाबत तगादा लावला. एक दिवस मालकिण बाई मुंबईला असताना एका गुरुवारी सर्व सामान घेऊन बहिणीकडे जाण्याचे ठरवले. घरात सामान बरेच होते आणि मालकिणबाई येण्यापूर्वी सामान हलविणे अत्यंत आवश्यक होते. बाहेर सामान नेण्याबाबत कोणी हातगाडीवाला मिळतो किंवा कसे हे पाहण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणीही दिसले नाही. मनातल्या मनात बाबांचा धावा केला आणि सांगितले देवा ह्या संकटातून तूच सोडव.

साधारण अर्ध्या तासाचे आत एक माणूस आला. मला विचारले तुझे काही सामान न्यावयाचे आहे का? मी त्याला विचारले तुझ्याकडे हातगाडी किंवा काय आहे. तो म्हणाला मी पोती व हातगाडी घेऊन येतो. काही वेळातच त्यांनी पोती आणली व सर्व सामान व्यवस्थित बांधून हातगाडीवर ठेवले. आणि काही वेळातच सर्व सामान माझे बहिणीचे घरी पोहोचवले. सामान आल्यानंतर त्याला विचारले तुला हमाली किती देऊ. त्याने हमाली मागितल्यानंतर मला अक्षरशः धक्काच बसला. त्याने माझ्याकडून फक्त २ रुपये मागितले. त्याने दोन रुपयात सर्व सामान व्यवस्थित बांधून सर्व घर स्वच्छ करून कोणतीही तक्रार न करता फक्त दोन रुपये मागून घेतले. मला तर त्यावेळेस बाबांचे शब्द आठवले (जरी हे शरिर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी) खरोखरच त्या दिवशी बाबांनीच मला त्या माणसाचे रूपात मदत केली असे वाटते.

♦ ♦ ♦

# श्रीबाबांची अमृतवाणी

श्री. शामराव जुवळे, जनार्दन भुवन, ८ छबिलदास पथ, दादर २८

–श्री बाबांच्या बाबतीत घटना, मग ती जागृतीतील असो वा स्वप्नातील असो. जिवाच्या दृष्टीने शिवाशी असलेल्या त्यांच्या ऐक्याची ती द्योतक असते. काही वर्षापूर्वी अशीच एक घटना स्वप्नसृष्टीमध्ये घडली. श्रीसाईसच्चरिताचे वाचन सप्ताहाच्या निमित्ताने चाललेले होते; श्रीसाईनाथांच्या विषयी काही वाचणे, लिहिणे अगर बोलणे म्हणजे त्यांचे स्मृतिसान्निध्यात प्रत्यक्ष वावरण्यासारखे मनाला वाटते. अशा समयी श्रीसाईनाथांनी स्वप्नात दर्शनाचा लाभ घडवून आणला; दर्शन होताच त्यांचे चरण वंदून त्यांच्याच आज्ञेने मी त्यांचे

जवळ बसलो. इतक्यात बाबांची अमृतवाणी प्रेमाने मजजवळ बोलू लागली. "तू अष्टोत्तरशतनामावलीचे नित्य पठण योग्यरितीने न करता घाईघाईने गडबडीत कसेतरी उरकीत असतोस हे बरे नव्हे." लगेच मी बाबांची या अपराधाबद्दल क्षमा भाकून पण योग्यरितीने कसे करावे याचे शिक्षण देण्याविषयी बाबांना विनविले. दयाघन बाबांनी मला शिकविण्यास सुरुवात केली. 'ॐ श्री साईनाथाय नमः ॥ ॐ लक्ष्मीनारायणय नमः।" ......वगैरे नऊ नावे अस्खलीत उच्चारासह मजकडून बाबांनी स्पष्टपणे व सावधानपूर्वक वदवून घेतली. भगवान एक एक चरण सांगते झाले व मी लक्षपूर्वक ते श्रवण करून बोलू लागलो. ही सुमंगल वेळा पहाटेची असल्यामुळे माझ्या मुखातून निघत असलेला शब्दांचा ध्वनी ऐकून माझ्यासमवेत असलेली कुटुंबीय मंडळी झोपेतून जागी झाली व मी सुद्धा जागा होऊन उत्साही वातावरणाने आनंदून गेलो. ही रम्य स्वप्न कथा वर्णन करताच सर्वांना अतिशय आनंद झाला. तोच आनंद इतरांच्याही वाट्यास यावा म्हणून हा "स्वानुभव" येथे देण्यात येत आहे.

# श्रीसाईनाथांचा धावा केला

**श्री. सुरेश चोधरी,** सातारा आपला अनुभव लिहितात—

मी व माझ्याघरातील सर्वजण पूर्वीपासून साईभक्त आहोत. साईकृपेमुळे आम्ही वेळोवेळी संकटमुक्त झालो आहोत. संकटकाली जेव्हा जेव्हा मी साईबाबांचा धावा केला तेव्हा तेव्हा दयाघन साईनाथांनी मला संकटमुक्त केले आहे.

काही दिवसापूर्वी आमच्यावर एक मोठा कठीण प्रसंग आला होता, परंतु साईनाथांच्या कृपेमुळे आता त्या संकटाचे निवारण झाले आहे.

माझ्या बहिणीच्या पोटात दुखते म्हणून तिला हॉस्पीटलमध्ये अॅडमिट केले होते. औषधोपचारांचा काही उपयोग होत नव्हता म्हणून डॉक्टरांनी ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला. परिस्थिती डॉक्टरांच्या आटोक्याबाहेरची होती परंतू डॉक्टरांनी प्रयत्न करतो म्हणून सांगितले. या सर्व घडामोडीत आम्ही सतत साईनाथांचा धावा करत होतो व आमच्या साह्यास धावून येण्यास विनवत होतो आणि साईनाथांच्या कृपेने ऑपरेशन व्यवस्थित झाले. परंतु नंतरही काही दिवस तिची प्रकृति चिंताजनक होती. परंतू साईनाथांच्या कृपेने तिची प्रकृति सुधारत गेली, व तिला जीवदान मिळाले. आता तिची प्रकृति पूर्ववत होत आहे.

या प्रसंगाची आठवण मला आयुष्यभर राहील व जेव्हा जेव्हा मला या प्रसंगाची आठवण होते तेव्हा माझे मन साईबाबांबद्दल कृतज्ञतेने भरून येते.

# बाबांनी मोटार चालू केली

**सौ. सुलभा दि. ऋषी, रेणुकुट, मिर्झापूर (यू. पी.)** लिहितात—

—एकदा आम्ही म्हणजे माझे यजमान, दोन्ही मुले व मी इंदोरास आमच्या मोटारीने जायचे ठरविले. अर्थातच रेनुकूट (जि. मिर्झापूर) ते इंदोर १२०० कि. मी. ड्रायव्हर न घेता बरोबर दोन्ही मुलेच, व प्रथमच कारचा इतका लांबचा प्रवास म्हणून मला जरा काळजीच वाटली, स्त्री स्वभावच 'मन चिंती ते वैरी न चिंती' त्यात मन पोळलेले, असो.

अशा स्थितीत श्रीसमर्थ साईबाबांस (चांदीची मूर्ति) बरोबर घेऊन प्रवासास निघालो. सुमारे ४०० मैल गेल्यानंतर आमच्या गाडीचे टायर फाटले. नवीन स्टेपनी बसविताना गाडी जॅकवरून निसटली. जवळपास वस्ती दिसत नसल्याने मदतीची व मॅकेनीकची अपेक्षा करणे कठीणच.

मला श्रीपरम पूज्य बाबांची आठवण झाली. तेवढ्यात एक म्हातारा सहा-सात सज्जन माणसांना घेऊन धावत आला व त्याने आपलेपणाने आम्हास धीर दिला व गाडी उचलून स्टेपनी लावण्यास मदत केली. परंतु स्टेपनी लाव-ल्यावरही गाडी चालेना. एक मोठा ट्रेलर जात होता त्यास त्या म्हाताऱ्याने थांबविले, त्यातून एक पोरगेलासा ड्रायव्हर उतरून सरळ गाडी जवळ आला व माझ्या यजमानास गाडी चालविण्यास मदत केली, गाडी चालू झाली व तो ड्रायव्हर एका क्षणात बघता बघता काही न बोलता आपला ट्रेलर घेऊन निघुन गेला. नंतर त्या म्हाताऱ्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी काही अपेक्षा न करिता 'भगवान आपका सफर अच्छा करे' असे म्हणून हात जोडले व आम्हास पेरू खाण्यास दिले. आम्ही त्यांना मनापासून धन्यवाद देऊन निघालो.

आम्हाला नंतर कोठेच त्रास झाला नाही. येताना पण आम्हास त्या महान म्हाताऱ्याची आठवण येत होती. गमतीची गोष्ट अशी की परत त्याच ठिकाणी तो म्हातारा वाटेने जाताना दिसला. आम्ही गाडी थांबविली व काही सेवा म्हणून त्याची विचारपूस केली. तो आमच्या गाडीत बसला व पुढील खेड्यात उतरला. त्याचे पाय लागताच आमची गाडी भर वेगात वाऱ्यासारखी धावली व आम्ही हसत खेळत घरी येऊन पोहचलो.

अर्थातच श्रीसाईबाबांच्या सहवासाने आमचा प्रवास सुखावह झाला. ह्याच प्रसंगी माझे मन सद्‌गदीत ओले होऊन श्रद्धेने व भक्तिने मुखातून जे शब्द निघाले ते मी पूज्य माता, पिता, बंधू सखा श्रीबाबांच्या चरणी मस्तक ठेऊन अर्पण करते.

१. मेरे मन में है राम ।
मेरे तन में है शाम ॥
मेरे रोम रोममें भोलाराम रहे ।
प्रभू साईनाथ मेरे साथ रहे ॥
यह आशा हमारी पूरी करो । प्रभू साईनाथ मेरे साथ रहो ॥धृ॥

२. मैं तुम्हारे चरण में पडी रहूं ।
वो मेरे हृदय में बसे रहे ॥
मैं गाती रहूँ तो तुम्हारे लिये ।
मैं हांसती रहूँ तो तुम्हारे लिये ॥
मेरे सारे काज तो तुम्हारे लिये ॥धृ॥

३. तुम मालिक हमारे बने रहो ।
हम दास तुम्हारे सदा रहे ॥
ना डगमग डगमग कदम करें ।
श्रद्धा हमारी सदा रहे
यह बिनती हमारी सुनते रहो ॥धृ॥

**सौ. पद्‌मावती वाशिकर, पुणे यांना –**

# शिरडीत झालेले स्वप्नदर्शन

–पूर्वीपासून मी देवभक्त आहे. श्रीसाईबाबा यांच्याबद्दल काहीच माहिती नव्हती. १९५६ साली माझ्या लग्नाची वाटाघाट जोरात चालू होती. माझे लग्न जवळ जवळ मोडण्यापर्यंत आले होते. पण श्रीदत्तमहाराज यांनी मला स्वप्नात दर्शन दिले. ते असे की, सर्व बाजूनी दारे बंद असलेले श्री दत्ताचे देऊळ होते. दत्ताजवळ जाऊन मी करुणा भाकली, तेव्हा दार आपोआप उघडून मला पादुकांचे दर्शन झाले. त्यानंतर २७ डिसेंबर १९५६ रोजी माझे लग्न व्यवस्थितपणे पार पडले.

त्यावेळेपासून मी नेहमी गुरुवार करीतच होते. १९७३ साली मी माझे बंधू श्री. र. श्री. पुजारी यांच्याकडे श्रीदत्तजयंतीच्या दिवशी गेलो होतो. त्या-

वेळी त्यांनी मला साईलीलेचा अंक वाचावयास दिला. तो अंक पाहून आपणही श्रीसाईलीलेचे वर्गणीदार व्हावे ही इच्छा निर्माण झाली. त्याप्रमाणे मी वर्गणीदार झाले. दर महिन्यास श्रीसाईलीलेचा अंक वाचते. त्यावरून मी कधी एकदा शिरडीस जाईन असे झाले. मनास तळमळ लागून राहिली. पण संसारामुळे हालता येत नव्हते.

अखेर बुधवार दि. ९–१०–१९७४ रोजी माझ्या नणंदेचे यजमान श्री गोपाळराव कुलकर्णी यांच्याबरोबर त्यांच्या गावी म्हणजे नाशकास माझ्या मातोश्रीसह जाण्यास निघाले. पण योगायोग असा की, थेट नाशिकची गाडी न मिळता शिरडीची गाडी मिळाली. अशा रितीने शिरडीस जाण्याची तळमळ अनायासेच पुरी झाली.

त्या दिवशी रात्री म्हणजे बुधवारी शिरडीत मुक्काम केला. दुसरे दिवशी म्हणजे गुरुवारी पहाटे साखरझोपेत असतानाच प्रत्यक्ष श्रीसाईबाबा माझ्या-पुढे उभे! स्वप्नातच मी त्यांचे पाय धरले त्यांना म्हणाले, "बाबा मला तुमच्याजवळ काहीही मागायचे नाही. फक्त माझ्या मुलाला बुद्धी चांगली द्या."

एखाद्या लहान मुलाला ज्याप्रमाणे आई उचलून घेते, त्याप्रमाणे बाबांनी मला जवळ घेतले. माझ्या तोंडावरून हात फिरविला.

मी अचानक जागी झाले. तर ५॥ वाजून गेले होते. उठून स्नान वगैरे करून मी समाधिमंदिराकडे गेले तर माझा माझ्या डोळ्यावर विश्वासच बसेना! मला आनंदाश्रू आवरेनात! कारण तीच मूर्ती माझ्या स्वप्नात आली होती! ती मूर्ती मी पूर्वी कधीही पाहिलेली नव्हती.

मी म्हटले, "बाबा! भक्तांसाठी तुम्ही किती कष्ट घेता!"

गुरुवारचा संबंध दिवस शिरडी येथे राहून, आरती वगैरे सर्व पाहून शुक्रवारी आम्ही नाशकास गेलो.

## तेलाचा चमत्कार

सौ. सुहासिनी सावंत

– राम नवमीचा दिवस जवळ येत होता. मन शिरडीस जाण्यास तळमळत होते. गेले दोन महिने यजमान आजारी होते. मुलाच्या डोळ्याचे ऑपरेशन झाले होते. रजा संपल्यामुळे पायाला सूज असताना यजमान कामावर जात शिरडीला जाण्यास रजा कशी मिळणार ? तिकीटे रिझर्व्ह केलेली नव्हती.

आम्ही रहातो तिथून जवळ असलेले साईभक्त श्री. राम देसाईंच्याकडे मी गेले. माझ्या बाबांना हार घाला. मनात येण्याची इच्छा आहे. पण तिकीट

नाही. घरात अशी परिस्थिती. तिथून मी घरी आले. तर यजमान सांगतात यारी कर तुला उद्या शिरडीला जावयाचे आहे. सौ. प्रभाताईने एक सिट आहे असे टेलीफोनवर सांगितले. मला खरंच वाटेना. साईबाबांची किमया! ी भार बाबांच्यावर टाकून मी शिरडीला गेले.

द्वारकामाईत बाबांच्या पायावर डोके ठेवले. शिरडी माझे पंढरपूर, शिरडी माझे माहेर, तिथे आहे माझी आई, तिच आहे माझी साई ॐनमो: साई तुजविन मज कोण नाही. असे म्हणून बाबांच्या पादुकावर अश्रूंचा अभिषेक केला. पायरीवर येऊन बसल–साईबाबांच्याकडे पहात. इतक्यात एक साईभक्त माझ्याकडे आले. ताई तुम्ही रडता का ? मी त्यांना सांगितले. यजमानांच्या पायाला सूज येते जाते. डॉक्टरी उपचार सर्व झाले. गुण येत नाही. ते म्हणाले, अहो रडता काय ? समईतले तेल घ्या व उदी टाका. पायाला चोळा. मी दोन चमचे तेल बाटलीत घेतले.

मी घरी आल्यावर गुरुवार पासून तीन दिवस तेल चोळले काय चमत्कार? यांच्या पायाची सूज नाहीशी झाली. माझ्या साईबाबांनी माझी हाक ऐकली मला संकटातून मोकळे केले. माझ्या साईनीच मला उपचार सुचवून द्वारका माईत दर्शन दिले.

# मुंज आणि साईबाबा

**श्री. सदाशिव शृंगारपुरे,** अन्नपूर्णा भुवन, प्रधान बिल्डिंग, गोखले रोड, ठाणे, एक प्रचिती लिहितात —

माझ्या मोठ्या मुलाच्या मुंजेच्या वेळची ही गोष्ट. मुंजीच्या आदल्या दिवशी माझ्या सर्वात धाकट्या मुलाला एकाएकी मध्यरात्रीच्या सुमारास ५–५।। डिग्री ताप चढला. त्यामुळे आमच्या मनाची चलबिचल झाली. सकाळी मुंजीचा मुहूर्त कसा साधणार या विवंचनेत आम्ही होतो. माझी आई म्हणाली की, 'प्रथम सकाळी डॉक्टरांना बोलवा' एवढ्या अपरात्री डॉक्टरांना त्रास देणे अप्रशस्त वाटते.' पहाटे ३–३।। च्या सुमारास स्वयंपाक करण्यासाठी आचारी आले. परंतु आमचे कोणाचे लक्ष तिथे लागेना. आणि स्वयंपाक तर लवकर झालाच पाहिजे. पहाटे ५–५।। च्या सुमारास माझा मुलगा 'मला मारू नका, मारू नका. असे ओरडू लागला. आम्ही सर्व घाबरलो.' तापात वात झाला की काय अशी आमची कल्पना झाली. आम्ही त्याला विचारले तुला कोण मारतोय? तेव्हा तो म्हणाला, 'छडी घेऊन कोणीतरी मला मारले' आणि आश्चर्याची गोष्ट अशी की ६ च्या सुमारास त्याला घाम येऊन त्याचा ताप निघाला व

आमची काळजी दूर झाली. नंतर तो उठला. तोंड धुतले व चहा घेऊन आम्हाला म्हणाला की आता मला बरं वाटतंय. मी टाऊन हॉलमध्ये जातो. आमच्या घराच्या समोरच टाऊन हॉल होता व तेथे स्वागतसमारंभ आयोजित केला होता. नंतर त्या दिवशी त्याला कोणताही त्रास झाला नाही. बाबांनी त्याचा ताप झोडपून काढला, व आम्हाला निश्चिंत केले. या गोष्टीवरून मला भिमाजी पाटलाच्या गोष्टीची आठवण झाली बाबा भक्तांच्या पाठीशी सदैव असतात व त्यांच्या संकटांचे निवारण करतात. मी पहिली निमंत्रण पत्रिका बाबांच्या नावे शिरडी येथे पाठविली होती व बाबांनी त्या आमंत्रणाचा स्वीकार केला असे मला वाटते. ते कसे? स्वागत समारंभ टाऊन हॉलमध्ये होता याचा मी वर उल्लेख केलेला आहेच. म्हणून सकाळी ११–११॥ पर्यंत मी तेथे होतो. परंतु माझा धाकटा भाऊ घरी राहून पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था पहात होता, कारण पुष्कळ लोकाना भोजन उरकून ऑफिसमध्ये जावयाचे होते. सकाळी १० च्या सुमारास माझ्या घरी एक वयस्क गृहस्थ आले. त्यांचा कोट पांढरा स्वच्छ होता. फेटा बांधलेला होता. स्वच्छ धोतर परिधान केले होते. ते माझ्या घरी येऊन दारात उभे राहिले. तेव्हा माझ्या भावाने त्यांना विचारले, 'आपणाला कोण पाहिजे?' तेव्हा ते म्हणाले, 'मला एक, पावली दे.' माझ्या भावाने विचारले, 'आपण लाडू, मसालेभात घ्याल का?' ते म्हणाले, 'मला दुसरे काही नको, फक्त पावली दे.' नंतर ते निघून गेले. मला माझ्या भावाने घरी आल्यानंतर ही हकिगत सांगितली. मला आश्चर्य वाटले. तेव्हा बाबांनी माझ्या आमंत्रणाचा स्वीकार केला व ते त्या सद्गृहस्थाच्या रूपाने माझ्या घरी येऊन गेले व दक्षिणा घेऊन गेले असे मी समजलो. बाबा भक्तांच्या निमंत्रणाचा स्वीकार करतात व त्यांच्या घरची कार्ये निर्विघ्नपणे पार पाडतात हे निश्चित. सातासमुद्रापलीकडे जरी भक्त गेला तरी बाबा त्याची पाठराखण करतात.

# असा तो कोनाडा

श्रीकृष्ण गंधे, २४२० ज्ञानेश्वर मंदिरामागे, संगमनेर

– गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून मी बाबांची उपासना करतो. आमच्या स्वयंपाक घरात उत्तरेकडच्या भिंतीत एक मोठा कोनाडा आहे. इतका मोठा की त्यात एक मनुष्य सहजपणे बसू शकेल व तरीही आसपास बरीच मोकळी जागा राहील. म्हणून माझ्या मनात असे आले की या कोनाड्यात साई-

बाबांची मूर्ती ठेवावी म्हणजे पूजा–स्तोत्र–वाचन वगैरे व्यवस्थित व अलिप्त पणाने करता येईल. खरे म्हणजे हा कोनाडा ज्या भिंतीत आहे त्याच भिंतीला लागून बाहेरच्या बाजूस संडास आहे. परंतु ही गोष्ट त्यावेळी माझ्या लक्षात आली नाही किंवा आली असल्यास तिच्याकडे मी दुर्लक्ष केले. कोनाड्याला रंग देऊन मी तो सुशोभित केला आणि त्यात बाबांच्या मूर्तीची स्थापना केली. माझ्या दृष्टीने मला तो कोनाडा या कामासाठी प्रशस्त वाटला.

यानंतर दोन–तीन दिवस गेले. चौथ्या दिवशी सकाळीच ६ च्या सुमारास माझे एक स्नेही श्री. उद्धव बापूजी सोनांबेकर हे माझ्याकडे आले. इतक्या सकाळीच ते आलेले पाहून मला आश्चर्य वाटले. चहाची वेळ होती म्हणून चहाचा कप त्यांच्यापुढे ठेवीत मी विचारले—

'आज सकाळीच काय काढले?'

चहाची रिकामी बशी खाली ठेवीत ते म्हणाले–

'तुम्ही साईबाबा कुठे ठेवले आहेत?'

कोनाड्याकडे बोट दाखवित मी म्हणालो–

'हे काय इथे आहेत!'

माझ्या मित्राने तो कोनाडा जवळ जाऊन पाहिला आणि विचारले—

'या कोनाड्याच्या बाहेरच्या बाजूला संडास आहे का?'

'होय!' मी उत्तरलो.

त्यावर ते म्हणाले 'तुम्ही तावडतोब बाबांची मूर्ती इथून हलवा! आज पहाटे मला एक स्वप्न पडले. एक फकीर मला दिसला. तो मला म्हणाला– "अरे, झोपलास काय! उठ! तुझ्या दोस्तांनं मला नरकात बसविले आहे! जा सांग त्याला!"

"मी त्यानंतर लगेच उठलो व तोंड धुवून तुमच्याकडे आलो. तेव्हा तुम्ही तावडतोब बाबांना तिथून हलवा!"

ते ऐकताच माझे डोळे भरून आले. माझ्या मित्राचे आभार मानले. त्याच दिवशी बाबांची मूर्ती मी तिथून हलवली. अशा अनेक प्रेरणा बाबांनी आजपर्यंत दिल्या आहेत. बाबांचे आपल्या भक्तांकडे किती लक्ष आहे हेच या गोष्टीवरून दिसून येते. आपल्या भक्तासाठी ते सदैव जागृत असतात. हस्ते–परहस्ते प्रेरणा देत असतात.

❦ ❦ ❦

# श्री साईंची एक त्वरित फलदायी उपासना

श्री. विश्वनाथ अनंत कुलकर्णी, ई वार्ड शिवसदन, कोल्हापूर

– २०–२१ वर्षाची तरणीताठी कोवळी पोर; आईबापांची एकुलती एक लाडकी लेक. सर्व सुखाची साधने हात जोडून दत्त म्हणून उभी असताना कुटुंबातील सर्वांचे मनःस्वास्थ हरवलेले; कोणत्याही वैद्यकीय उपचाराने मुलीची तब्येत सुधारेना.

अशाच एका संध्याकाळी मी या घरात गप्पा मारण्यासाठी म्हणून प्रवेश करता झालो. पण घरातील प्रत्येक माणूस कुठेतरी स्वतःशीच हरवल्यासारखा दिसू लागला. मलाही चैन पडेना. त्यांची व्यथा जाणून घेतल्याशिवाय स्वस्थही बसवेना.

मुलीचे वडील बोलते झाले, सर्व वैद्यकीय उपचार करून पाहिले. निष्णात आणि तज्ञ डॉक्टरांचाही सल्ला घेतला. मानसोपचार केंद्रातही निराशाच पदरी आली, देवदेवस्की, मांत्रिक प्रकार करून पाहिले, पण मुलीला झोप मात्र काही केल्या लागत नाही; उलट प्रत्येक ठिकाणी तीव्र निराशाच पदरी पडली.'

मीहि त्यांच्या ह्या वेदनेने व्यथित झालो. अडचणीत सापडल्यानंतर गैर-फायदा घेणाऱ्या बुवाबाजीबद्दल माझाही सात्विक संताप उफाळून वर आला आणि सहज भावनेच्या भरात मी त्यांना एक शेवटचा उपाय म्हणून खाली नमूद केलेली उपासना सांगितली.

'झोपण्यापूर्वी १५ मिनिटे श्री प. पू. साईबाबांच्या फोटोवर – भ्रूमध्यावर –त्राटक करावे. व अत्यंत कळवळीने आणि तीव्रतेने श्रीबाबांची प्रार्थना करावी, की मला अत्यंत शांत व गाढ निद्रा द्यावी. तसेच शक्य व सोयीचे झाले तर श्रीबाबांच्या द्वारकामाई धुनीतील उदीची एक चिमूट उशीवर टाकावी.'

आणि दुसऱ्याच दिवशी अगदी भल्या पहाटे मुलीचे वडील माझ्या घरी आले व त्यानी तावडतोब त्यांचे घरी येण्यासंबंधी विनंति केली. जाऊन पाहतो तो मुलगी गाढ निद्रेत. सहज उपाय म्हणून सांगितलेला आणि श्रद्धापूर्वक त्या मुलीने आचरणात आणलेल्या ह्या प्रयत्नाला श्रीबाबांचा पूर्ण आशिर्वाद. मलाहि मनापासून आनंद झाला.

श्रीसाईभक्तांपैकी अर्धशिशी, दमा, निद्रानाश, इ. व्याधांनी ग्रस्त असले-ल्यानी हा उपाय अवश्य करून पाहावा. ॥॥

# काय आश्चर्य ! स्वप्नात बाबा भेटले

उद्धव भावसार म्हणतात,–

– साईबाबांनी मला स्वप्नात दृष्टांत दिला. स्वप्नात साईबाबा आपल्या भक्ताला दर्शन देतात. सकाळी चार वाजण्याचा सुमार होता. थंडी बरीच पडली होती. पण मी बारा एक शिवाय कधीच झोपत नाही. झोपण्याअगोदर साई-बाबांना उदबत्ती लावून बाबांचे नाव घेत आपले डोळे बंद करतो.

कुठल्याही गोष्टीचे वेड लागले पाहिजे असे दहिसरचे काकडेबाबा सांगतात. संत व संग हे मिळवायला फार मेहनत पडते, पण जर का एकदा त्या गोष्टीचा माणसाला नाद लागला की एकदम सोपे आहे, काहीही कष्ट पडत नाहीत, फक्त तोंडाची मेहनत. उठताना, बसताना, चालताना, फिरताना एकच साई. मुखी त्या नामाची सारखी उजळणी जर आपण केली तर बाबांचे आपणाला खात्रीने दर्शन होईल. साईबाबा स्वप्नात कसे भेटले ते मी आपणाला सांगतो.

पंढरपूरचे वाळवंट होते, चंद्रभागा वाहत होती. साईबाबा त्या वाळवंटात उभे होते. डोक्याला एक फाटकी कफनी रुमाल आणि गुडघ्यापर्यंत एक पंचा लावलेला. मी त्यांच्या जवळ उभा होतो. साईबाबा मला म्हणाले, अरे उद्धवा तू माझ्याजवळ कशाला उभा आहेस ? जा जा त्या देवळात, तो विठ्या तुला बोलावतो आहे त्याला जाऊन भेट. मी बाबांना नमस्कार केला आणि निघालो. देवळाचे दरवाजे उघडे होते. मी आत गेलो. एकाएकी मला आवाज ऐकू आला आणि माझ्या नावाने मला हाक मारली, 'उद्धवा येरे ये आत ये'. मी आत गेलो तर विठ्ठल बाहेर आले. त्यांच्या मागे साईबाबा पण बाहेर आले. मी दोघांना पाहिले, दोघेही गरुड खांबाजवळ उभे राहिले. एका बाजूला विठोबा दुसऱ्या बाजूला साईबाबा व मध्ये तो गरुड खांब होता आणि एकदा साई विठोबाच्या स्वरूपात दिसत तर एकदा विठोबा साई स्वरूपात दिसत असे. साईबाबांनी मला आपले रूप दाखविले आणि असा दृष्टांत दिला की मी आणि विठोबा काही वेगळे नाही. तुला जी भजने लिहायची असतील ती लिही. मी तुझ्याजवळ आहे. मन निर्मळ ठेव, असा मला आशिर्वाद दिला व दोघेही गुप्त झाले. आणि तेव्हापासून मला साईबाबांचा ध्यास लागला. आता मी सदा साईनामात रंगलेला असतो. मी माझ्या संसाराची कधीही पर्वा करीत नाही. माझे एक छोटेसे पेनचे दुकान आहे. दादरमधील रानडे रोडच्या डॉ. दाभोलकर-च्या आसऱ्याला मी असतो. माझे ते अन्नदाते आहेत असे म्हटले तरी चालेल

जो काही धंदा होतो त्यात माझा जेमतेम गुजारा होतो, पण मला त्याचे काहीच वाटत नाही. कारण जे माणसाच्या नशिबी असेल तेच घडत असतं. मी कधीच हाव करित नाही जे काही मिळेल त्यात आपला संसार चालवावा यातच मला गोडी आहे. बाबांजवळ आतापर्यंत मी काहीही मागितले नाही कारण मागुन कोणीही देते न मागता मिळाले तरच ते आपले समजावे. तो साई फार दयाळू, कृपाळू, भगवंत गरीबांचा गरीब व श्रीमंतांचा श्रीमंत आहे. त्याच्यावर भरवसा ठेवून त्या शिरडीवाल्या साईबाबांचे नाव घ्या.

॥ ॥ ॥

# चित्रकलेत अपेक्षित सहाय्य

**शिरीष गंधे,** २४२०, उपासनी गल्ली, पो. संगमनेर, जि. नगर.

– श्रीबाबांविषयी अनेक अनुभव अनेक भक्तांना अनेक वेळा आले असतील व येत असतील. आज गेली वीस–पंचवीस वर्षे आमच्या घराण्यात श्रीबाबांची भक्ति चालू आहे. आजपर्यंत विविध अनुभव आम्हाला आले आहेत. खरोखर बाबांची लीला अगाध आहे.

बाबां विषयी काय लिहावे नी काय नाही हे समजत नाही! तसं म्हटलं तर मी एक चित्र काढणारा सामान्य माणुस! अनेक देवादिकांची चित्रे काढून चित्रभक्ती करणारा मी. मलासुद्धा माझ्या चित्रकलेत अनेक अनुभव आले आहेत. त्यातला एक अनुभव सांगण्यासारखा आहे तो सांगतो —

लहान असताना आपण मोठा चित्रकार व्हावे ही आशा मी मनाशी बाळगून असे. पुढेपुढे ही आशा अधिक दृढ होत गेली. परंतू विधिलिखीत वेगळेच असते. एस्. एस्. सी. नंतर चित्रकलेच्या उच्च शिक्षणासाठी न जाता मी सरळ कॉलेजात नाव दाखल केले. पी. डी. ला असतानाची गोष्ट. आपली चित्रे मासिकातून वगैरे छापून यावीत असे मला सारखे वाटे. पण हे कसे शक्य होणार? म्हणून मी साप्ताहिके मासिके यातील विविध चित्रे सारखी बारकाईने बघून त्यांचा अभ्यास करी.

शेवटी एकदा एक चित्र काढण्याचे ठरवून मी प्रथम गणपतीचे चित्र काढले आणि ते बाबांच्या तसबिरी समोर ठेऊन 'बाबा मला यश येऊ द्या'. अशी प्रार्थना पूरी करून पाकीटात घालून ठेवले. दुसऱ्या दिवशी सा. गांवकरी ला पाठवू असे ठरवून मी घराबाहेर पडणार इतक्यात आमचे एक स्नेही श्री. ढेपे यांच्या कन्या, पूर्वाश्रमीच्या (कु. सुधा ढेपे) आताच्या सौ दिक्षीत या आपल्या पतीबरोबर आमच्याकडे आल्या. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर

चित्रांचा विषय निघाला. दुसऱ्याच दिवशी ते नाशिकला जाणार होते. तेव्हा त्यांना ते चित्र दाखविले. त्यांना ते इतके आवडले की, त्यांनी ते नेण्याचे कबूल केले. आणि विशेष म्हणजे गांवकरीचे कार्यकारी संपादक श्री. भंडारी हेही त्यांच्याच वाड्यात नाशिकला राहतात, हे कळल्यावर माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही. खरोखर बाबांनी कशा अभावितपणे सर्व गोष्टी जुळवून आणल्या होत्या. मनातल्या मनात मी बाबांचे आभार मानून, ते चित्र त्यांच्या हवाली केले, आणि बरोबर गणेश चतुर्थीला म्हणजे सप्टें १९७३ च्या सा. गावकरीत ते प्रसिद्ध झालेही. त्यानंतर मी प्रत्येक चित्र काढून ते बाबांपुढे ठेऊन नंतर प्रसिद्धिस पाठवित असे. हा क्रम आजतागायत चालू आहे. विशेष गोष्ट अशी की, ती सर्व चित्रे प्रसिद्ध होतात. हे सांगण्यात मला अतिशय आनंद होत आहे. फक्त आपल्या अंतःकरणात आत्यंतिक तळमळ आणि प्रखर निष्ठा या गोष्टी मात्र हव्यात की, आपले काम झालेच म्हणून समजा. आतापर्यंत माझी कित्येक चित्रे विविध साप्ताहिकातून, मासिकातून प्रसिद्ध झालेली आहेत. या सर्वांना कारण बाबा आणि फक्त बाबाच आहेत. त्यामुळे मी फार मोठा चित्रकार नसलो, तरी समाधानी चित्रकार आहे एवढे मात्र निश्चित!

# दुखणारा हात व पाय बरा झाला

**लक्ष्मीतनया,** म्यु. कॉलनी १/३ वर्वेनगर, मुं. ८४ घाटकोपर लिहितात,

—मी हात दुखत होता म्हणून डॉ.कडे गेले. सुमारे दोन सप्तक औषध दिल्यावर त्यांनी सांगितले "फोटो काढावयास हवा, भगवंताचे नाव घेत जा. तोच दुखणे निवारण करणारा" असे सूचीत केले. क्षणभर मी चमकले, तथापि माझी नजर त्यांच्या टेबलावर पडलेल्या 'श्रीसाईलीला' मासिकाकडे गेली. झटकन उजव्या हाताची बोटे मस्तकाला लावून बाबांना प्रणाम केला. आणि अंक उचलीत विचारले, 'पाहू का जरा" "हो! हो! घेऊन जा घरी वाचावयास" ते सर्वोदयाचे कार्य करतात असे माझ्या कानी होतेच.

खरं म्हणजे मालिश करताना माझ्या लक्षात आले होते की, दंड लंबवर्तुळाकृती काळा निळा पडला आहे. आणि त्याचे कारण गाडीतील गर्दीत तो बारवर चेंगरला गेला होता. कारण क्षुल्लक, परंतु भोग मात्र मोठा अं! मनात आले रोग–भोग, लाभ–लय सर्व ईश्वरप्रणीतच हेच खरे! वेदना असह्य होऊन अक्षरशः रडे कोसळे, रात्र रात्र जागणे होऊन अशक्तपणा वाटत होता. वेणीफणी, वस्त्रपेहरणे आदि गोष्टीत दयनीय पराधीनता झाली होती. कारण

दुसऱ्या हाताने बोराएवढे भांडेहि उचलत नव्हते. जरा हालचाल झाली तर कंप सुटे, हाताला! कोणी म्हणे "हात बारीक बारीक होत जाईल. वेळेवर जा बाई मोठ्या डॉ. कडे" वगैरे वगैरे. मी मन विचलीत होऊ न देता भगवंत भजनात काळ काढला.

माझ्या व्यवसायी मंडळीकडून शिरडीची वर्णने कानभर श्रवण केली होती. उत्तर भारतातील सर्व क्षेत्रे आईबरोबर पाहिली होती. मनात येई शिरडी क्षेत्रही एकदा पाहून यावे. पण योग येईना. अंक पन्नास वर्षे नियत असून मी मुंबईत राहूनही मला ठाऊक नव्हते. प्रत्येकाचे अनुभव, बाबांचे चरित्र, दृष्टांत वाचून आदर व निष्ठा वाढली.

दर दिवशी दर सायंकाळी बालचमू माझ्या घरी आरत्या, भजने, स्फुट श्लोक वगैरे प्रार्थनेसाठी येतात. त्यातील एका बाळ सवंगड्याने अचानक सहजतेने म्हटले, 'ताई, बाबांची उदी लावा हाताला, बरी होईल बघा!" आणि खरोखर त्या चिमण्या राजूने धरून मला उदी आणूनही दिली. मी मोठ्या निष्ठेने लावलीहि.

दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता माझे मोठे बंधू गावाहून येऊन दत्त म्हणून समोर हजर. त्यांना कोणीतरी कळविले म्हणे. त्यांनी गावच्या डॉ.कडून एका इंजेक्शनचे नाव लिहून आणले होते. ते लगेच बाजारातून आणले गेले. पण पुन्हा अडथळा. डॉ. म्हणाले, "हे सायन हॉस्पिटलमध्ये घ्यावे लागेल. मला नाही देता येणार कारण ते खाद्यांच्या सांध्यात द्यावयाचे असते." पण मला कोठून प्रेरणा मिळाली नकळे, मी ठासून म्हटले "मसलवर द्या हो डॉक्टर! नाही गुण आला तरी बिघाड तर होणार नाही ना?" "नाही, नाही" डॉ.चे उत्तर. हाताला ५ इंजेक्शनातच गुण आला. नव्हे तो संपूर्ण बरा झाला आहे. वाटले अडचणी अडथळे दूर करण्याचे सामर्थ्य बाबांच्या उदीतच आहे.

माझे पाऊल त्याचवेळी एकाएकी खूप सूजले. चप्पलही जाईना. व्यवसाय भगिनींनी नाना शंका–कुशंका काढल्या. एका सरकारी डॉ.ने तर हा हत्तीपाय आहे लवकर इलाज करा असा इशारा दिला होता. दाताखाली पॉयझन तयार होऊन असे झाले असेल, वेळेवर दात काढून घ्या हो असे आलाप ऐकू येत. मन क्षणभर कावरेबावरे होई. पण श्रद्धा अटळ त्यामुळे ते खंबीर राहिले. थंडावेळ पायाला उदी कशी लावावी? अशा संभ्रमात पडले. पण लगेच आठवले, मांत्रिक नाही का दुसऱ्या पायावरही रक्षेचा उपयोग करीत. आणि मोठ्या निर्धाराने बाबांची मनोभावे क्षमा मागून पायाला उदी लावलीही. त्यावेळी डॉ.ने मात्र टागून उच्चरवाने सांगितले, "कोण म्हणतो हत्तीपाय आहे? हा मुंगीपायही नाही. अशक्तपणाने सुजला आहे बरं!" झाले, माझी निष्ठा, श्रद्धा यांची पकड दृढ झाली.

उदी लावण्याचा क्रम नित्याचा ठेवला. आणि खरोखर चमत्काराप्रमाणे ध्यानीमनीं नसताही अचानक मला शिरडीला जाण्याचा योग आला. मी जाण्यासाठी रजा घेऊन घरी आले, त्याच दिवशी दोन सुवासिनी मत्रीणींनी बातमी आणली. म्हणाल्या, "तुम्हांला प्रमोशन मिळाल्याचा हुकूम आजच आला आहे" ऐकून आनंद तर झालाच त्यापेक्षा, बाबांविषयींची भक्ति-भावना दसपट वाढली.

खरं सांगायचं तर, खंबीर मनहि प्रसंगी खचते. अल्पकाळ का होईना, अगदी भयभीत हरिणीसारखी मनाची गत झाली होतीच. वाटे विज्ञानयुग हे! यात शोधाबरोबर धोकेही अमाप. न जाणा आपण सर्जनांच्या सर्जरीचे शोचक भक्ष्य ठरलो तर? अशी शंकेची पाल चुकचुकायची. एक पाय, एक हात निकामी. दंतपंक्तीचे उच्चाटन असा शेवट असणारे, कल्पित चित्र चितारी मन. पण म्हणतात ना, पवित्र भाविक ज्ञात असणारा प्रभूजी भक्त–रक्षणाला धावून येतो. कोणासहि 'मदतीस जा' अशी प्रेरणा देतो. मला कोणत्याही मोठ्या डॉकडे जावे लागले नाहीं. संपूर्ण निरोगी देह संत सेवेस सज्ज आहे. माझे कथन श्रद्धेविना उमगणे नलगे!

♦ ♦ ♦

# बाबांच्या उदीचे सामर्थ्य

**श्री. उल्हास वासुदेवराव सकपाळ, दादर, मुंबई २८.**

– रात्रीचे १० वाजले होते. मी फार दमून आल्यामुळे थकवा वाटत होता. भूक लागली होती परंतू काही खाण्याची इच्छा नव्हती. डोके जड झाल्यासारखे वाटत होते. मनात थोडीशी भीती वाटत होती, मी जरा घाबराघुबरा झालो होतो. झोपण्यासाठी झोपण्याचा प्रयत्न करीत होतो. परंतू झोप काही केल्या लागत नव्हती. ह्या कुशीवरून त्या कुशीवर मी सारखा तळमळत होतो. एकाएकी थंडी वाजू लागली. अंगावर दोन–दोन ब्लँकेटस् घेऊनही थंडी वाजत होती. थर्मामीटर लाऊन पाहिले एकदम १०४° पर्यंत ताप होता. अंग फार तापले होते. आई आई म्हणून आईला हाक मारीत होतो. आईने ताबडतोब श्रीसाईबाबांची उदी लावली, माझ्या तळमळण्याने आई माझ्या शेजारीच बसून होती. रात्रीचा एक वाजला, मला थंडी जोरात वाजू लागली. बाबांची उदी लाऊन आईने जरा अंग टेकले. तिला साधारण डोळा लागला होता. दिवा विझवून मी झोपण्यासाठी घट्ट डोळे मिटले. अंगावर तोंडापर्यंत ब्लँकेट घेतले. श्रीसाईबाबांचे नामस्मरण जोरात चालू ठेवले, तेवढ्यात भिंतीवरील पाल माझ्या तोंडावर पडली. माझ्या तोंडावर ब्लँकेट होते म्हणून मला काही

समजले नाही, आईला उठवून दिवा लावण्यास सांगितले, आईने दिवा लावून पाहिले. पहाते तर पाल! आई जोरात म्हणाली पाल आहे म्हणून, तसे मी जोरात ब्लँकेट झटकून दूर केले. ब्लँकेट झटकून दिले आणि काय चमत्कार एकाएकी माझी थंडी दूर पळाली. अंग एकदम गार आले, मला हुषारी वाटली. उठून मी पाणी प्यालो व बाबांना नमस्कार केला, हे सर्व बाबांच्याच कृपेने झाले. आईला देखील हायसे वाटले. बाबांच्या उदीचा केवढा मोठा चमत्कार. असे कित्येक अनुभव आमच्या घरात सर्वांना आलेले आहेत. आमच्या आईला तर श्रीसाईबाबांचा साक्षात्कार झालेला आहे. अशीच श्रीसाईबाबांची कृपा-दृष्टी असावी हीच साईचरणी इच्छा.

# संकटातून मुक्तता

**श्री. प्रकाश श्रीकृष्ण सहस्त्रबुद्धे,** डोंबिवली.

– मी स्वतः, त्याबरोबर माझे मित्र सुधीर आटकेकर, मुकुंद गोखले, माधव देशपांडे, सी. आर्. देशपांडे, नरेंद्र तारावादकर, प्रकाश राजे व रविंद्र देशपांडे यांसह "एलिफन्टा केव्हज्' पहायला गेलो होतो. श्रीसाई कृपेने जाताना कोणताच त्रास झाला नाही. सुमारे १० च्या सुमारास आम्ही गेट वे पासून निघालो. तिथे थोडावेळ थांबल्यावर ३ च्या सुमारास परत यावयास निघालो. लॉन्चमध्ये बसलो. लॉंच सुरु झाली. अर्धे अधिक अंतर कापले असेल नसेल तोच एका-एकी मुसळधार पाऊसास सुरुवात झाली. पावसाचे थेंब जोरजोराने लॉंचवर आदळू लागले. सागराने अकाळ विक्राळ रौद्र स्वरुप धारण केले. उंच उंच लाटांवर आमची लॉन्च हेलकावे खाऊ लागली. कधी कधी तर तिचा तोल जातो की काय? अशा शंकाकुशंकांनी मन घाबरुन गेले. माझे मित्र व इतर लॉन्चमधील प्रवासी घाबरुन गेले. करुणा सागर श्रीसाईबाबांचा मी धावा सुरु केला. साईबाबांवर माझा नितांत विश्वास आहे. या संकटातून साई-कृपेने आम्ही मुक्त होऊ एवढा आत्मविश्वास मला वाटत होता. गेट वे ला येण्या ऐवजी लॉन्च कप्तानाने भाऊच्या धक्याकडे मार्गक्रमण करण्यास सुरुवात केली. खवळलेला सागर आ वासून आमच्याकडे पहात होता. साईबाबांचा धावा मी करीत होतो व साई कृपेने अखेर भाऊचा धक्का दिसू लागला. साईबाबांची ही कृपा मला वारंवार मदत करते.

# देव ते संत, देव ते संत

**श्री. व्यंकटराव कृष्णाजी मुळे,** दादर २८.

– देव ते संत, देव ते संत निमित्त त्या प्रतिमा, इति श्री तुकाराम. १९५४

साली मला शिर्डीला जाण्याची प्रथम संधी मिळाली. दादर मुंबई नं. २८ येथील आमच्या कलेतील प्रसिद्ध व्यवसाय बंधू ( शिवणकला व कापड व्यापार ) यांच्या सोबतीने कंपनी रूपाने जाण्याचा सुयोग आला. शिर्डीला गेल्यापासून श्रीसाईबाबांचे दर्शन झाल्यापासून मनाला श्रीबाबांविषयीची एक प्रकारची गोडी लागली ती आजपावेतो कायम आहे.

श्रद्धा, सबूरी हे दोन पैसे श्री साईबाबांना आपण द्यावे. असे श्रीसाईबाबा आपल्या भक्तांना सांगतात. हे तत्त्व श्रीसाईसद्‌चरित्रात वाचताना मोठ्या भक्तीने आपण वाचतो. पण प्रत्यक्ष आचरणात आणताना आपण गडबडतो. दृढ निश्चयाने जर हे दोन पैसे आपण सद्‌गुरु चरणी वाहीले. त्यालाच श्रीसाई-बाबाकडून ऐहिक व पारमार्थिक सुखाचा लाभ मिळत असतो. हे तत्व मी स्वतः-च्या जीवनात आणून आतापर्यंत आयुष्याची वाटचाल चालू ठेवली आहे. त्यामुळे जरी माझ्या जीवनात सुखदुःखाशी तोंड द्यावे लागले तरी ते सहन करण्याची शक्ती सद्‌गुरु च्या श्रद्धा व सबूरीवर मला मिळत आहे.

आमचे सर्व कुटुंब मुलगा, मुली, सुना, नातवंडे ही साईभक्त आहेत व अगोदर आई, वडिलांपासून पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाची वारी ४५ वर्षापासून आमच्या घरात चालू असून, इतरही धार्मिक विधि होत असल्याने माझे कुटुंब श्रद्धाळू, धार्मिक आहे. आई, वडिलांच्या पश्चात मी २५ वर्षापासून पंढरीची श्री विठ्ठलाची वारी चालू ठेवली आहे. मला सहा, सात वर्षामागे छातीचा अॅटॅक आला. तेव्हापासून माझी मुले अधून मधून शिर्डीला व पंढरपूरला जात असतात. मी सध्या घरातच माझ्या आराध्यदैवतांचे देऊळ समजून पूजा, अर्चा सेवा करीत आहे. तसेच साईसत्‌चरित्राचे पारायणही अधून-मधून चालू असते. शिर्डीला पूजा, अर्चा, दक्षिणाही बाबांच्या कृपेनेच ते आमच्याकडून करवून घेतात.

मी नित्य नियमाने सकाळी श्रीसाईबाबांची उदी पाण्यात घालून तिचे सेवन गुरुतीर्थ म्हणून घेतो व कपाळालाही उदी लावतो. त्यामुळे मला मानसिक शांतता व आराम मिळतो.

माझी मोठी मुलगी सौ. शांता अंबाजीराव सरोदे ही निस्सीम साईभक्त आहे. तिलाही श्रीसाईबाबांनी वेळोवेळी पुढील प्रसंगाची सूचना, दृष्टांत दाखवून, सुखदुःखात सहाय्य केले आहे तिच्या पाठीशी ते प्रेमाने उभे आहेत.

श्रीसाईबाबा हे देहधारी असताना आपले कार्य जसे चोख, स्वच्छ व सुंदर पद्धतीने ठेवत. ती शिकवण ते भक्तांकडून करवून घेतात. त्याचप्रमाणे ते आजही समाधिस्थ अवस्थेत राहूनही त्यांचे प्रत्येक कार्य सजीवतेचे आहे. हे शिर्डी

संस्थानच्या कार्यातून दिसून येते. भारतातच नव्हे तर सर्व देशातील मानवाचा विश्वास, ह्या शिरडीक्षेत्राकडे व श्रीसाईबाबांकडे आकर्षिला जातो.

माझी पत्नी कै. सौ. नर्मदाबाई व्यंकटराव मुळे ह्याही फार साईभक्त होत्या. त्या गेल्याच वर्षी पोटाच्या विकाराने फार आजारी असताना शेवटच्या क्षणी तिच्या उशाखाली श्रीसाईलीलेचे मासिक होते. ते उचलून माझ्या मोठ्या मुलीने तिच्या छातीवर ठेवताच तिने हसत हसत आपला देह साई-चरणी विलीन केला.

श्रीसाईबाबांची अकरा वचने जो मनुष्य पठण करून, त्याचे मनन करून आचरणात आणतो, त्याचा उद्धार सद्गुरू कृपेने होतो. श्रीसद्गुरु साईनाथांच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम !

# निंबवृक्षाची किमया

**श्री. मा. ग. गोरे,** विनायक बाग, बालाजी मंदिरमार्ग, कुर्ला, ७०,

–१ एप्रिल १९६९ मध्ये मी, बायको व माझी मुलगी सुजाता वय २ वर्षे औरंगाबाद जवळील सुप्रसिद्ध वेरूळची लेणी बघायला गेलो होतो. त्यावेळी तेथे कडक उन्हाळा होता. आम्ही लेणी बघता बघता सुजाता माझ्या खांद्यावर झोपली. जराबेळाने तिच्याकडे मी पाहिले तो तिचा चेहरा लालबुंद झाला होता. व डोके तापले होते. मी तिला दोन तीनदा हाक मारली पण ती जागी होईना. आम्हाला वाटले तिला उष्माघात झाला. आम्ही दोघे एकदम घाबरून गेलो. मग लगेच आम्ही तेथे जवळ रस्त्याच्यालगत असलेल्या झाडाखाली बसलो. तेवढ्यात माझे लक्ष झाडाकडे गेले. मी बायकोला म्हटले, तिला काहीही होणार नाही. कारण हे झाड कडूनिंबाचे आहे. म्हणजेच सुजाता बाबांच्या मांडीवरच होती. तेव्हा आम्ही काहीवेळाने तिला पुन्हा हाक मारली तो ती सहज झोपेतून उठल्यासारखी जागी झाली व आपल्याला काहींच झाले नाही अशा स्वरूपातच ती खेळायलासुद्धा लागली. माझी पूर्णश्रद्धा आहे की, केवळ ती बाबांच्या निंब वृक्षाखाली असल्याने तिला कोणताही अपाय झाला नाही.

# जया मनी जैसा भाव ।
# तया तैसा अनुभव ॥

– २ एप्रिल १९७३ मधील गोष्ट. मी हाय ब्लडप्रेशरने आजारी होतो. रात्री ९ वाजता मी श्रीसाईलीलेचा एक जुना अंक चाळत होतो. त्यात मी एक अनुभव वाचला की एक भक्त आजारी होता. तेवढ्यात त्याचा कोणी मित्र तेथे आला व त्याने नुकतीच शिरडीहून आणलेली उदी त्याला दिली व त्यावेळेपासून त्याला आराम पडला. मी मनात म्हटले बाबा, मलागुद्धा असा काही चमत्कार दाखवा. बरोबर २॥ तासांनी म्हणजे त्याचरात्री ११॥ वाजता दरवाजाची कडी ठोठावली गेली. मी दरवाजा उघडून बघतो, तो माझा मित्र श्री मधु पवार शिर्डीचा प्रसाद, उदी घेऊन हजर. मी त्यास विचारले तू आता कसा आलास. तो म्हणाला, मी आजच सकाळी शिर्डीहून परत आलो व उद्या मला वेळ नाही म्हणून तुम्हांला आताच प्रसाद व उदी द्यावयाला आलो. ती उदी मी लगेच कपाळी लावून व थोडी खाऊन झोपलो. दुसरे दिवसापासून माझ्या आजारपणाला उतार पडला. आहे की नाही बाबांची रोकडी व त्वरीत प्रचिती.

# श्री बाबांची कृपा

**सौ. सरला सु. गर्जे, ८० शिवाजीनगर, पुणे ५.**

– सात–आठ महिन्यापूर्वीची घटना. आम्ही सहकुटुंब सह–परिवार श्रीक्षेत्र शिर्डीला श्रीबाबांच्या दर्शनासाठी गेलो होतो. भल्या पहाटे उठून, स्नान वगैरे उरकून आम्ही समाधी मंदिरात श्रीबाबांच्या काकड आरतीसाठी गेलो. मंदिर भक्त-मंडळींनी तुडुंब भरले होते. प्रत्येक जण स्वतःला विसरून श्रीसाईमध्ये विलीन झाला होता. सर्व वातावरण साईमय झाले होते. सर्वत्र मांगल्य आणि पावित्र्य भरून राहिले होते. काकड आरतीचे सुस्वर त्या प्रसन्न वातावरणांत अधिकच धुमर वाटले.

काकड आरतीचा सोहळा आणि श्री बाबांचे ते साक्षात्कारी मोहक रूप न्याहाळत असताना अक्षरशः मी देहभान विसरले होते. आपण स्वर्गात तर नाही ना असा भास होत होता. आरती नंतर श्रीबाबांना अभ्यंग स्नान घातले.

हा सर्व सोहळा अवर्णनीयच म्हणावा लागेल. याचि देही याचि डोळा हे सर्व पहात असताना जीवनाचे सार्थक झाले.

श्रीबाबांच्या समाधीसमोरील फरशीवर एक छोटीशी बैठक अंथरलेली होती. बैठकीवर एक तबलजी व पेटी (हार्मोनियम) वाजविणारे गृहस्थ विराजमान झाले होते. एक भक्त आपल्या भाव मधूर स्वरात भक्ति–गीत गात होते. तबला व पेटीची साथ गाण्याला रंग भरत होती. दुग्ध–शर्करा योगाप्रमाणे हे भावपूर्ण गीत त्या पवित्र, पावन् अन् श्रीबाबांच्या स्पर्शाने पुनीत झालेल्या मंगल वातावरणात अधिकच हृदयस्पर्शी वाटत होते. गीत संपले. दुसऱ्या एका भक्ताने तितकेच भावपूर्ण गीत गाईले. आम्ही बैठकी जवळच बसून या गीत–गायनात तल्लीन झालो होतो.

अचानक माझे पतीराज मला म्हणाले "सरला, तू एक गाणं म्हण." मी मानेनेच नकार दिला. तसे लागलीच पेटी वाजविणारे गृहस्थ मला आग्रह करू लागले. मी नाही म्हटल्यावर त्यांचाहि नाईलाज झाला. दुसऱ्या भक्ताने गीत गायीले आणि हा प्रसंग इथेच संपला.

तशी मनातून मी थोडी खट्टू झाले. माझा आवाज तसा बरा आहे व दोन–तीन भक्तीगीते माझी पाठ पण असून, चांगल्या स्वरात मी म्हणू पण शकते. हे माहित असल्यामुळेच पतीराजांनी मला गाण्याचा आग्रह केला होता. गाण्याची माझ्या मनात पण जबरदस्त इच्छा होती. परंतू लाजाळू स्वभाव व आजू बाजूला लोकांची गर्दी असल्यामुळे मनावर थोडे दडपण आले व इच्छा असूनही मी श्रीबाबांपुढे गाऊ शकले नाही. याची माझ्या मनाला राहून राहून चुटपूट लागून राहिली.

या घटनेला जेमतेम एक महिन्याचा अवधी लोटला असेल नसेल, आमच्या घराजवळ एक श्रीसद्‌गुरु साईबाबांचे मंदिर आहे. एके दिवशी तेथे एक गाण्याचा कार्यक्रम ठरला होता. मुंबईहून एक गायिका या कार्यक्रमासाठी खास येणार होत्या. कार्यक्रमाची सर्व पूर्वतयारी झाली होती. सभामंडप भक्तांनी फुलून गेला होता. तबलजी व पेटी वाजविणारे बैठकीवर विराजमान झाले होते. अचानक एका व्यक्तीने येऊन निरोप सांगितला की, मुंबईहून येणाऱ्या गायिका काही अपरिहार्य कारणास्तव येऊ शकत नाहीत. झाले, रंगाचा बेरंग होतो की काय असे वाटले. लोकांची निराशा होणार या विचाराने कार्यकर्त्यांचे मन थोडे खट्टू झाले. परंतू श्रीबाबांच्या मनात काही वेगळेच होते. याचा उलगडा नंतर झाला. पतीराजांनी मला फक्त डोळ्यांनी खुणावले व एक अवाक्षरही न बोलता मी गाण्यासाठी तयार झाले. तब्बल दीड तासाच्या अवधित मी दहा–बारा

भक्तिगीते गायिली. सर्व लोकांनी माझे कौतुक केले. तेव्हा माझे डोळे आसवांनी डबडबले. शिर्डीत श्रीबाबांपुढे गाणं म्हणण्याची राहिलेली इच्छा बाबांनी अशा रितीने पूर्ण केली ते श्री बाबांबद्दल असलेल्या प्रेमाचे व कृतज्ञतेचेच अश्रू नव्हेत काय ?

♦ ♦ ♦

# नित्य घ्या प्रचीत अनुभवे

## श्री. नरहरी कदम

– १९६४–६५ साली मी आजारी पडलो. दोन तीन डॉक्टर्स झाले पण गुण येईना. मला क्षयाचा आजार होता. दुःखणं असह्य होऊ लागलं अन् जगणं नकोसे झालं. मी एकदा रात्री असह्य वेदनेने जागा झालो व अगदी करुण स्वराने बाबांना विनंती केली की, बाबा माझ्याने हे दुःख सहन होत नाही, तरी मला मरण द्या.

दुसरे दिवशी सकाळी माझी पत्नी मला सकाळी उठल्यावर म्हणाली की, "काल रात्री माझ्या स्वप्नात बाबा आले होते व म्हणाले मी तुझ्या पतीची व्यथा दूर करतो. त्यांनी एक कांवळ्याचा दोर घेतला. व तुमच्या पायाच्या आंगठ्याला बांधला आणि म्हणाले, तुझ्या नवऱ्याला सांग मी असताना मरणाची इच्छा का करतोस ? जा बरा होशील. दुसऱ्या दिवशी एका मुलाने दुसऱ्या एका डॉक्टरकडे जाण्यास सांगितले त्याप्रमाणे मी डॉक्टरकडे गेलो. डॉक्टरने सांगितले की लास्ट स्टेज आहे. तरीही औषध उपचार चालू झाले. अन् आश्चर्याची गोष्ट म्हणजे, आठ दिवसात मला अन् डॉक्टरला पुष्कळशी आशा वाटू लागली. सहा महिन्यात मी पूर्ण बरा झालो. आता माझे वय ६३ वर्षाचे आहे.

आता यात पुष्कळजण म्हणतील, त्यात काय एवढं, क्षयाचे आजारी पुष्कळ बरे होतात हल्ली. मीही म्हणेन होतात की, पण माझा अन बाबांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. अन् जिथे जिव्हाळ्याचा संबंध असतो तिथं तर्कास वाव नसतो. वेदनेशिवाय देव आहे की नाही हे आठवत नाही. अशा नास्तिकांना बाबूराव पटेल यांच्या भाषेत सांगावं लागेल. "तुम्हाला मुळव्याधी होऊ द्या."

♦ ♦ ♦

# बाबा आणि अब्दुल्ला यांचे साक्षात् दर्शन

## पडलेली तिकीटे हाती दिली

**सदानंद चेंदवणकर, कार्यकारी संपादक श्रीसाईलीला**

– गुरुपौर्णिमा हा श्रीसद्गुरु श्रीसाईबाबांचा शिर्डी क्षेत्री साजरा होणारा एक मोठा उत्सव होय. या उत्सवास हजर रहाण्यासाठी म्हणून मी, पत्नी व मुलगा यांचेसह १९७४ च्या गुरुपौर्णिमेच्या अगोदर दोन दिवस शिर्डीस जाण्यासाठी म्हणून निघालो. नेहमी आम्ही रात्रीच्या एस. टी. नेच प्रवास करतो पण या खेपेस आगगाडीने जाण्याचे ठरविले. दादरहून रात्री ९–५५ ला सुटणारी अमृतसर एक्सप्रेस आम्हांला पकडावयाची होती. पण कसे काय कुणास ठाऊक आम्हांला निघायलाच मूळात वेळ झाला व चेंबूरहून दादरला लोकलमधून आम्ही ९–५० ला उतरलो.

अमृतसर सुटायला पाच मिनिटे होती तिकीटे काढावयाची होती. सामान फारसे नव्हते, म्हणून मी धावत धावत पुढे जाऊन कोपरगावची तीन तिकिटे काढली व ती बुशशर्टच्या वरच्या खिशात टाकली व चिल्लर पैसे पँटच्या खिशात टाकले, व पुढील डब्यात जाण्यासाठी म्हणून वेगाने जाऊ लागलो. मी काही अंतर गेलो असेन नसेन.

पण इतक्यात माझ्या मागून दोन सज्जन आले व त्यांनी आपण कोपरगावला जात आहात काय म्हणून मजकडे पृच्छा केली. मी 'होय' असे मानेनेच त्यांच्याकडे न पहाताच उत्तर दिले. पत्नी व मुलगा धावत पळत गाडीच्या पुढील डब्याकडे जाऊन पोचली होती व काही क्षणात मी पण तिथवर पोचलो. पण पुन्हा तिच दोन माणसं माझ्या पाठोपाठ आली व त्यांनी पुन्हा प्रश्न केला "आपण तिघंजण कोपरगावला जाणार आहात काय!" मी पुन्हा 'होय' म्हणून उत्तर दिले आणि आता डब्यात चढणार तोच त्या दोघांनी मला जवळ येऊन विचारले, "साहेब तुमची तिकीटे दाखवा?" त्या दोघांपैकी एका इसमाचे हाती बिजेरी होती तेव्हा ती माणसे रेल्वेचे कर्मचारी असावेत, म्हणून तिकीटे त्यांना दाखविण्यासाठी मी बोटे बुशशर्टच्या खिशात घातली पण हाय! बोटे थेट खिशाखालून बाहेर आली!

बुशशर्टचा खिसा उसवला होता हे माझ्या ध्यानी मनीही नव्हते. व त्यातून ती तिन्ही तिकिटे केव्हाच खाली पडून गेली होती. हा प्रकार ध्यानी यायला

मला वेळ लागला नाहीं. काय करावे हे मला सुचेना. डोळ्यापुढे अंधार दिसू लागला. तिकीटे गेली. पुन्हा तिकीटे काढावी लागणार. पुन्हा खर्च. गाडी सोडावी लागणार, रात्र प्लॅटफॉर्मवर काढावी लागणार असे एकामागून एक विचार सर्रकन सरकले.

इतक्यात गार्डाने शिट्टी दिली इंजिननेही भोंगा वाजवला. गार्डाने हिरवा दिवा दाखवला. गाडी सुटणार तोच त्या विचारपूस केलेल्या दोघांनी मला म्हटले 'साहेब, ही घ्या तुमची तीन कोपरगावची तिकीटे. तुम्ही जिथं तिकिटं काढलीत ना! तिथच ती तुमच्या खिशातून खाली पडली.'

त्यांनी तिकीटं माझ्या हाती दिली नि तोच गाडी हालली. पाचच मिनिटात हा केवढा प्रकार घडला होता. गाडीने फलाट सोडला मी भानावर आलो. त्यांचे आभार सुद्धा मी मानू शकलो नाहीं. तेव्हा निदान हात दाखवून त्यांना 'विश' करण्यासाठी मी चालत्या गाडीच्या डब्यातून मागे मागे जाणाऱ्या फलाटावर भिरभिर नजर फिरवीत होतो.

पण . . . . पण काय! मला त्या दोन्ही व्यक्ती पुन्हा दिसल्या नाहीत. बाबा आणि त्यांचे मित्र, अब्दुला यांनी साक्षात् मला दर्शन देऊन विस्मरणाने गळून पडलेली तिकीटे माझ्यासाठी मला परत दिली होती असेच मी समजतो. श्रीसाईबाबा संकटकाळी भक्तांच्या मदतीसाठी क्षणात धावून जातात, ह्याची प्रचिती वेळोवेळी येते. ती अशी.

# बाबांची उदी लावली व बढती मिळाली

**श्री. म. शं. दरेकर, सौ. मन्दा म. दरेकर,** १०७ । ३७६१
टिळक नगर, चेंबूर

सागर-किनाऱ्यावर असलेल्या एका शाळेने 'सागर संपत्ती' प्रकल्पाचे एक प्रदर्शन भरविले होते. आणि त्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यासाठी कुणातरी मान्यवर व्यक्तीला निमंत्रण करण्याचे काम मजकडे आले होते.

सागर संपत्तीवरही अधिकारवाणीने बोलू शकणारी अशी जी काहीं थोर मंडळी माझ्या मनःचक्षूंसमोर उभी राहिली त्यांच्या नामावळीत मला आठवले ते सुप्रसिद्ध पत्रकार 'श्रीसाईलीला'चे संपादक श्री. सदानंद चेंदवणकर!'

आणि मी एका सुप्रभाती त्यांचे घरी गेलो. माझ्या आंतरीक आमंत्रणाचा स्वीकार ते करतील की नाही? त्यांना त्या ठराविक दिवशी वेळ मिळेल की

नाहीं ? अशा नाना शंका त्यांच्या दारावरली बेल दाबताना माझ्या मनात येत होत्या.

दार उघडताच प्रथमत: माझी नजर गेली ती समोरच्या भिंतीवरील साई-बाबांचा आशिर्वाद देत असणाऱ्या प्रतिमेवर! उजव्या हातानं आशिर्वाद देत ते म्हणत होते, 'बेटा तुझे काम होईल, असेच जणू काय ते मला म्हणत असल्याचा भास मला झाला.

—आणि झालेही तसेच. वेळात वेळ काढून त्यांनी येण्याचं मान्य केलं. त्यांच्या होकारानं मला अत्यानंद झाला. तेथील श्रीसाईबाबांच्या प्रतिमेला पुन्हा प्रणाम करून मी परतू लागलो पण ....

माझी श्रीसाईबाबांवरील श्रद्धा पाहून की काय कोण जाणे त्यांनी मला उदीचा प्रसाद परतताना दिला. मी घरी आल्यानंतर बाबांचे नामस्मरण करून ती उदी आम्ही कुटुंबियांनी भाळी लावली. सकाळी शाळेत जाताना माझ्या पत्नीने ती पुन्हा भाळी लावली. थोडी प्राशन केली. शाळेत पोचून दोनचार तासांचा अवधि गेला असेल नसेल तोच तिला बढती मिळाल्याचा हुकूम आल्याचे कळले.

जसा माझ्या पत्नीला अनुभव आला तसाच मलाहि एक स्वानुभव आला तो असा,

'माझ्या एका अगदी जवळच्या नातेवाईकांकडून काही रक्कम मला येणे होती. दोन तीन वर्षे उलटून गेली असल्याने त्या रकमेची मी आशाच सोडली होती आणि एक दिवस ....

'आपल्या हिश्याची ही रक्कम पाठवित आहे. तिचा स्वीकार व्हावा. विलंब झाल्याबद्दल दिलगीर आहे.' अशा अर्थाच्या पत्रासह ते सारे येणे एकाच रकमेत त्यांनी मला पोच केले.'

दादांनी (सदानंद चेंदवणकरांनी) दिलेली श्रीसाईबाबांची मुद्रा माझ्या पैशां-च्या पाकिटात ठेवल्यानंतर अवघ्या आठवड्यातच वरील प्रकाराची प्रचिती मला आली.

खरोखर बाबांची लीला अगाध आहे हेच खरे!

# उदीने चमत्कार केला

**उषा रघुवीर पार्सेकर,** एम् जी. बर्वेनगर G १२५ घाटकोपर मुं. नं. ८६

– परीक्षा दोन दिवसावर आली होती. पाच तारखेला प्रॅक्टीकलची परीक्षा आणि २ तारखेपासून अंथरुणावरच होते मी! मला उठतासुद्धा येत नव्हते. आईने अखेरचा उपाय म्हणून डॉक्टरकडे नेले व दोन दिवसात बरे वाटेल असे औषध टॉनिक द्या मुलीची पाच तारखेला परीक्षा आहे असे सांगितले, 'पण डॉक्टर उलट म्हणाले' हे बघा मुलगी वाचली ते नशीब समजा. अभ्यासाच्या किंवा मानसिक विचाराने तिच डोकं भ्रमिष्ट झालं आहे. एक महीना पर्यंत तरी बरी होणार नाहीं. तिला अभ्यास करू देऊ नका. परीक्षा काय केव्हाही देता येईल' हे ऐकून मी तर हतबल झाले. माझं एक वर्ष फुकट जाणार तर! आता काय? पण आई वडील निस्सिम साईभक्त दोघांनीही मला दिलासा दिला. आई म्हणाली "अग बाबा बसलेत कसली काळजी करतेस!" मी माझे आईवरच चिडले. वाटले एक तर आठ दिवस आजारी असल्यामुळे अभ्यास काही झाला नाहीं आणि डॉक्टरने एक महीना बरी होणार नाहीं असे सांगितले आहे त्याला बाबा काय करणार! एकतर तापाने उठता येत नव्हते व डोक्यात हाच विचार 'आता परीक्षेचे काय?' एक वर्ष नक्की फुकट जाणार पण आईच्या सांगण्यावरुन सारखा साईनामाचा जप सुरू केला. व त्याबरोबर उदी घेण्याचा सपाटा लावला. सारखी पाण्याबरोबर मी उदी किती घेतली असेन याची बाबांना व मलाच कल्पना आहे. आणि काय आश्चर्य, मलासुद्धा वाटले नव्हते पण एका दिवसात मला आराम वाटला. मनात म्हटलं बाबा तुझी लीला अगाध आहे.

पण एका दिवसात अभ्यास काय होणार तरीसुद्धा केला पण एक्सपेरीमेंट कठीण आला तर? त्यावेळी सुद्धा बाबांचे नामस्मरण केले व परीक्षेला गेले. बोटात बाबांची अंगठी घातली. शॉर्ट एक्सपेरीमेंट बरे होते. लॉन्ग एक्सपेरीमेंट इतका सोपा होता की, बाबांनीच मला इतका सोपा एक्सपेरीमेंट निवडून दिला होता असेच मला वाटते. अपेक्षेपेक्षा सोपा एक्सपेरीमेंट पाहून मनोमन बाबांना हात जोडले. खरोखर बाबांची लीला अगाध आहे. ते रक्षक असताना कशाची भीती!

# साईबाबांचे भक्त वात्सल्य

श्री. चिंतामण घनःशाम चेंदवणकर, देशपांडे ब्लॉक्स. रेल्वे लाईन्स. सोलापूर.

– पन्नास वर्षांपूर्वी घडलेली ही गोष्ट. त्याकाळी प्रसिद्धही झाली होती, तरी ती आजही ताजीच वाटते. भगवत्‌महात्म्य कधींच कालबाह्य होत नसतं. पुराणातल्या कथा पुनःपुन्हा सांगितल्या तरी त्यांची गोडी कमी होत नाहीं, उलट त्यांना अधिकच उजाळा मिळतो. साखर केव्हांहि चाखली तरी ती गोडच लागते, मग परमेश्वरांच्या "अमृताहुनि गोड" अशा महिम्याच्या कथाची गोडी का बरे कमी होईल ?

कोकणातील एक गृहस्थ आपल्या पत्नी व मुलाबाळांसह श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला आले होते. बाबांचे दर्शन घेऊन व यथासांग पूजन व सेवा करून ते परत जाण्यासाठी बाबांची परवानगी मागण्यास गेले. बाबांनी परवानगी देऊन म्हटले "जा. पण एक काम कर, मुंबईला जाताना तुला वाटेत कल्याण ते मुंबई जो माणूस भेटेल आणि गाडीत बसण्यासाठी तुझ्याकडे टिचभर जागा मागेल त्याला हे दे' असें म्हणून बाबानी थोडी उदी एका लहानशा पुडीत बांधून दिली. त्या गृहस्थाला हे एक नवलच वाटले. त्याने बाबांना विचारले "कोणी जर असा भेटला नाही तर तुम्हाला तसे पत्राने कळवू का ?" बाबांनी होय म्हटले.

तो गृहस्थ कोपरगावला जाऊन तेथून पुढे त्याचा प्रवास मेल गाडीने मुंबईकडे सुरू झाला. कल्याण स्टेशन आले व गेले तरी बाबांनी सांगितल्याप्रमाणे कोणी आला नाही. गृहस्थ स्वतःशीच म्हणाला, आंता पुढील स्टेशन मुंबईच. कोणी आला नाही आणि जागा मागितली नाहीं आता बाबांना तसे पत्र पाठवावे म्हणून तो तयारी करू लागला. इतक्यात गाडीने ठाणे स्टेशन गाठले. ती गाडी ठाण्याला उभी रहात असे हे त्या गृहस्थाला माहित नव्हते. ठाणे स्टेशनवर एक माणूस मुंबईला कामावर जाण्यास उशीरा झाला म्हणून कासावीस व घामाघूम झालेला धावत धावत या गृहस्थाच्या डब्याजवळ येऊन त्याने कसाबसा डब्यात प्रवेश मिळवला. डब्यात गर्दी बरीच होती आणि जागा मुळीच नव्हती. कोकणी गृहस्थाचं एक लहान मूल झोपलं होतं तिथे फक्त थोडी जागा होती. त्या ठाणेकर गृहस्थाने पुढे येऊन कोकणी गृहस्थास म्हटलं "बसायला टीचभर जागा देता का?" कोकणी गृहस्थ एकदम चमकला. त्याने जागा दिली आणि बाबांनी दिलेली पुडी त्याचे हवाली केली. त्या गृह-

त्याने मोठ्या भक्तिभावाने ती पुडी घेतली आणि सद्‌गदित अन्तःकरणाने "परमेश्वरा तू मला आज परवसल्याच दर्शन दिलंस" असे उद्‌गार काढले.
भक्तीचा हा महिमा अवर्णनीय नाही का?

॥॥॥

# श्रीसाईबाबांचा अनुभव

--सुभाष माळी, किर्लोस्करवाडी

तया आठवीता महापुण्यराशि
नमस्कार माझा तया श्रीसाईनाथासी ॥

माझा व्यवसाय वृत्तपत्रांचा असल्यामुळे मला अनेक तऱ्हेची नमुनेदार माणसे भेटतात. वेगवेगळ्या मताची, लहान मोठी, अनेक तऱ्हेच्या माणसांशी आमचा संबंध येतो. श्री साईभक्त गणपतराव गांगुर्डे रा. अहमदनगर यांचा संबंध माझा एक तऱ्हेचा योगायोगच आहे. मी टॉयफाइडने आजारी होतो. त्यांची माझी गाठ दवाखान्यात पडली. त्यांनी मला साईनाथांची भक्ति करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्या दिवसापासून साईभक्त झालो. साईभक्तित मी रमू लागलो. रोज साईलीला वाचणे, साईनाथ प्रसन्न असे लिहून काढणे दररोजची आरती म्हणजे माझी साईबाबांविषयी ओढ वाढू लागली. श्री गांगुर्डेनी मला सांगितले की, तू साईबाबांस विसरू नको. श्री शिर्डी साईबाबांस अवश्य जाऊन ये. एवढा उपदेश मला त्यांनी दिला. मी दररोज साईभक्ती करू लागलो. व मनात म्हणू लागलो. साईबाबाच मारणार व तारणार साईलीला अगाध आहे. मला आता एकदम बरे वाटू लागले. मी खडखडीत बरा झालो. व डीसचार्ज घेऊन घरी आलो. त्या दिवसापासून आजतागायत श्री साईकृपे-मुळे मी तब्येतीने सुखरूप आहे. पण गांगुर्डे यांनी सांगितलेली आठवण की, श्री शिर्डीबाबांस जाऊन ये म्हणून ही मला आठवण सारखी जाणवत होती. धंदाव्यवसायातून सवड काढून श्री शिर्डीस जावयाचे जमेना. एक वर्ष गेले दोन गेली माझी साईविषयी ओढ जास्तच वाढू लागली. तूच तुझे दर्शन घडवशील असे मी मनात ठरवून ठेवले. अखेर २० मार्च १९७४ रोजी तो दिवस उगवला. मी व माझी मित्रमंडळी मोटरकारने श्री शिर्डी साईबाबांच्या पंढरीत पोहोचलो. येथील सर्व दृश्ये पाहून मनाला फार बरे वाटले, लहान मोठी थोर मंडळी प्रत्येक जातीचे व धर्माचे लोक नित्य तन्मयतेने साईभक्ती करीत असतात. काय या साईलीला आहेत हे कळतच नाही. मंदिरात चाललेले

भजन, पूजन, पूजाअर्चा हे पाहिलेले डोळ्यासमोरचे कधीही जात नाही. आमचा मुक्काम एकच दिवस होता. ते साईबाबा वैभव पाहून मनाला समाधान झाले. साईबाबांनी मला तारले माझ्यात नव चैतन्य निर्माण केले. नवस्फूर्ती दिली अशा साईनाथा जवळ माझे एकच मागणे आहे. मला मुली व तव्येतीने सुखरूप ठेवावे. मी जन्मभर तुझ्याभक्ती मध्ये रमून जाईन. तुझी साईलीला अखंड जपून ठेवीन. हेच मागणे श्री साईचरणी.

म्हणून म्हणतो –

तया आठवीता महापुण्यराशी ।
नमस्कार माझा तया श्रीसाई नाथाशी ॥

# मला स्वप्नात दिसलेले श्रीसाई

**श्री. रामजी गुणाजी पारस्कर** मु. पवना, पो. दुधड जि. नांदेड,

– मी सन १९६४ पासून साईबाबांचा भक्त आहे. दर वर्षी रामनवमीस न चुकता शिरडीस माझी वारी असतेच. गेल्या वर्षी म्हणजे दि. १–४–७४ ला रामनवमीस बाबांच्या दर्शनासाठी शिरडीस गेलो असताना मी बाबांजवळ प्रार्थना करून माझे घर लवकर बांधले जावे अशी मनात इच्छा व्यक्त केली. श्रीसाईचे कृपेने जानेवारी ७५ मध्ये घर बांधण्यास सुरुवात झाली व सर्व घर रामनवमीचे अगोदर म्हणजे २० एप्रिलचे अगोदरच पूर्ण झाले व मी निश्चित-पणे साईबाबांचे दर्शनास शिरडीस रामनवमीला गेलो. विशेष म्हणजे माझेकडे घरबांधण्यासाठी लागणारे तेवढे पैसे सुद्धा नव्हते. परंतू श्री साईकृपेने सर्वच व्यवस्थित झाले.

या वर्षी घर बांधणे पूर्ण झाल्यावर एप्रिल ७५ मध्ये वर म्हटल्याप्रमाणे मी शिरडीस गेलो असताना एक साईबाबाची मूर्ती माझ्या नवीन घरात स्थापन करण्यासाठी विकत घेतली. गावाकडे निघण्यापूर्वी मी साईबाबांची ती मूर्ती घेऊन बाबांस नमस्कार करावयासाठी समाधी मंदिरात गेलो व बाबांस नमस्कार केला, व बाबांच्या मंदिरातील मूर्तीकडे पहातो तर काय चमत्कार! बाबा मला हातानी जाण्याची खूण करीत होते हे प्रत्यक्ष मी माझ्या डोळ्यांनी पाहिले. जणू त्यांचे म्हणणे होते कि तू इथून मूर्ती घेऊन जा. तुला माझा पूर्ण आशीर्वाद आहे व तू नेत असलेल्या मूर्तीत मी पूर्ण समाविष्ट आहे.

वर उल्लेखलेली ती साईची मूर्ती घेऊन मी गावी आलो. मूर्तीची स्थापना माझ्या घरात करण्यासाठी मी १४–५–७५ (अक्षय तृतीया) हा दिवस देखील

निश्चित केला होता. आदले दिवशी म्हणजे दि. १३–५–७५ ला मी माझ्या घरात झोपलो असताना, श्री साईबाबा माझ्या स्वप्नात आले व त्यांनी दत्तात्रयाचा अवतार धारण केला होता. श्री साई स्वप्नात मला म्हणाले, तुझ्या घरात उद्या म्हणजे दि. १४–५–७५ ला दत्ताचा जन्म होणार आहे. तेव्हां तू मूर्तीची स्थापना कर. स्वप्नातून जागे झाल्यावर सर्व प्रकार माझ्या लक्षात आला व साई हे दत्तचे अवतार आहेत हे पटले. तदनंतर दि. १४–५–७५ ला मी श्रीसाईच्या संगमरवरी मूर्तीची स्थापना माझ्या घरात मोठ्या भक्ती भावाने केली आहे.

# सर्प आणि श्रीसाईबाबा

**श्री. भाऊराव वामन कुलकर्णी,** विष्णूनिवास, से. बापट मार्ग, दादर २८

० सन १९१९ साली मी शिरडीची प्रथम वारी केली. रेल्वेत (जी. आय. पी.) नोकरीला असल्यामुळे शिरडीला वारंवार वाऱ्या करण्याचा सुयोग मला लाभत असे व तेथे रहाण्यासाठी समाधी समोरील खोली (सध्याची चौकशी रुम) मला मिळत असे.

२५ जानेवारी १९५४ रोजी मी सेवानिवृत्त झालो. त्याच दिवशी रात्री श्रींचे दर्शनासाठी कुटुंबासमवेत मी शिरडीस प्रयाण केले व सुदैवाने नेमकी तीच खोली आम्हास रहाण्यास मिळाली. २६ जानेवारी १९५४ रोजी सकाळी तेथे पोहोचल्यानंतर दिवसा समाधि, द्वारकामाई वगैरे ठिकाणी जाऊन श्रींचे दर्शन घेतले. दुसऱ्या दिवशी पहाटे काकड आरती. घंटा सुरू होताच जाग आली. तसाच उठलो व समाधीकडे धाव घेतली. जमलेले भक्तगण श्रींचा जयजयकार उच्च स्वराने करीत होते. त्यावेळी पुतळा नव्हता. तसबीरच होती. त्यावेळचे ते दृश्य अवर्णनीय होते. भक्तिप्रेमाच्या त्या वातावरणात भक्तगण आनंदाने डुलत होते. मी समोर उभा होतो. बाजूला दंडधारी भालदार-चोपदार ललकारी मारण्यासाठी उभे होते. माझी हात जोडून व डोळे मिटून श्रींपुढे प्रार्थना चालू होती की, "हे देवाधिदेवा, साईसमर्था, मी सेवा-निवृत्त झालो असून, माझी लेखणी मी आपल्या चरणावर अर्पण केली आहे. यापुढे माझा संसार आपण चालवावा. मला आपला आधार पाहिजे". त्याच क्षणी माझे हाताला स्पर्श झाला. पहातो तो चांदीची नवी करकरीत व उंच काठी. (माझे उजवे बाजूचे दंडधारी गणू यांची. ती मी मागितली नव्हती.) ती मी

छातीशी बराच वेळपर्यंत घट्ट धरली होती. अशा रीतीने श्रीबाबांनी माझे मनोगत जाणून मला काठीचा आधार दिला. 'तुमचा मी भार वाहीन सर्वथा, नव्हे हे अन्यथा वचन माझे'. श्रीबाबांनी हे वचन तंतोतंत पाळून माझ्यावर दया केली. ही प्रेमळ माऊली आपल्या कळकळीच्या हांकेला कशी ओ देते याचे हे प्रत्यंतर आहे. आजतागायत या आधारावरच माझे सर्वकाही व्यवस्थित चालले आहे.

१९५४ सालचीच गोष्ट. माझा मोठा मुलगा नोकरीनिमित्त (रेल्वेतच) नागपूरला होता. तो रात्रपाळीला गेला होता. इकडे घरात एक सर्प शिरला. सुनबाईने तो पाहिला व धावपळ सुरू झाली. इतक्यात तो सर्प कसा, कुठे व केव्हा गेला हे समजले नाही. या गोष्टीची पूर्वसूचना मला स्वप्नात मिळाली होती. ती याप्रमाणे :—मी साईबाबांसमोर द्वारकामाईत बसलो आहे. इतक्यात एक सर्प सरकन् येऊन फणा काढून बसला. मी घाबरून बाबांना दाखविला. श्रींनी भिऊ नकोस. तो आता तसाच जाईल. त्याप्रमाणेच झाले व श्रींचे कृपेने संकट टळले.

असाच चमत्कार वरील मुलगा सोलापूरला असताना झाला. द्वारकामाईत मी बाबांजवळ बसलो आहे व जवळून दोन मोठे सर्प जाताना दिसले. श्रीबाबांकडे मी पाहिले व ते जातील अशी त्यांनी खूण केली. एक दोन दिवसात सोलापूरहून मला पत्र आले की त्यांच्या द्वितीय कन्येला (घशात दोन्ही बाजूला) घटसर्प झाला होता. त्यावरील इंजेक्शन्स सोलापूरला मिळाली नाहीत म्हणून पुण्याहून तातडीने आणली व मुलगी बरी झाली.

संकटाची सूचना देणे व ती निवारण करणे हीच बाबांची किमया.

श्रीबाबांचा महिमा सर्वांस कळावा म्हणून वीस वर्षांनंतर मी हे लिहित आहे.

# श्रीसाईबाबा पाहिले आपुल्या मी डोळा

**श्री. सदाशिव संभुजी सातपुते,**

११७०।ब रेव्हेन्यू कॉलनी, शिवाजीनगर, पुणे ५

० मी त्यावेळी संगमनेर येथे होतो. कॉलेजमध्ये असतानाच श्रीसद्गुरु साईनाथ महाराजांची महती ऐकत होतो. त्यांना प्रत्यक्ष पहाण्याचा योग मला १९१६ साली B. A. ची परीक्षा झाल्यावर आला. निकालाची वाट पाहाण्या-

ऐवजी आपण समक्ष शिर्डीला जावे असा विचार माझ्या मनात आला व त्याप्रमाणे दोन मित्र बरोबर घेऊन आम्ही सायकलची ट्रीप काढली. आमचा विचार होता की साकोरीचे उपासनी महाराज व शिर्डीचे साईबाबा यांचे दर्शन घेवून पुढे येवला मार्गाने वेरुळची लेणी, दौलताबादचा किल्ला पैठण, नेवासे, वगैरे क्षेत्रे पाहून नगर मार्गाने परत संगमनेराला येण्याचा होता. त्याप्रमाणे १९१६ च्या उन्हाळयाच्या सुटीत आम्ही निघालो. साकोरी येथे आम्ही संध्याकाळी पोहोचलो. रात्री पहिला मुक्काम करुन सकाळच्या प्रहरी उपासनी महाराजांच्या दर्शनाला गेलो. त्यांची एकंदर मुद्रा, कंबरेला गोणपाट गुंडाळलेले व सर्वांग उघडे असलेले असे ते, त्यांच्या देवळाच्या जवळच असलेल्या बागेत त्यांच्या काही भक्तगणांसह हिंडत होते. त्यात काही स्त्रियाही होत्या. त्या बागेचा रक्षक आम्हाला आत जावू देण्यास तयार नव्हता. आम्ही तसेच बागेत गेलो. आम्ही विद्यार्थी येत आहोत असे पाहून ते थांबले व दोन्ही पाय जोडून आम्हाला दर्शन दिले. विशेषत: पारशी लोकाचे तेथे जास्त जाणे येणे असे. त्यांच्या देवळात त्यांचे मोठे फोटो लावलेले असत.

त्यांचे दर्शन घेतल्यानंतर आम्ही शिर्डीला संध्याकाळी ५ च्या सुमारास गेलो. अंधार पडत चालला होता. सर्व माळरानावर शुकशुकाट होता. शिर्डीला आम्ही गेल्यावर एके ठिकाणी सायकली ठेवण्याची व्यवस्था केली व साईमहाराज ज्या झोपडीत बसले होते तेथे गेलो. तेथे ते एकटेच गुडघे वर करुन एखाद्या संताप्रमाणे शांतपणे बसले होते. आम्ही गेल्यावर त्यांनी आम्हाला दर्शन दिले. आमच्याशी काही बोलले नाहीत. त्यांची एकंदर मुद्रा एखाद्या मोठ्या तपस्व्यासारखी दिसत होती. तिथे गेल्यावर आम्हाला असे कळले की प्रथम ते शिर्डीला आले ते कुठून आले, त्यांचे नाव काय वगैरे काहीच माहिती कोणालाच नव्हती. शिर्डीच्या गावाजवळच खंडोबाचे एक देऊळ आहे. त्या देवळाजवळ ते रहात असत. लोक सांगत असत की, ते रात्री गावात व्यापारी लोकांकडे तेलाची भिक्षा मागत असत, व रात्री खंडोबाच्या देवळाभोवती पणत्या लावत असत. हे पाहून लोकांना हा मोठा कोणी साधू आहे असे वाटू लागले. असा क्रम कित्येक दिवस चालू होता. पुढे ते व्यापारी त्यांना तेल देईनासे झाले. तेव्हा ते त्यांच्याकडे न जाता रात्री पणत्यात पाणी घालून दिवे लावीत असत. ते पाहून लोकांना, हा कोणी मोठा साधू आहे असे वाटू लागले व हळूहळू त्यांची कीर्ती नागपूरचे बुटी सावकार यांच्या कानावर गेली. तेव्हा त्यांनी त्यांच्यासाठी एक लहानसे देऊळही बांधले. पण ते देवळात कधी जात नसत. एका लिंबाच्या झाडाखाली झोपडीत बसत असत. आसपासच्या लोकांना त्यांची कीर्ति कळली, व लोक त्यांच्या दर्शनाला येवू लागले. नाग-

पूरच्या सावकाराने त्यांच्यासाठी चांदीची उपकरणे तयार केली. चौरंग घागर व परात वगैरे चांदीची उपकरणे देवळात ठेवली. संध्याकाळ झाली म्हणजे त्यांचे जे भक्त होते. ते त्यांना त्यांच्या झोपडीतून टाळांच्या गजरात त्या देवळात घेऊन जात. व चांदीच्या चौरंगावर त्यांना बसवून, चांदीच्या परातीत त्यांचे पाय धुवून त्यांची पाद्यपूजा करण्यात येई. नंतर त्यांच्या कपाळी केशरी गंध व गळ्यात फुलांचा हार घालून लोक आरती म्हणत असत. आरती झाल्यानंतर परत त्यांना लिंबाच्या झाडाखालच्या झोपडीत टाळांच्या गजरात आणून बसवीत. ते सहसा फारसे बोलत नसत. एखाद्या तपस्व्याप्रमाणे त्यांची मुद्रा शांत असे. अंगात १ लांब सदरा, डोक्याला त्रिकोणी हिरवे फडके ते बांधीत असत. असा क्रम काही दिवस चालल्यावर शिर्डीत अशाच एका मशिदीत ते जावून राहिले. त्या मशिदीला ते 'माई' असे म्हणू लागले. तेथेही ते चूल मांडून स्वतः हाताने स्वयंपाक करीत असत. व जवळच १ जाते होते त्या जात्यात दळून त्या पिठाच्या भाकरी करुन खात असत. अशा रितीने त्यांची कीर्ति वाढत चालली. पुढे त्या नागपूरच्या बुटी व इतर भक्तगणाने हल्ली तेथे जे प्रशस्त मोठे देऊळ आहे ते बांधले. त्यांचे देहावसान कुठे झाले हे काही निश्चित मला सांगता येत नाही. पण देहावसान झाल्यानंतर त्या देवळात त्यांची समाधि बांधली गेली. मनात इच्छा धरून जे लोक त्यांच्या दर्शनाला जात असत त्याची परिपूर्तता होत असे. त्यामुळे त्यांच्यासंबंधाची माहिती आसपासच्या खेड्यात व चहूकडे पसरली. इथे एक मोठे सत्पुरुष होऊन गेले असे लोक म्हणत असत. ते जातपात बघत नसत. आपल्या हिंदू देवतेप्रमाणे त्यांची पूजाअर्चा सुरू झाली व ते करणाऱ्या मंडळाने लोकांच्या दर्शनाची चांगली व्यवस्था केली. पुढे पुढे मी नोकरीला लागल्यावर १-२ दा तरी दरसाल जात येत असे, आता त्या मंडळाने पुजाअर्जा करण्यासाठी शुचिर्भूत असे काही ब्राम्हण निवडले, व त्यांना दरमहा पगार देवून तिन्हीसांज त्यांची पूजा अर्चा होऊ लागली. साईबाबांना अर्पण करण्याचे साहित्य एका सीलबंद पेटीत टाकण्यासाठी म्हणून ठिकठिकाणी पाट्या लावण्यात आल्या होत्या. तेथे कोणाला अभिषेक करायचा असला तर आठ आणे देवून पास काढावा लागत असे. यासाठी ऑफिस उघडले गेले. अभिषेक करणाऱ्या माणसाने स्वतःचे साहित्य आणून क्रमाक्रमाने अभिषेक केले जात असत. विशेषतः गुरुवारी फार गर्दी असे.

अलिकडे या समाधीशेजारी साईबाबांचा भव्य पुतळा बसविला आहे. त्यामुळे तर या देवालयास आगळेच सौंदर्य प्राप्त झाले आहे.

अलिकडे माझ्या प्रकृतिमानाने मी जावू शकत नाही. मी जात असे तेव्हा माझ्या मनातील इच्छा पूर्ण होत असत. अशा रितीने माझ्या विद्यार्थीदशेत मी जे पाहिले ते व मला समक्ष जी माहिती मिळाली ती मी लिहिली आहे. हे सर्व सत्य आहे. यात काही अतिशयोक्ती वगैरे काही नाही.

# लड्डू उदी और खाजखुजली

**प्रा. श्री. ए. एम्. अमिनगड, गुळूंचे, ता. पुरंदर**

– मेरी और मेरी बहन की शादी थी । शादी के लिये लोग बहुत आये थे । हम लोगों का जो अंदाज था, उससे भी कई लोग जादा आएं । अन्न-पदार्थ का अंदाज भी गलत था । हमारे घरवालोने अपने अंदाज से अन्न-पदार्थ बनवाये थे, उस में लड्डू भी बनवाये गये थे । लोग जादा आने से घर के लोग घबरा गये । आये हुये लोगों को खाना कैसा खिलाना ? यही समस्या घरवालों के सामने पडी । लेकिन मेरे पिताजी घबरे नहीं । उनका बाबा पर पूर्ण विश्वास था, तथा उदी पर भी । उन्होंने कहा, "उन, सभी अन्न पदार्थमें बाबाकी उदी डालो । घरवालोंने ऊदी डाली । आश्चर्य की बात है, सभी लोगों का खाना होकर भी बहुत लड्डू और भी बचे । बचे हुये लड्डू मेरी बहन, हम, हमारी मौसी मामा, चाचा इन सभी लोगोंमें बाँटे गये।"

शादी, होने के बाद भी उन लड्डूओंसे हमने हमारे गांव में बडी पार्टी दी । तो भी शादी के लिए बनाये लड्डू खतम नही हुए । उन लड्डूओं को हमने गरीब लोगोंको बाँटे । यह सभी होकर भी हम बहुत दिनों तक लड्डू खाते रहे । यह हुई पहली घटना ।

दूसरी घटना यह है कि, एकबार मेरी बहन को खाजखुजली की, त्वचा की बीमारी हुई। वह सिर्फ अपने शरीर को खोंजती थी । बहुत दवाएं, मलम, इंजेक्शन्स हुए, लेकिन बीमारी अच्छी नही हुई । उस वक्त मेरे पिताजी कहने लगे, "दवाएँ बंद करो, बाबा की ऊदी लगाना शुरू करो।" हमने ऊदी लगाना शुरू की । आश्चर्य की बात है कि, बीमारी कब कम हुई या अच्छी हुई, यह हमे पता भी नही लगा । उस वक्त मेरी बहन की शादी भी तय कि गयी थी ।

# माझ्या जीवनातील श्रीसाईबाबांच्या पाऊलखुणा

चकोर आजगांवकर एम्. ए. बाय, ११ गव्हर्नमेन्ट क्वार्टर्स, बांद्रा,

— माझ्या जीवनातील बरीच वर्षे शिरडीच्या संताबद्दल मला पूर्ण अज्ञान होते. मला स्मरते ते असे की वयाच्या १२–१३ व्या वर्षी १९४२–४३ साली कुडाळ जवळील माडये महाराजांच्या स्थानी मी साईबाबांची मूर्ती प्रथम पाहिली, ती जरा भयचकित मनानेच! त्यानंतर माझे एक चित्रकार मित्र अप्पा मुणगेकर यांच्या घरी मी डोक्याला फडक्याची गांठ बांधलेली श्रीबाबांची छबी पाहिली. त्यांच्याबद्दल मला त्यावेळी प्रेमाऐवजी आदरयुक्त भीतीच वाटली. त्यांच्या चरित्रलीलांची फारशी चौकशी मी १९५३ पर्यंत केलीच नव्हती. १९५३ मध्ये एका तेल कंपनीत कंपाउंडरचा व्यवसाय करणारे माझे एक कारवारी मित्र बाबल किंदळकर, यांनी मला शिरडीहून आणलेले श्री. कवडे लिखित साईचरित्र वाचावयास दिले. त्यावेळी बाबांबद्दल मला थोडेसे औत्सुक्य वाटले. त्या लेखकाने श्रीबाबांच्या प्रेरणेने त्यांच्यावर पुस्तक लिहिल्याचा अद्भूत कथाभाग त्या पुस्तकात होता, तो मला वेधक वाटला. परंतु पुढे बाबा मजकडून तसेच करवून घेतील याची पुसटशी कल्पना नव्हती.

— १९५५ मध्ये श्रीबाबांनी मला आपल्याकडे एका चमत्कारिक अनुभवातून आकर्षून घेतले. मी त्यावर्षी राज्य सरकारने आयोजित केलेल्या नाट्यस्पर्धेसाठी "माणुसकीची जखम" हे दलितोद्धारावर नाटक लिहिले होते. त्या स्पर्धेत त्यावेळी दांडेकर, शिरवाडकर, नागेश जोशी, शुक्ल, सावळाराम कमला फडके यासारख्या नामवंत साहित्यिकांची नाटके रिंगणात उतरली असल्याने, त्या स्पर्धेत मला पहिले बक्षीस मिळण्याची मुतराम् शक्यता नव्हती. परंतू योगायोगाने माझे एक मित्र श्री. आचार्य हे त्याचवेळी शिरडीस निघाले होते. व त्यांनी सहजपणे मला विचारले होते की, तुमचा बाबांना काय निरोप आहे. मी त्यावर नाट्यस्पर्धेत पहिले बक्षीस मिळाले तर मी शिरडीस येईन असे निव्वळ विनोदाने म्हणालो होतो. परंतू ९ मे १९५५ च्या इंग्रजी मराठी दैनिकातून स्पर्धेतील यश व रु. १००० चे बक्षीस माझ्या हाती आल्याचे जगजाहीर झाले. पहिला धक्का मलाच बसला आणि शिरडीची पहिली यात्रा घडली. श्रीबाबांची कर्मभूमी भरलेल्या हृदयाने पाहिली. त्यांच्या चरित्र लीलांचा वेध घेतला. श्रद्धा व प्रेम याची निर्मिती या योगायोगातून घडली. श्रीबाबांनी एक उत्कट भावनेचा व काव्यात्मवृत्तीचा भक्त आपल्या कोट्यावधि भक्तांच्या यादीत

दाखल करून घेतला! ज्यांना उदंड भक्त, त्यांच्यामुळे माझी नामरता रुजू झाली.

— १९५५ नंतर पाच वर्षांनी माझ्या जागेचा प्रश्न अचानक सुटला व मी सरकारी वसाहतीत रहावयास आलो. त्यावेळी कृतज्ञता म्हणून मी सह्-कुटुंब सहपरिवार शिरडी येथे जाऊन श्रीबाबांच्या विभुतीमत्वाचा सौगंध मनमुराद लुटला. तरीहि श्रीबाबांच्या अंतरंगदर्शनाचा व कृपेचा अनुभव यावयास बरीच वाटचाल करावी लागली. संताना जाणणे व त्याच्या विभुतीमत्वाचे रहस्य समजणे हीसुद्धा फार मोठी तपश्चर्या असून, तेवढी सेवा साधना घडल्या-वाचून तो अज्ञानाचा पडदा वर जात नसतो. ती तपश्चर्या पुरी व्हावयास अनेक वर्षांची परिक्रमा घडावी लागते. मी १९४३ पासून थोडे फार योग, आध्यात्म तत्त्वज्ञान यांचे वाचन करीत असे. वयाच्या तेराव्या वर्षापासून एकीकडे काव्य, साहित्य तर दुसरीकडे योगसाधना व तत्त्वज्ञान ग्रंथांचे वाचन यांचे वेड लागले होते. परंतु योगात चुका झाल्याने थोडे अनुभव आले तरी एकंदरीत आरोग्य बिघडले होते. तत्त्वज्ञानातील शुष्क परिभाषा कळली, तरी ते बुद्धीत पुरते जिरले नव्हते. १३ व्या वर्षापासून २३ व्या वर्षापर्यंत शाळे-पासून कॉलेजपर्यंत मजल गाठली. साहित्य विषयाचा एम. ए. झालो. संतांचे ग्रंथ, संतकवींचे काव्य, गीता, उपनिषदे यांचा अभ्यास कॉलेजजीवनात (मराठी व संस्कृत भाषा) साहित्य विषय घेतल्यामुळे आपोआप होत गेला. परंतु अद्याप साधनेला खरी सुरुवात झाली नव्हती. शिरडीच्या प्रेमाचा मूलस्त्रोत अजून सखोल व विस्तृत झाला नव्हता. प्रपंच व परमार्थ यांचा तोल जमत नव्हता. धड प्रपंच नाही, परमार्थही नाही; साहित्य साधना नाही की व्यवसाय-कामही नाही असे मन विचलित आंदोलित स्थितीत होते.

— मधून मधून मी मिलिंद माधवांचे "श्रीसाई महात्म्य" हे ओवीबद्ध चरित्र वाचावयास सुरवात केली होती. प्रपंचात व्यवसायात छाया प्रकाशांचा खेळ चालला होता. पण अद्याप खरा सूर गवसला नव्हता. श्रीबाबांच्या दिव्य-त्वाची एक अस्पष्ट रेखा मनात तरळत राही. परंतु ती स्पष्ट व साकार झाली नव्हती. मध्यंतरी अर्थखात्यातील माझ्या नोकरीत मला फिरतीचे काम मिळाले व त्यामुळे मनमाडवरून जाण्याचा वारंवार योग आला. शिरडीची यात्रा मधून मधून घडू लागली, व बाबांशी थोडाबहुत संपर्क राहू लागला. या वाट चुकलेल्या परंतु उत्कटभाव श्रद्धावंत साधकाला शेवटी श्रीबाबांनी आपल्याकडे ओढून घेण्याचे ठरविले असावे. एके दिवशी १९६४ सालातील दुपारी माझ्या वडिलांना श्रीबाबांचे स्पष्ट दर्शन झाले. (माझे वडिल साईबाबांना त्यांच्या हयातीत म्हणजे १९१७ च्या सुमारास प्रत्यक्ष भेटले होते. त्यावेळी माझे वडील

सुमारे १७ वर्षांचे असावे.) माझे वडील श्रीबाबांना मानीत नसत. त्यांना दाणोली येथील संत साटम महाराज याबद्दल प्रेम व अनुभवही होता. त्यांच्या शिवाय इतर संतावर माझ्या वडिलांची श्रद्धा नसे. परंतु श्रीसाईबाबांनी प्रत्यक्ष दर्शन देऊन माझ्या वडिलाना दरडावून विचारले "अरे तू मला विसरलास काय ?" वडील घाबरले व म्हणाले, "संकटामुळे विस्मृती झाली असेल. तुम्ही आमची आठवण ठेवीत नसल्याने संकटे येतात. "श्रीबाबा म्हणाले, 'मी भक्तांना कधीच विसरत नाहीं." त्यांनी एक पुस्तक वडिलांकडे मागितले. पण ते कोणते ते वडिलांना समजले नाही. बहुधा मी बाबांवर काही लिहित असल्यास पहावे म्हणून त्यांनी सर्व कथा मला सांगून लेखनाविषयी मला विचारले. त्यावेळी मी श्रीबाबांच्या जीवन व वचनावर एका डायरीत काही टिपणे घेत असे. परंतु ते लेखन त्यावेळी घडले नाही. मात्र माझे एक मित्र श्री गणपतराव सामंत यानी सत्यसाईबाबांबद्दल अद्भुत वृत्तांत त्या सुमारास माझ्या कानी घातला होता व दुसरे मित्र श्री दिनेश देसाई यानी श्रीसत्यसाईबाबांचे चरित्र विषयक काही साहित्य मला वाचावयास दिले होते. त्यावेळी "कोकणदर्शन" या साप्ताहिकांचे संपादक श्री बसंतराव नाईक यांनी मला सत्यसाईबाबांवर छोटे पुस्तक लिहिण्याची (ते प्रकाशित करण्याच्या आश्वासनासह) प्रेरणा दिली. त्यावेळी "भगवंत दक्षिणेत अवतरले" हे माझे छोटेखानी परिचय पुस्तक १९६४ साली बाहेर पडले. या पुस्तकात शिरडी साईबाबांच्या जीवन व तत्त्वज्ञानाचा थोडा बहुत उल्लेख आला आहे. या दोन संतातील एकतेचा धागा साहित्यलेखनात माझ्या वारंवार ध्यानी आला.

— माझी धर्मपत्नी सौ. कौमुदी ही लग्नापूर्वी 'साईमहात्म्य' वाचीत असे व तिच्याहि मनात या सत्पुरुषाबद्दल श्रद्धा असे. पुढे लग्नानंतर ही श्रद्धा अधिकच दृढमूल झाली. माझ्या साधनेत मला १९६१ पासून बरेच दृष्टांत होत गेले. हनुमंताचा 'शबतीलाभाचा' दृष्टांत, नाथसत्पुरुषांनी कान टोचण्याचा दृष्टांत, एका व्यासगदृश पुराण पुरुषाने शरीरात प्रवेश करणे यासारखे अनेक स्वप्नदृष्टांत १९६१ ते १९६७ पर्यंतच्या काळात झाले. १९५७ साली शक्तिपातयोगी गुळवणी महाराजांनी कृपा केली व हठयोग साधनेमध्ये झालेला आरोग्य प्रक्षोभ शांत केला. त्यानंतर १९७० साली एक वैशिष्ट्यपूर्ण अनुभव आला. पहाटे ४ च्या सुमारास मला "अरे मी तयार आहे." हा साईबाबांचा आवाज स्पष्टपणे ऐकू आला. परंतु त्याचा संदर्भ काही केल्या कळेना. त्यावर्षी मी पुष्कळ सत्पुरुषांच्या भेटी घेतल्या व उलगडा करून घेण्याचा प्रयत्न केला. दत्ता बाळ, गगनगडकर महाराज, गुळवणी महाराज, सिद्धराज माणिकप्रभू इत्यादिंना भेटलो पण समाधान झाले नाही. त्याकाळात डॉ. गव्हाणकर यांची

गाठ पडली. त्यांच्याकडून गणेशभक्तीचा व साईप्रेमाचा वसा मिळाला. पुढे एका नाथपंथी सत्पुरुषाची गाठ पडून त्यांची प्रत्यक्ष कृपादृष्टि पडली व कुंडलियोगाहून भिन्न असा ज्ञानमय कृपा अनुभव हाती आला. प्रकाशनाद यांचे अनुभव येऊ लागले. हे सत्पुरुष तुकाराम महाराजांचे सहकारी नारायणदादा त्यांचे शिष्य ताजुद्दीनबाबा यांच्या परंपरेतील असून, त्यांचा बाबांशी बाल्यावस्थेत संबंध आला असल्याने त्यांच्या मुखानेच ऐकावयास मिळाले. त्यांनी श्री बाबांच्या कृपेचाच अनुभव आपल्या कृपेद्वारे दिला व प्रगतीचा एक टप्पा हाती आला. माझ्या पत्नीला एके दिवशी सकाळी श्रीबाबांनी दर्शन देऊन तिच्या जवळील नीरांजन हंसतमुखाने स्वीकारले.

— याच सुमारास **'नवशक्ती'**कारांकडून 'गीतरामायण'प्रमाणे 'श्रीसाईगीता**यनाची"** रचना करण्याची सूचना आली व रविवारच्या नवशक्तीद्वारे "श्रीसाई**गीतायन"** हे (गीताभागवताच्या तत्वज्ञानाचा संदेश श्रीसाईबाबांच्या जीवन, लीला व उपदेशाद्वारे संगीताच्या माध्यमातून देणारे) गीतकाव्य माझ्या लेखणीतून प्रगट झाले व रसिकांच्या मान्यतेस पात्र ठरले. या काव्याची रचना १॥ वर्षाच्या काळात घडली. त्यावेळी रात्रंदिवस श्रीबाबांच्या चरित्राचे व उपदेशाचे चिंतन व मंथन घडले. त्याचा जीवनावर फार दृढ ठसा उमटला आहे. श्रीबाबांच्या कृपेचा याकाळात वारंवार अनुभव आला. शेषशायी नारायण, ऋषिकुमार दत्त अशी दर्शनेही प्रत्यक्ष घडली व जीवन सार्थ बनले. श्रीबाबांच्या चरणी काव्य–प्रतिभा वाहिल्यावर अहंकाराचा लोप होऊन साधनेत अधिकाधिक प्रगतीचा अनुभव येत आहे. 'श्रीसाईगीतायन''चे छोटे कार्यक्रम मी स्वतः सादर करतो व माझे मित्र श्री. श्याम व सौ. रूपा जोशी यांची संगीतमय जोड त्याला लाभत असते. कार्यक्रमाच्या अनुषंगाने कृपेचा, देवी संचाराचा, अद्‌भुतपणे अडचणी दूर झाल्याचा मला अनुभव आलेला आहे, त्याचा विस्तार स्वतंत्र लेखातच करावा लागेल. श्रीबाबा हे "शक्तिरूप" आहेत याचा मला स्वानुभव आलेला आहे. **'साईगीतायन'** लेखनाच्या काळात सत्यसाईबाबांचा "भाषा मधुर आहे. शक्ती उपशक्ती लाभेल." असा कृपा दृष्टांतही झाला आहे. पत्नी व मुलींनाही बाबा स्वप्नदृष्टांत देत आहेत. एकंदरीत श्रीबाबांनी आमचे कौटुंबिक, व्यावसायिक, साहित्यिक जीवन पूर्णपणे व्यापलेले आहे व ते आपल्या प्रेमाची व कृपेची छाया आमच्यावर धरीत आहेत. **'श्रीगुरुगीता'** हे एक नवे पुस्तक श्रीबाबांनी फार अद्‌भुतरीत्या मजकडून लिहवून घेतले, त्याची कथा येथे सांगत नाही. **श्रीबाबा** हे **केवळ संत नसून** श्रीपादश्रीवल्लभ **दत्तप्रभूंची प्रेमकृपा शक्ती आहेत, ही माझी धारणा नित्य प्रचीती देत आहे.**

♦ ♦ ♦

# माझे स्वानुभव

**श्री मारुती कृष्णा कळसे ( देसाई )**

मु. पो. उरुण इस्लामपूर, ता. वाळवे, जि. सांगली लिहितात—

– (१) कोयनेच्या ११ डिसेंबर १९६७ च्या भूकंपानंतर थोडे दिवसांनी माझी धाकटी बहीण सौ. बाळाताई शेतातून घरी येत असता रस्त्यावर तिजला टुरिंग (कार) मोटारीने ठोकरले. व ती सुमारे १० फूट दूर फेकली गेली. पण तिजला खरचटणे पलीकडे काहीही इजा झाली नाही. हे माझे साईभक्तीचेच फळ आहे. अशी माझी खात्री आहे.

(२) १९७० साली मी तासगाव सिव्हिल कोर्टात असताना एके दिवशी सायंकाळी सात–आठ वाजता मी बाबांची कोर्ट हॉलमध्ये मानसपूजा करीत होतो. पुजा सुरू असताना माझे काही मित्र तेथे बसले होते. मी डोळे बंद करून पुजा करीत होतो. पुजा संपलेनंतर मी समोर ठेवलेल्या श्री साईबाबांचे फोटोकडे पहातच प्रसाद घेणेसाठी म्हणून माझे मित्रास 'विष्णु' असे म्हणून हाक मारली तेव्हा मजला होकारार्थी हुंकार ऐकू आला. नंतर मी थोड्यावेळाने पुन्हा हाक मारली तेव्हा कोणीही आले नाही. नंतर मी प्रसाद घेवून देणे-साठी म्हणून व्हरांड्यात आलो. पण तेथे कोणीही नव्हते. नंतर मी दुसऱ्या काही खोल्या तपासून पाहील्या कोणीही त्याठिकाणी दिसले नाहीत. मी एकटाच आहे याची खात्री झाली. तदनंतर मात्र माझे डोळ्यातून प्रेमाश्रू वाहू लागले. व बाबांनी एक प्रकारे हुंकाराने आपली प्रचिती मजला दाखविली.

(३) सन १९६८–६९ ची गोष्ट आहे. मी बाबांची नेहमी अशी प्रार्थना करीत असे की, मला माझे बेलिफचे नोकरीमध्ये श्रद्धा वाटत नसून मनही रमत नाही. तेव्हा मला या नोकरीतून मुक्त करून माझे जीवनाची निराळी सोय करावी. असे मी नेहमी बाबांचे जवळ मागत असे. एके दिवशी रात्री स्वप्नात दृष्टांत झाला व बाबांनी तुला आता नोकरीची जरूरी नाही असे सांगितले. नंतर लगेच थोडावेळ थांब, (तुला अजून नोकरी सोडणेस) किती अवकाश आहे ते सांगतो. असे म्हणून हातातील सोटा पूर्वपश्चिम असा जमिनी-वर ठेवला व आपले स्वतःचे हाताचे वितीने तो सोटा मोजणेस सुरुवात केली व थोडा शिल्लक राहिलेनंतर ते उठून मजला म्हणाले तुला अद्याप ७–८ वर्षे थांबावे लागेल. तेव्हा ईशान्य दिशेकडे जमिनीपासून काही उंचावर चार देवता उभ्या होत्या. त्यांनी बाबांना प्रश्न केला, तुम्ही त्यांना आताच सांगितले

की, आता तुला नोकरीची जरूरी नाहीं आणि आता लगेच सांगतो की अजून सात । आठ वर्षे थांबावे लागेल. हे कसे काय? तेव्हां बाबांनी ते असेच आहे असे म्हणून अदृश्य झाले. मी मात्र अद्याप बाबांचे आज्ञेप्रमाणे नोकरी करीत आहे. काय असेल ते असो.

(४) सुमारे १०।१२ दिवस झाले म्हणजे, ता. १५–५–७५ चे दरम्यान माझे बहीणीचे म्हणजे सौ. बाळाताईचे कानापाठीमागे एकदम गाठ उठून कान व तोंड सुजले. तोंड हलविता येईना. नंतर तिची सासू तिजला घेवून कुलकर्णी डॉक्टरांचेकडे गेली. त्यांनी तपासून पाहिले. तेव्हा त्यांनी सांगितले की, आपण लागोपाठ चार दिवस इंजेक्शन व औषध घेवून पाहू या. नाहीतर ऑपरेशन करावे लागेल. तो वृत्तांत मजला माझे घरी सायंकाळी समजला. मी तसाच उठून बहिणीचे घरी गेलो. ते सर्व पाहीले. जीव कळवळून आला. माझे जवळ असणारा अंगारा मी साईबाबांचे नाव घेऊन लावला. आनंदाची गोष्ट म्हणजे, त्याच दिवशी सायंकाळी असणारी गाठ जिरून कानाद्वारे वाहू लागली. त्या दिवशी रात्री तिजला गाढ झोप येऊन बरे वाटू लागले. त्याचा काय आनंद मजला झाला असेल ते मलाच ठाऊक.

# लांब बाबा काय करिती

**श्री. भ. धों. कुंभकर्ण,** मुदखेड, नांदेड

– मी कृषीखात्यात, कृषि मदतनीस (आयाकर) म्हणून राहेर या गोदावरीच्या पवित्र काठावर बसलेल्या, पवित्र क्षेत्री काम करतो.

नोव्हेंबर ७४ ची गोष्ट, एका दुपारी चार वाजताची वेळ, मी व माझे वरिष्ठ अधिकारी शेतावर बांध, चर चारींची पहाणी करावयास निघालेलो होतो. मी त्यांना नकाशाप्रमाणे बांध, चर व चारींच्या जागा दाखवू लागलो होतो व नकाशाकडे पाहून हा चर त्या ठिकाणी ही चारी या ठिकाणी व ताल या ठिकाणी असा अंगुलीनिर्देश करून त्यांना दाखवित होतो. एक शेत संपवून दुसऱ्या शेतात जायला निघणार, मी पुढे चारी दाखवण्याच्या व नकाशाप्रमाणे शेतावर जुळेल की नाहीं या विचारात, समोर सरळ पाहून चाललेला असताना इतक्यात, मागून साहेबांचा आवाज माझ्या कानावर पडला "अहो नाग, नाग" "अहो नाग–साप"

पहिले वाक्य कानावर पडले परंतू आपण नेहमीच्या सरावाप्रमाणे साप म्हटल्यावर पहातो. परंतु नाग, नाग म्हटल्यानंतर माझ्या काही प्रकार लक्षात

आला नाही व मी आणखी दोन पाउले पुढेच टाकली व नंतर "अहो नाग-साप" हे वाक्य ऐकल्याबरोबर दचकून मागे दोन पावले आलो व समोर पहातो तो दोनच पावलावर माझ्या उजवीकडून डावीकडे जात असलेल्या नागाचे २ हात लांब दंडाच्या जाडीएवढे शेपूट. ते वाक्य माझ्या कानावर जर नसते पडले तर दोन पावले मी आणखी पुढे टाकली असते व तेही बरोबर सापाच्या मध्यभागी व नंतर ....

चटकन निमीषार्धात सर्वांग घामाने व शहाऱ्यांनी भरुन गेले, व एक हात खिशांत असलेल्या उदीच्या डबीवर आणि मन बाबांच्या समाधिकडे. सर्वभार समाधीवर टाकीत असल्याचा, दोन्ही हात समाधीवर टेकवून, देखावा :

मग मला नंतर पुढे जाऊन त्या सापाची लांबी पहाता आली. किमान तो ९ फूट व जाडी ३ ते ४ इंचाची, आश्चर्य असे की, तो उंदीर शोधण्यासाठी बाहेर पडलेला या बिळातून त्या बिळात जात होता व तो एका बिळातून पुढे गेल्यानंतर त्याच बिळातून एक उंदीर लांब लांब उड्या टाकीत त्याच्या विरुद्ध दिशेने आमच्याकडेच येऊन बिळात गेला. मी माझी तुलना त्या उंदराशी केली की खरेच आज आम्ही दोघेही भाग्यवानच. मृत्यूच्या कराल दाढेतून सही सलामत बचावलो.

पण आश्चर्य तर पुढेच आहे.

मला बाबा आठवल्यानंतर चटकन लक्षात आले की, आजच सकाळी बाबांनी बाळासाहेब मिरीकर यांना चिथळीच्या दौऱ्यावर असताना भावी संकट सूचना व संकट निवारणार्थ केलेली उपाय योजना हा अध्याय साईसच्चरितातील २२ वा अध्याय, माझ्या नियमित १ अध्याय वाचनाच्या ओघात आजच सकाळी आला व दुपारी संकट व त्याची निवारण उपाय योजनासुद्धा मला दाखवली.

बाबांचे माझ्यावर प्रेम आहे व त्यांनीच सकाळी अध्याय वाचवून घेऊन संकटसूचना केली व दुपारी माझ्या साहेबाला उपाय योजना म्हणून माझ्यासोबत पाठविले, व "अहो नाग साप" अशी हाक मारावयास लाविली, व मला बाचविले केवढे हे भक्तांवरील प्रेम व भक्तांविषयी कळकळ. यावरून आजही बाबा भक्तांच्या पाठीमागे त्यांचे रक्षण करण्याकरिता अहोरात्र उभेच असतात हेच खरे. नसता हे सर्व योगायोग मुळीच घडते ना.

आजही तो प्रसंग आठवला म्हणजे सर्वांगावर शहारे येतात व बाबांची लेकूरवाळी आई द्वारकामाई डोळ्यात उभी राहते, व हात उदीच्या डबीवर स्थीर होतो.

# "श्रीसाईबाबांच्या उदीचा प्रभाव"

**सौ. शालिनी चिंतामण ढापरे** मु. पोस्ट–फणसा जिल्हा वलसाड.
(गुजरात स्टेट)

– महाराष्ट्रभूमि ही संताची भूमि आहे. संत हे ईश्वरी अंश असतात. त्यांच्या प्रत्येक कृतीत व त्यांच्या हातून मिळालेल्या प्रत्येक वस्तूत दैवी साक्षात्कार व प्रचीति पाहावयास मिळते. अशा ईश्वरांश विभूती पैकी शिरडी क्षेत्रभूषण श्रीसाईबाबा एक आहेत. ते सदेह असताना कोणी मनुष्य दर्शनास गेला असता त्यांना बाबांनी प्रसाद बरोबर मूठ–चिमूट आपल्या धूनीतील उदी दिल्याशिवाय कधीही परतत नसे. उदी हाच बाबांचा दिव्य प्रसाद होय. सध्याही शिरडी क्षेत्रास गेलेल्या इसमांस उदी घेतल्याशिवाय तो परतणार नाहीं. उदीचे दिव्य अनुभव अनेक साईभक्तांनी घेतले आहेत त्यातील नुकताच मला आलेला अनुभव पुढे देत आहे :—

**"भाळी लाविता उदीचे टिळे । देखुनिया महाफळे ।**
**यथासांग होईल भले । अरिष्ट सारे जाऊनी ॥"**

वरील बोधवचन म्हणजे श्री बाबांचे आव्हानच होय. आम्ही सर्व कुटुंबीय निस्सीम साईभक्त असून आमची संपूर्ण श्रद्धा–सबूरी आहे. आम्हास अनेकदा श्रीसाईबाबांनी संकट मुक्त केले असून, अद्यापही करित आहेत. माझे यजमान श्रीयुत चिंतामण हरीभाऊ ढापरे हे नुकतेच वयोमर्यादेने नोकरीतून निवृत्त झालेले असून, श्रीसाईसत्संगाकडेच अधिक लक्ष देतात. सन १९५७ चे प्रारंभी एकाएकी पायास सूज येऊन तळपाय बधीर (सून्न) झाल्याने स्थानिक डॉक्टरांना प्रकृती दाखवून औषध उपचार केले, परंतू प्रकृतीत सुधारणा न दिसून आल्याने स्थानिक डॉक्टरांच्या सल्ल्याने मुंबई येथील नायर हॉस्पिटलला व जी. टी. हॉस्पीटलमधील स्किन स्पेशालिस्ट यांस प्रकृती दाखविण्यात आली. सुमारे दीड-दोन महिने औषध उपचार केले तरी काहीही फरक न होता उलट रोग्याचे निदान न समजल्याने त्यांचे औषध उपचाराने (अंगावर) शरीरावर पीताच्या गांधी उठून आल्या. हे रोगाचे लक्षण बरे नाहीं हे पाहून मी मनात घाबरून गेले व ...श्रीबाबांचा धावा सुरू केला. अशा भक्तीभावनेत मजला दृष्टांत आला की माझे यजमान काही वर्षापूर्वी धरमपूर जंगलात नोकरीवर असताना, तेथून जाणाऱ्या डायरेक्ट एस. टी. सर्व्हिसने शिरडीस गेले होते, त्यावेळी तेथील शांत

व रमणीय वातावरणात भक्तीपूजा करून, पुढे पतिसह समाधिदर्शन घ्यावयाचे असा संकल्प केला असे त्याचे स्मरण झाले.

बरीच वर्षे होऊन गेली परंतू शिरडीस जाणेचा योगायोग आला नाही. त्याची माझे मनास चुटपूट लागली व तात्कालिक यजमानांस स्मरण करून मी यजमानांसह दिनांक १० जुलै १९७५ गुरुवार रोजी तेथे रहाता यावे या दृष्टीने आदले दिवशी आमचेकडील वलसाड–नासिक–शिरडी एस. टी. ने शिरडी क्षेत्रांस गेलो. श्रीबाबांच्या कृपेने आम्हांस राहणेस एक लहानशी फॅमेली रूम पण मिळाली. गुरुवार असल्याने साईभक्तांची बरीच रिघ होती. परंतू तेथील शांत वातावरणाने अंतःकरणपूर्वक भक्ती पूजा उभयतांनी करून, माझे यजमानाच्या संकटाचे निवारण करावे असा धावा करून हे अरिष्ट संपूर्णपणे बरे झाल्यावर पुनः उभयतांनी श्रीबाबांच्या समाधीचे दर्शन घेणेस येणेचा संकल्प करून, दररोज श्रीबाबांची पूजा–आरती झाल्यावर उदी कपाळावर लावणे व उदी पाण्यात मिसळून चरणामृत (तीर्थ) प्राशन करणे सुरू केले.

आमची संपूर्ण श्रद्धा व विश्वास (सबूरी) श्रीबाबांवर असल्याने, त्या वेळेपासून माझे यजनामांच्या प्रकृतीत हळू हळू सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे. मात्र बाह्य उपचार म्हणून इकडील डॉक्टरांचे औषधोपचारही करीत आहोत. खरोखर वरील बोधवचन प्रमाणे माझे यजमानांचे महाअरिष्ट टळले. असा हा श्रीबाबांचा उदीचा प्रभाव आहे, म्हणून माझी सर्वत्रांस विनंती की, आपआपल्या परिवारासह दररोज श्रीबाबांवर पूर्ण श्रद्धा ठेवून जात, धर्म वगैरे काहीएक न मानता अंतःकरणपूर्वक, मनोभावे प्रार्थना करित जावे.

# एस. एस. सी. परीक्षेला उत्तीर्ण झालो.

– माझे नाव साईप्रकाश. वय, १५ वर्षे माझ्या आईचे नाव सौ. नानीबाई. वडिलांचे नाव नरसिंह देशपांडे. मु. पो. येल्लारेड्डी निजामाबाद (आंध्रप्रदेश) हे संस्थानचे आजन्म मेंबर आहे.

माझ्या अगोदर आई वडिलांना दिनांक १५ ऑगस्ट १९४७ साली मुलगी होऊन ती दोन वर्षाची असताना अकस्मातपणे मरण पावली. त्यामुळे आई-बाबांना अतिशय दुःख झाले. येथूनच त्यांची साईबाबांवर श्रद्धा बसली. श्रीसाई-

कृपेने २-२-६१ ला माझा जन्म झाला तो दिवस गुरुवारचा होता. हा त्यांचा अनुभव १९६१ च्या ४ किंवा ५ च्या साईलीलेत प्रकट केल्याचे ते सांगतात.

साईकृपेने माझा जन्म झाल्यावर माझे नाव साईप्रकाश ठेवण्यात आले. माझ्या वडिलांकडून बरेच लोक साईबाबांचे भक्त बनले, आणि त्या भक्तानांही संपत्ति संतती लाभली असून ते भक्त सुखी आहे.

मी वयाच्या पाचव्या वर्षापासून शाळेत जातो. साईकृपेने मी दरवर्षी प्रत्येक वर्गात पास होत गेलो. पण ५।६ वर्षापासून स्वतंत्र तेलंगणाच्या गडबडीमुळे शिक्षणात अव्यवस्थता निर्माण झाली. असे तसे करुन ९ वी इयत्ता पास केल्यावर १० व्या वर्गात (मॅट्रीकमध्ये) आल्यावर शिक्षकांची व मुलांची शिक्षणावर श्रद्धा नसल्याने, शिक्षण जसे व्हावे तसे झाले नाहीं. तरीपण परीक्षेच्या तारखेपर्यंत शिक्षण झाले.

परिक्षेच्यावेळी मागील अनुभवावरुन सरकारने पोलीसांचा बंदोबस्त व्यवस्थितपणे केला होता. तसेच शाळेचे शिक्षण खातेचे लोक निगराणी करित होते. २१ मार्च १९७५ ला परिक्षा संपली.

मला दोन विषयाची सारखी भिती वाटत होती. बाबांवर पूर्ण श्रद्धा असल्याने मी साईबाबांची मनापासून प्रार्थना करित होतो. इतक्यात मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मावस बहिणीकडे (सौ. शालूबाई हनमंतराव चाळकापूर) बिदर मुक्कामी गेलो. तिचे आईवडिल लहानपणी वारल्याने ती आमच्या घरीच राहत असे. माझ्या जन्माचे वेळेस माझ्या आईचे बाळंतपण तिनेच केले. आमच्यावर तिचे अतिशय प्रेम आहे. शिवाय आमचेहि तिच्यावर प्रेम आहे.

तिचीहि श्रीसाईबाबांवर पूर्ण श्रद्धा आणि भक्ति असल्याने, साईकृपेने तिलाहि दोन मुले झाली. मे महिन्यात तिच्या दिराचे लग्न असल्यामुळे माझे आई वडिल बिदरला आले आणि लग्नसमारंभ आनंदाने संपला.

दुसऱ्या आठवड्यात तिच्या चुलत भावाचे लग्न हैद्राबादला असल्यामुळे, आम्ही सर्वांनी बिदरला जाण्याचे ठरविले तो दिवस गुरुवारचा होता. नेहमीप्रमाणे वडिलांनी साईबाबांची दुपारची आरती केल्यानंतर प्रसाद वाटला. नंतर वडिलांनी मला गुरुवारचा उपवास करित जा असे सांगितले.

नंतर आम्ही सर्व हैद्राबादला लग्नास गेलो. त्याच सप्ताहात माझा परिक्षेचा निकाल लागणार होता. निकालाबद्दल मला सारखी धडकी भरत होती. नातेवाईक सांगत होते की तू परिक्षेत पास होशील. त्यांच्या शब्दावर माझा विश्वास बसत नव्हता. मी प्रत्येक क्षणाला बाबांची मनोभावे प्रार्थना करित राहिलो. एकदाचा परिक्षेचा निकाल केव्हा लागतो असे झाले. कारण यावर्षीचा मॅट्रीकचा रिझल्ट फारच सवतीने काढण्याचे सरकारने ठरविले होते. त्यामुळे माझी मनः-

स्थिती अतिशय दीन झाली. साईबाबांची वारंवार प्रार्थना केली. एकदाचा (परिक्षेचा) रिझल्ट दिवस आला आणि पेपरात मी पास झाल्याचे दिसल्या-बरोबर मला अतिशय आनंद झाला.

लगेच मी साईबाबांना नैवेद्य वगैरे दाखवून सर्वांना प्रसाद दिला. बाबांनी मला परिक्षेत उत्तीर्ण केले. तसेच सर्व भक्तांना बाबा संकट मुक्त करोत अशी श्रीसाईचरणी प्रार्थना आहे. "ॐ श्री साई".

# सत्य स्वरुपाची ओळख

**सौ. कलावती वसंत चव्हाण,** दादर, २८

– चैत्र शुद्ध पौर्णिमा होती. त्या दिवशी सहज फिरत फिरत मी समुद्र किनारी गेले. ती सूर्यास्ताची वेळ होती. सूर्यस्त्त कसला तो चंद्रोदयच होता. कारण पश्चिमेला सूर्याने आपली सर्व किरणे आपल्यामध्येच सामावून घेऊन सौम्य रूप धारण केले होते. व त्याचेच प्रतिबिंब जणू पूर्वेकडे पडलेले होते. व हा एक अनुपम देखावा सहजासहजीच मला पाहाण्यास मिळाला. अशा या संध्या-समयाच्यावेळी सागर राजाला फारच उधाण आल्यामुळे तो आपल्या फेसाळ पाण्याचे हास्य माणिक मोत्याप्रमाणे उधळत होता. हा देखावा पूर्ण आनंदमयच जिवाला कसा उल्हास देणारा वाटत होता. पण हे विश्वाचे स्वरूप क्षणकाळ नेत्रात साठविले व हृदयात साठवावे म्हणून त्याला एकत्र करू पहात होते. पण ते माझ्या आटोक्यात नेऊ न शकल्यामुळे माझ्या जिवाची होडी त्या तुफान दर्याच्या लाटेवर हेलकावे खाऊ लागली. आता ह्या होडीचे सुकाणू कोणाच्या तरी हातात दिल्याशिवाय ही जीवन नौका किनाऱ्याला लागणार नाही असे वाटून, मी जीवाच्या आकांताने ईश्वराचा धावा केला. साता समुद्रा पलिकडे शेषशायी भगवान साई भगवान निद्रिस्थ होते. त्यांनी माझ्या हृदयातील हाक ऐकू गेल्यामुळे कळत न कळत येऊन माझ्या होडीचे सुकाणू हातात घेतल्या मुळे जीवनाची नौका स्थिर स्वरूपात राहून आजूबाजूचा देखावा पाहू लागले. क्षणापूर्वी ज्या विशाल व उग्र अशा ह्या लाटा भासत होत्या त्याच आता शांत स्वरूपानी एकमेकींचा पाठलाग करतात कि काय? असे वाटू लागले. हा जीवनाचा पाठशिवणीचा खेळ अनंत कालापर्यंत चालू रहाणार आहे. त्याला शेवट आहे तो एक किनारा, त्या किनाऱ्याच्या पलीकडे काहीच नाही. तो एक भास आहे, नि एक कल्पना आहे. बाकी हे सर्व विश्व शून्य निर्विकार आहे.

# श्रीसाईनाथ प्रसन्न

**रा. मा. आडकर,** साईकृपा, बार्शी

– एका संकष्टचतुर्थीस भडगाव जि. जळगाव येथे माझे जावई श्री. पी. डी. देशमुख कॉन्ट्रॅक्टर आहेत, त्यांचे घरी रात्री १०–३० वाजता माझी मुलगी चि. सौ. लिला चादर आणत असताना तेथे लावलेल्या चिमणीवर तिला नकळत तिचा पदर पेटला, त्याचबरोबर परकरही पेटला. तिने पदर बाजूला फेकला तो नात चि. भारतीच्या चादरीस व फ्रॉकला लागला. त्याने पेट घेतला. जवळच विहिणबाई होत्या. त्यांनी दोघीस विझवण्याचा प्रयत्न केला. त्वरीत जावई उठले. त्यांनी दोन्ही हाताने विझवले. मुलगी लीला कमरेपासून खाली पूर्ण भाजली थोडे पोटास व दोन्ही हातास. भारतीची उजवी बाजू पूर्ण, जावयांचे व विहिणबाईचे कोपरापासून दोन्ही हात भाजले. ही घटना घडताच तेथील लोकांनी माननीय जिल्हाध्यक्ष श्री. पवार यांना तार केली. तार मिळताच त्यांनी डॉक्टरसह जावून मोटारीतून त्या सर्वांना जळगाव सिव्हिल हॉस्पीटलमध्ये आणले. त्यावेळी चि. भारतीचा भरवसा नव्हता. व चि. सौ. लिला अत्यवस्थ अशा स्थितीत असताना बार्शीस तार आली. तार मिळताच मी गर्भगळित झालो. बाबा तुझ्याशिवाय यावेळी कोण सांभाळील ? असा बाबांचा ध्यास करीत मी जळगावला निघालो. तो मला भास झाला. बाबांचा रथ अतिशय वेगाने जळगावकडे निघाला आहे. असेच दृश्य जळगावी सौ. लिलास दिसत होते. मी जाताच लिलाने मला सांगितले बाबा रथातून आलेले दिसतात. मी सांगितले घाबरू नकोस बाबा पाठीशी आहेत. ती रोज आरती करी. लिला रोज म्हणे हे पहा बाबा सर्वांच्याच तब्येतीत रोज फरक पडू लागला. सिव्हिल सर्जनना अखेर खात्री आली व सर्वांनी त्यांनी सांगितले की सर्व पेशंट चांगले झाले. घाबरण्याचे कारण नाही.

नंतर मी बाबांच्या दर्शनास आलो. बाबा संकटात कसे धावून येतात व संकट निवारतात याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हा सर्वांना आला.

# श्रीसाईसमर्थ हेच श्रीस्वामीसमर्थ

–कु. शैला अंबाजीराव सरोदे,
उल्लेंगल बिल्डिंग, न. चि. केळकर पथ, दादर २८

– श्रीसाईबाबांचा व माझा संबंध मी जन्माला यायच्या पूर्वीपासूनचा आहे. म्हणजे असे की, माझ्या जन्मापूर्वी म्हणजे आई गरोदर होती. तेव्हा आईला रोज श्रीस्वामीसमर्थांच्या मठात (अक्कलकोट स्वामी समर्थ हा मठ दादर येथे डी. एल. वैद्य रोडवर आहे.) जायची इच्छा व्हायची व ती रोज न चुकता मठात जाऊन प्रदक्षिणा घालून स्वामींचे दर्शन घेत असे. गुरुवारच्या रात्रीच्या आरतीला तर हटकून न चुकता हजर व्हायची. विशेष नवलाची गोष्ट म्हणजे, मी ह्या जगात प्रवेश करायचा दिवस सुद्धा गुरुवारचा होता. त्यादिवशी आई रात्री मठातून आरतीला हजर राहून तीर्थ प्रसाद घेऊन घरी येईपर्यंत तिला अजिबात त्रास झाला नाही. परंतु घरात पाऊल ठेवल्यावर मात्र तिला त्रास सुरू होऊ लागला व लगेच हॉस्पिटलमध्ये घेऊन गेल्यावर एका तासातच मी झाले.

लहानपणापासूनच मला श्रीस्वामीबद्दल फार ओढ आहे. आमच्या घरातील सर्वजण साईभक्त असल्यामुळे कदाचित श्रीस्वामींनी मला स्वप्नात दृष्टांत दाखवून दिले असावे की, श्रीस्वामी व श्रीसाईबाबा एकच आहेत. १) एके दिवशी मला असे स्वप्न पडले की, मी मठात स्वामींच्या फोटोला नमस्कार करीत असताना अचानक मला स्वामींच्या ठिकाणी श्रीसाईबाबा दिसू लागले पुन्हा स्वामी दिसू लागले व पुन्हा श्रीसाईबाबा दिसू लागले असे दोन तिनदा झाले २) असाच दुसरा अनुभव म्हणजे स्वप्नात मी स्वामींच्या मठात गेली आहे व गाभाऱ्यात श्रीस्वामींच्या फोटोच्या ऐवजी मला शिळेवर बसलेले श्रीसाईबाबा दिसू लागले. ३) माझा स्वामी व साईबाबांबद्दलच तिसरा अनुभव म्हणजे, एकदा मी श्रीस्वामीसमर्थांची पोथी (श्री गुरुलीलामृत) वाचून झाल्याबद्दल अक्कलकोटला श्रीस्वामींच्या समाधीवर व गुरुपादुकांवर अभिषेक करण्यासाठी काही पैसे पाठविले व सविस्तर माहितीसाठी एक पत्रही लिहीले. पण त्या पत्रावर जे स्टॅम्प चिकटविलेले होते ते उलटे होते. (पत्र पोस्ट ऑफिस मधून विकत घेतानाच ते तसे होते.) ज्या दिवशी गुरुवारी ते पत्र अक्कलकोटला पोहोचले. त्या दिवशी गुरुवारी पहाटे मला असे स्वप्न पडले की, माझ्या सर्व मैत्रिणींबरोबर एका मोठ्या हॉलमध्ये गप्पा मारीत बसली आहे. व सर्व

मैत्रिणी गोलाकार बसल्या आहेत. इतक्यात एक मनुष्य एका उंच कठड्यावर उभा राहून म्हणाला की, "येथे सरोदे आडनावाचे कोण आहे?" तावडतोब मी उठले व "मी" असे सांगून त्याच्या पुढे गेले. त्या माणसाने मला बंद पेटी असलेल्या एका खोलीत नेले. व विचारले "तू एस्. एस्. सी. झालीस ना?" मी उत्तर दिले, हो. त्यावर तो म्हणाला "मग तुला अजुन स्टॅम्पसुद्धा नीट लावता येत नाहीत का?" असे म्हणून त्या पेटीवरील स्टॅम्प (त्या पेटीवर स्टॅम्प चिकटविले होते.) नीट सरळ लावून दाखविले, व ती पेटी उघडून म्हणाला; 'हं आता घे बाबांचे दर्शन. मीसुद्धा अगदी एखाद्या लहान बालिके-सारखी नम्रपणे हात जोडून त्या पेटीजवळ गेले. बघते तर काय? श्रीसाईबाबा सजिव रुपाने त्या पेटीत झोपलेले असून त्यांच्या डोक्याला फेटा (कफनी व अंगात भगवे वस्त्र होते. व ते माझ्याकडे बघून डोळे हलवित होते व हसत होते. खरे पाहता मी ते पैसे व पत्र अक्कलकोटच्या समाधिमंदिरात पाठविले होते. पण बाबांनी मला त्यांच्या समाधीच्या आतील स्वतःचे दर्शन दाखविले. ह्या स्वप्नावरून आता माझी पूर्ण खात्री झाली आहे की, श्रीस्वामीसमर्थ व श्रीसाईबाबा हे एकच आहेत.

हा अनुभव माझा लहानपणीचा म्हणजे मी आठ दहा वर्षाची असतानाचा आहे. पूर्वी आमच्या घरात बाबांची आरती दर गुरुवारी सायंकाळी होत असे. अशाच एका गुरुवारी मी बाबांच्या फोटोची पूजा करुन, हार घालून निरांजन पेटविले. इतक्यात बाबांच्या फोटोकडून "दार उघड" असा मला आवाज आला. (ब्लॉक असल्यामुळे पूजेच्या वेळेस दार बंदच होते.) तेव्हांपासून नेहमी मी पुजेच्या प्रथम दार उघडते. व मगच पूजेला सुरुवात करते.

वरील प्रसंगाच्या एक वर्ष अगोदर माझे टॉन्सीलचे ऑपरेशन मुलांच्या वाडीयामध्ये म्हणजे के. ई. एम. च्या बाजूला असलेल्या हॉस्पिटलमध्ये झाले होते. ऑपरेशनच्या एक दिवस अगोदर मला दाखल करण्यात आले व ऑपरेशनच्या आधी आईला माझ्या सोबत रहाण्यास डॉक्टरांनी मनाई केली होती. माझा स्वभाव भित्रा असल्यामुळे मला भीती वाटू लागली. त्यावेळी मी घाबरू नये म्हणून आईने मला एक बाबांचा फोटो दिला होता. त्यादिवशी रात्री मला उद्या ऑपरेशन होणार ह्या भीतीने व वॉर्डमध्ये कोणीही ओळखीचे नसल्यामुळे मला तर रडूच कोसळू लागले. इतक्यात मला आईने दिलेल्या बाबांच्या फोटोची आठवण झाली. तो फोटो हातात घेऊन व हात उशीच्या खाली ठेवून मी सारखे बाबांचे नाव घेऊ लागले. थोड्या वेळातच मी निद्रादेवीच्या आधिन झाले. स्वप्नात एक डोक्याला फडका गुंडाळलेला मनुष्य माझ्या कॉट शेजारी उभा आहे असे दिसले. पाचच्या सुमारास जेव्हा मला

जागे करण्यात आले तेव्हा प्रथम मला माझ्या छातीवर बाबांचा फोटो दिसला जणू बाबांना सुचवायचे होते, घाबरू नकोस मी तुझ्याबरोबर आहे. (रात्री झोपताना तो फोटो माझ्या हातात उशाखाली होता कदाचित हात छातीवर आल्यामुळे तो फोटोसुद्धा छातीवर आला.) पण उठल्या उठल्या प्रथम मला बाबांचा चेहरा दृष्टीस पडला त्यामुळे मला माझी ऑपरेशन बद्दलची भिती कमी झाली.

ह्या अनुभव माझा १९७४ सालातील आहे. मी बॉम्बेसेंट्रलला होमसायन्सच्या क्लासला जात होते. तो क्लास मला इतका आवडला की, मला नेहमी वाटे ह्या क्लासच्या परिक्षेत फर्स्टक्लास मिळावा. त्यासाठी मी बाबांजवळ नेहमी प्रार्थना करायची की, "बाबा मी प्रयत्न करीन. तुम्ही मला आशिर्वाद द्या व त्यात यश द्या. पण त्या परिक्षेला आठ दहा दिवस असतानाच जणू बाबांनी माझी कसोटीची वेळच आणली होती. त्याचे असे झाले. माझी क्लासची वही माझ्या एका मैत्रिणीने अभ्यासासाठी घरी नेली होती. ती चुकून नकळत तिच्या हातून पाण्याच्या पिंपात पडली. आता एव्हडी पाचशे पानी वही पुन्हा लिहून काढून मग अभ्यास करायचा म्हणजे अशक्यच होते. त्यातच मला लचकीचा विकार उद्भवला. मला धड झोपता येईना. धड बसता येईना. माझे फर्स्ट क्लास मिळविण्याचे स्वप्न धुळीला मिळण्याची वेळ आली होती. अशाही अवस्थेत मी माझा धीर खचू दिला नाही. माझी श्रद्धा बाबांवर होती. मी व माझी आई आम्ही दोघांनी मिळून ती वही अक्षरशः जागून संपूर्ण लिहून काढली (त्या वहीलासुद्धा मार्कस् होते.)/ एकीकडे माझे डॉक्टरांकडून औषध चालू होते व एकीकडे अभ्यास. परिक्षेच्या दिवशी पहाटे बाबा माझ्या स्वप्नात आले. डोक्याला पांढराशुभ्र फेटा, कफनी व अंगात पांढराशुभ्र अंगरखा नेसलेले. एका खोलीत खूप कॉटस् आहेत व पेशंट त्यावर झोपलेले आहेत. आणि स्वतः बाबा त्यांची सेवा करताहेत. मी झोपेतून जागी झाले. जणू बाबांनी मला दिलासा दिला होता. त्यादिवशी डॉक्टरांनी जेवायला नको म्हणून बजावले असताना सुद्धा मी जेवूनच परिक्षेला गेले. त्या दिवशी बाबांच्या आशिर्वादाने मला थोडासुद्धा त्रास झाला नाही. आणि योगायोग असा की, ज्या दिवशी परिक्षेचा रिझल्ट होता त्याच दिवशी श्रीस्वामींची पुण्यतिथी होती, आणि त्यादिवशी पहाटे मला असे स्वप्न पडले की, श्रीस्वामी मला फोटोतून सजिव रूपाने आशिर्वाद देत आहेत. उठल्यावर माझी खात्री झाली की नक्कीच मला परीक्षेत चांगले मार्क्स पडले असणार. आणि जेव्हा मी रिझल्ट घ्यायला गेले तेव्हा बक्षीसासाठी पहिले नाव माझेच पुकारले गेले. माझा पहिला नंबर आला होता.

त्यावेळी मला झालेला आनंद कोणत्या शब्दात सांगू ? आणि मी त्या हॉलमध्येच मनोमन बाबांना वंदन केले.

हा अनुभव माझा अगदी अलीकडचा आहे. डिसेंबरमध्ये मी श्रीसाईबाबांच्या पोथीचे (श्रीसाईसच्चरित) सप्ताह करायचे ठरविले होते. त्याप्रमाणे दिनांक २६–१२–७४ ला गुरुवारपासून सुरुवात केली. आदल्या दिवशी रात्री बाबांना प्रार्थना केली की, उद्या माझी बरोबर सहाला झोप जागी होऊ दे. (मला लवकर उठायची सवय नाही) त्या दिवशी म्हणजे सप्ताहाला सुरुवात करायच्या पहिल्या दिवशी असे स्वप्न पडले की मी, शिर्डीत गेले आहे व तेथे समाधिमंदिरात बाबांच्या मूर्तीवर अभिषेक चालू आहे. नंतर मी वर चढून बाबांच्या मूर्तीजवळ व दक्षिणा देण्यासाठी हात पुढे केला. इतक्यात बाबांनीच स्वत:चा हात पुढे करून पैसे हातात घेतले व ते मोजू लागले. नंतर मी बाबांना नमस्कार करून म्हणाले, "बाबा आजपासून मी तुमच्या पोथीचे सप्ताह करणार आहे, तेव्हा तुम्ही या." नंतर मी खाली भक्त मंडळी बसली होती तिथे येऊन बसले. थोड्याच वेळात बाबा प्रसादाचे ताट घेऊन आले व प्रत्येकाला प्रसाद देऊ लागले. मला प्रसाद मिळाल्यावर माझी झोप जागी झाली आणि त्याच वेळी घड्याळात सहाचे ठोके पडत होते.

पहिल्या दिवशी वाचून झाल्यावर बाबांना नैवेद्य दाखवून आरती सुरू करणार तोच तुळजापूरला असलेल्या देवीच्या देवळातील अरण्य मठाचे महाराज (ते संन्यासी आहेत) भगवा सदरा घातलेले दारात हजर. त्यांना पहाताच प्रथम मला काही वाटले नाही. पण- आरती झाल्यावर माझ्या लक्षात आले की सकाळीच मी बाबांना येण्यासाठी सांगितले होते. कदाचित त्यांच्या रूपाने श्रीसाईबाबाच आले असतील. म्हणून आम्ही त्यांना जेवावयास विनंती केली. तेसुद्धा जराही आढेवेढे न घेता जेवावयास बसले. ह्या घटनेमुळे मला खूप आश्चर्य वाटले. सकाळीच मी श्रीबाबांना बोलवायला आणि हे गृहस्थ बरोबर आरतीच्याच वेळेस जणू काही आमंत्रण दिल्याप्रमाणेच हजर झाले. बाबांनी सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी स्वप्नाची प्रचीती दाखविली होती.

खरोखर बाबांची करणी अगाध आहे. आपल्या भक्तांचे इच्छा व लाड ते एखाद्या आईप्रमाणे पुरवितात. त्या बदल्यात ह्या साईमाऊलीला त्यांच्या भक्तांनी द्यावयाचे असतात श्रद्धा आणि सबूरी चे दोन पैसे.

# शिर्डीस कोण गेले !

**सौ. मंदा मनुभाई शाहा** राममंदिरासमोर, नवापूर, ( जि. धुळे )

– १९६६ मध्ये मी औरंगाबाद येथे गेले होते. तेव्हा माझे लग्न झाले नव्हते. बिबीका मकबराच्या परिसरात मी फिरत असताना जवळ एक फकीर आला व त्याने आशीर्वाद दिला. "अल्ला भला करेगा, अल्ला अच्छा करेगा' तेव्हां साई-बाबां विषयी मला काहीच माहीत नव्हते. फकीरांची असं बोलण्याची पद्धतच असते म्हणून मला काही विशेष वाटले नव्हते. पण सहा महिन्यानी मला शिर्डीला बाबांच्या दर्शनासाठी जाण्याचा योग आला, तेव्हा तिकडे समजले की औरंगाबादला फकीरानी दिलेला आशीर्वाद आणि बाबांच्या आशीर्वादाची पद्धत एकच होती आणि खरोखरच ह्या आशीर्वादा नंतर माझे लग्न प्रतिकूल संयोग असताना माझ्या मनाप्रमाणेच झाले.

ह्या आठ नऊ वर्षात आम्हांला बाबांचे खूपच अनुभव आले आहेत. त्यातला एक खाली देत आहे.

१९६९ साली रामनवमी उत्सवासाठी माझे मिस्टर शिर्डीला जाणार होते. सर्व तयारी झाली होती. आदल्या दिवशी ११–४५ च्या नवापूर–शिर्डी बसने निघणार होते. पण त्याच दिवशी सकाळी त्यांना एकाएकी अर्जंट काम आल्या-मुळे शिर्डीला जाण्याचे कॅन्सल करावे लागले. म्हणून ते उदास झाले होते. सकाळी दहाच्या सुमारास एका मित्राच्या दुकानामध्ये तीन चार मित्रांबरोबर ते बसले होते. मनात शिर्डीचाच विचार चालू होता, की उत्सवाला जाण्याचा आपला योग नाहीं. आधीच जर कॅन्सल झाले असते तर हार पूजेसाठी चार पाच रुपये तरी पाठविले असते वगैरे, त्यांच्या चेहरा उदास दिसल्याने एका मित्राने उदास होण्याचे कारण विचारले. त्यांना माझे मिस्टर उत्तर देणार इतक्यात एक मनुष्य, ज्यानी फक्त धोतर व अंडरवेअर घातला होता व हातात एक पिशवी होती, दुकानासमोर पायरी चढून वर आला. दुकानात मालक व दुसरे काहीं लोक बसले होते. त्यांच्याजवळ न जाता तो सरळ माझे पतिजवळ जाऊन सांगायला लागला की, "रामनवमी उत्सवासाठी मला शिर्डीस जायचे आहे, पण मजजवळ फक्त तीन रुपये आहेत. एस. टी. भाड्याचे बाकी पैसे तुम्ही देत असाल तर मी शिर्डीला जातो." माझे पती काय ते समजले व त्या मनुष्याला पाच रुपये दिले (तेव्हा नवापूर ते शिर्डी आठ रुपये भाडे होते).

तो मनुष्य लगेच निघून गेला. नंतर एका मित्राने माझ्या मिस्टरांना विचारले की "एवढे पैसे तुम्ही त्याला कसे दिलेत ?" माझ्या पतिने त्यांना सर्व सविस्तर सांगितले, तेव्हा त्या सर्वांना पण आनंद व आश्चर्य वाटले.

## श्री. कर्वे गुरुजी, खेड (राजगुरुनगर) कळवितात—

—मला १९७२ साली अर्धांगवायूचा जबरदस्त झटका आला. उजवीबाजू अक्षरशः लुळी पडली. मोठी केविलवाणी अवस्था झाली. अशा परिस्थितीत मी श्रीसाईबाबांचा धावा केला. बाबांची उदी मी पाण्यात टाकून पिऊ लागलो. उदी अंगाला पण लावू लागलो. सुमारे २१ दिवसांनी माझ्या उजव्या बाजूस जीव आला व मी पुन्हा पूर्ववत झालो; हिंडू फिरू लागलो. एकदा तर बाबा माझ्या उशाशी बसलेले आढळून आले होते!

## श्री. पांडुरंग गणू शिरोडकर, सँडहर्स्ट रोड मुंबई लिहितात—

—मी मूळ गोव्याचा. लहानपणीच मी मुंबईत आलो. जेमतेम वाचण्यालिहिण्या पुरते शिक्षण घेतले. एका हितचिंतकाने मला एका गिरणीत नोकरीस लावले. तो चांगला अधिकारी होता. मी कधी कुणाच्या अध्यात वा मध्यात नसे. आपण बरे की आपली नोकरी बरी, त्यामुळे माझे अधिकारी मजवर खूप खूप असत. पण एकदा मी व्यंकप्पा नावाच्या एका वेडगळ इसमाची टवाळी केली. ती करताना माझ्या अधिकाऱ्याने मला पाहिले व मला भेटीसाठी बोलावणे पाठविले. त्यांनी मला मी केलेल्या कृत्याचा जाब विचारला व योग्य उत्तर न दिल्यास कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली. मी मनात साईबाबांचा यावेळी धावा केला व कसे काय कुणास ठाऊक, दोन चार दिवसातच अधिकाऱ्याच्या रागाचा पारा उतरला व मी पूर्ववत कामावर जाऊ लागलो. तेव्हापासून मी साईभक्त बनलो आहे. सध्या मी पीळगाव मुक्कामी बाबांचे एक मंदिर पण स्थापन केले आहे.

# शिरडी-वृत्त ऑगस्ट १९७५

या महिन्यात श्रावण आल्याकारणाने श्रीसाईनाथांचे दर्शनासाठी बाहेरगावचे साईभक्तांची व आजूबाजूचे गावातील लोकांची गर्दी बरीच होती. शिवाय या महिन्यात सत्यनारायण पूजाही बऱ्याच झाल्या. काही कलाकारांनी हजेरी श्रींचे पुढे दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन :** १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. २) ह. भ. प. श्री. नानासाहेब रासने, पुणे यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन :** १) श्री. वि. स. पागे अध्यक्ष महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई. २) ह. भ. प. श्री. निवृत्तीराव पाटील गोंदकर, शिर्डी. ३) ह. भ. प. जगन्नाथबुवा वाघचौरे शिर्डी. ४) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी.

**वेदपठण :** १) वे. शा. सं. सीतारामय्या शास्त्री, २) वे. शा. सं. धोंडूशास्त्री शहापूरकर, ३) वे. शा. सं. जगन्नाथशास्त्री दिक्षीत, ४) वे. शा. सं. शंकर भट जोशी, ५) वे. शा. सं. नरसिंह शर्मा, ६) वे. शा. सं. गजाननगुरु उपाध्ये ७) वे. शा. सं. व्यंकट रामय्या. ८) वे. शा. सं. कृष्णपाठी शर्मा, हैद्राबाद.

**भजन :** १) ह. भ. प. खेडले जुंगे भजनी मंडळ, ता. निफाड, २) अशोक नगर भजनी मंडळ. ता. श्रीरामपूर, ३) ह. भ. प. पांडुरंग गंगाधर क्षत्रिय अ. नगर. ४) ह. भ. प. नारायण महाराज व भगवती संस्थान भजन मंडळ कुर्ला,

**गायन :** १) श्री. पांडुरंग दिक्षीत व सौ. विनोदीनी दिक्षीत मुंबई. २) विजया खडीकर इन्दूर, ३) श्री. एम. व्ही. एल. कुमार चंद्रपूर. ४) श्री. विजयबाबा, साईबाबा मंदीर नागपूर. ५) श्री. तुकाराम भिकाजी राऊत व मंडळी, उंदीरगाव. ६) श्री कैलासचंद्र निकम. कानपूर. ७) सौ. उषादेवी जयसिंगानी, मुंबई. ८) सौ. निर्मला निरंजन हळदीपूर. मुंबई.

**स्वातंत्र्य दिन :** १५ ऑगस्ट रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे रिसीव्हर श्री. का. सी. पाठक यांचे शुभ हस्ते ध्वजवंदन कार्यक्रम, श्रीसाईबाबांचे मंदिरावरील कळसाजवळ झाला. कार्यक्रमास संस्थान नोकर वर्ग, श्रीसाईनाथ हायस्कूल बँड पथक, शिक्षकवर्ग होमगार्ड पथक, विद्यार्थी, विद्यार्थींनी, प्रतिष्ठित पाहुणे मंडळी उपस्थित होती. त्यांना चहा देणेत आला व मुलांना खाऊ वाटण्यात आला.

श्रीकृष्ण जयंती : श्रीकृष्ण जयंती निमित्त श्रीसाईनाथांचे मंदिरात शुक्रवार दि. २९–८–७५ रोजी, रात्री श्रीकृष्ण जन्म कीर्तन, संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांचे झाले, व दुसरे दिवशी गोपाळकाला कीर्तन, दहिहंडी व रात्री श्रींचे रथाची मिरवणूक गावातून झाली.

**माननीयांच्या भेटी :–**

(१) मा. श्री. आर. जी. शिंदे (रिटायर्ड कलेक्टर)

(२) मा. श्री. पारेख, सी. टी. सिव्हील कोर्ट मुंबई.

(३) मा. श्री. शुक्ला. रोशनलालजी. अध्यक्ष नॅशनल फेडरेशन ऑफ को. ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज. न्युदिल्ली.

(४) मा. श्री. चंदरसेन, डे. डायरेक्टर सिव्हील सप्लाय. आंध्रप्रदेश.

(५) मा. श्री. डी. एन. कपूर I. A. S. कमिशनर औरंगाबाद.

(६) मा. श्री. प. कृ. सावंत अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश, कॉंग्रेस कमिटी, मुंबई.

(७) मा. श्री. वि. स. पागे, अध्यक्ष महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई.

(८) मा. श्री. कैरे, I. A. S. मॅनेजिंग डायरेक्टर मराठवाडा डेव्हलपमेंट कार्पोरेशन.

(९) सौ. कुसुमताई चव्हाण (माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या पत्नी).

**हवापाणी :—** शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाहीं.

# – शिरडी-वृत्त माहे सप्टेंबर १९७५ –

या महिन्यात बाहेरगावच्या साई भक्तांची गर्दी कमी प्रमाणात होती. काही कलाकारांनी श्रींपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन:**—(१) श्री. ग. वि. जोशी शास्त्री, संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली. (२) ह. भ. प. बाबू कृ. जाधव, शिर्डी. (३) ह. भ. प. बळवंत र. काणे, कोल्हापूर. (४) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी.

**प्रवचनः**— (१) ह. भ. प. निवृत्तीराव पाटील गोंदकर, शिर्डी. (२) ह. भ. प. शशिकांत कुलकर्णी, लोणावळा.

**भजन गायन वगैरे :**— (१) श्रीमती जयलक्ष्मी भजन मंडळी, मद्रास. (२) परमपूज्य कालावनीदेवी भजनीमंडळ लक्ष्मीवाडी. (३) श्री. धर्माजी कोळी, कोल्हापूर. (४) श्री. सुरेश दुबलारे, सोलापूर. (५) श्री. पांडुरंग सो. डगळे, कोपरगाव, (६) श्री. कडू के. बावसिकर, कोपरगाव. (७) कु. नंदा दि. मनळे, कोपरगाव. (८) श्री. श्रीधर र. काणे, गणेशवाडी, (९) कु. चारुशीला बेलसरे, मुंबई, (१०) सौ. सुरेखा बेलसरे, मुंबई. (११) श्री. सदाशिव ना. बोरगावकर. (१२) श्री. राम कमलाकर बोरगावकर. (१३) श्री. बाबू गोविंद बोरगावकर. लातूर, (१४) श्री. शाहीर बापूराव वि. विभूते, मिरज सांगली. (१५) सौ. सुगंधा भा. दातार, मुंबई ४. (१६) स्वामी रामानंद बेळगाव, (१७) जनता कला पथक, मुंबई कलाकार, (१) श्री. कृष्णाजी ठाकूर. (२) श्री. वंडू चव्हाण. (३) श्री. धोंडीराज भोसले. (४) श्री. शशिकांत शिंदे. (५) श्री. भास्कर रासम. (६) श्री. तुकाराम कदम. (७) श्री. बावल लाड. (८) सौ. मंगला लाड. (९) कु. शैला कुलकर्णी. (१०) कु. विजया सूर्यवंशी.

**माननीयांच्या भेटीः**—(१) मा. श्री. एम. व्ही. देव (IAS) मुंबई.

(२) मा. श्री. सुंदरम, जिल्हाधिकारी, अहमदनगर.

(३) मा. श्री. म. वि. बावडेकर, मुख्याधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई.

(४) मा. श्री. घनःशाम ओझा, माजी मुख्यमंत्री, गुजराथ राज्य व चेअरमन खादी ग्रामोद्योग, मुंबई.

(५) मा. श्री. पंचण्णा जाईंट सेक्रेटरी, फायनान्स डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, दिल्ली.

(६) मा. नामदार श्री. रत्नाप्पा कुंभार, मंत्री अन्न व नागरी पुरवठा खाते, महाराष्ट्र राज्य.

(७) मा. श्री. मिश्रा, चिफ इंजिनिअर इलेक्ट्रिसिटी बोर्ड, महाराष्ट्र राज्य.

**हवापाणीः**—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# गृहलक्ष्मीने दीप गृहीं लाविले

गृहलक्ष्मीने दीप गृही लाविले ।
प्रकाशांत तयांच्या साईप्रभू दिसले ॥धृ॥

ज्योतिपुढे मी डोळे मिटूनी
उभा राहिलो हात जोडुनी
त्याक्षणी प्रभुजी प्रसन्नपणे हासले ॥१॥

हरली चिंता, हरले दुःख
होऊ नको तूं कधि विन्मुख
आशिष देऊनि प्रत्यक्षात बोलले ॥२॥

अज्ञानाचा अंधार संपला
दारिद्र्याचा दैत्य पळाला.
सर्व सुखाचे मार्ग पुढति आले ॥३॥

स्नेहाचे मग तेल घालुनि
भक्तिदीप प्रज्वलीत करूनि
पवित्र पावन पाय प्रभूंचे वंदिले ॥४॥

—दत्ताराम आ. बारस्कर

## साधु संत येती घरा । तोंचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष 'रामावतारी' "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान सच्चिदानंद सद्गुरू, **श्रीसाईबाबा** (शिर्डीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील "**सोनियाचा दिवस**" होय.

आजच श्रीसाईबाबांची पूर्णाकृती पंचधातुची, (ब्राँझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा मग काय रोज पूजा, आरति, नैवेद्य म्हणजे जणू काय "जाहले घराचे मंगल देऊळ"

**मूर्तिविषयीच्या अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा. :-**

**श्री. मनोहर ध. पितळे**

पितळे वाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०० ०५७.

**वरील पत्त्यावर आपणास मूर्ति प्रत्यक्ष पहावयास मिळेल.**
**भेटण्याची वेळ सकाळी ७ ते ९ — संध्याकाळी ७ ते ९.**

# अनुक्रमणिका—दिवाळी अंक १९७५



| | | |
|---|---|---|
| प्रियवाचक सप्रेम नमस्कार | — | संपादकीय |
| श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने – १५<br>श्रीरामसाईनिवास – विलेपार्ले | — | श्री. चंद्रकांत दामोदर सामंत. |
| श्रीसाईनाथ चरित्र (चालू लेखमाला) | — | श्री. र. श्री. पुजारी. |
| श्रीसाई बोधामृत | — | श्री. द. शं. टिपणीस. |
| गृहलक्ष्मीने दीपगृही लाविले | — | श्री. दत्ताराम बास्कर. |
| शिर्डीवृत्त | — | |


# श्रीसाईलीला स्वानुभव अंकाचे आणखीन मानकरी

–श्री. म. शं. दरेकर, सौ. मंदा दरेकर, चेंबूर ८९.
–कु. उषा रघुनाथ पार्सेकर, घाटकोपर.
–श्री. चिंतामण घनःशाम चेंदवणकर, सोलापूर.
–श्री. सुभाष माळी, किर्लोस्करवाडी.
–श्री. रामजी गुणाजी पारटकर, पवना.
–श्री. भाऊराव वामन कुलकर्णी, दादर २८.
–श्री. सदाशिव सातपुते, शिवाजी नगर, पुणे ५.
–प्रा. ए. एम. अमीनगड, गुळूंचे, पुणे. ता. पुरंदर.
–श्री. चकोर आजगांवकर, बांद्रा, मुंबई.
–श्री. मारुती कळसे, मु. उसण, इस्लामपूर.
–श्री. भ. धों. कुंभकर्ण, मुदखेड, नांदेड.
–सौ. शालिनी चिंतामण ढापरे, मु. फणसा, बलसाड.
–श्री. साईप्रकाश नरसिंह देशपांडे, येल्लारड्डी, निजामाबाद.
–सौ. कलावती वसंत चव्हाण, दादर २८.
–श्री. ग. मा. आडकर, बार्शी.
–कु. शैला सरंदे, दादर २८.
–सौ. मंदा मनुभाई शहा, नवापूर, जि. धुळे.
–श्री. कवेंगुरजी, राजगुरुनगर.
–श्री. पांडुरंग गणू शिरोडकर, सँडहर्स्ट रोड, मुंबई.

Regd. No. MH/BYE/26

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १–५० | ८" × १०" | रु. ०–५० |
| १०" × १४" | रु. १–०० | २½" × ३½" | रु. ०–२० |
| ४½" × ५½" | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

**मुद्रक : पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१.

संपादक व प्रकाशक : श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.